

# वाग्वैजयंती

## काव्यसंग्रह

एकूण पृष्ठे -२३९

समग्र गडकरी वाङ्मय.
सीडी प्रकल्पास
हार्दिक शुभेच्छा !

दि.सी.के.पी.
को-ऑप. बँक लि.

# अर्पण पत्रिका

सत् --
चित्-हृत्-महत्
आनंद-पदवी-प्रदान-वदान्या ॥१॥
प्रीतीची पवित्रता, चिरंतनाची चरित्रता,
सृष्टीची सचित्रता,
विश्वाची विविधता, अनंताची अगाधता,
ईश्वराचे अस्तित्व
या सर्वांच्या
अचल ऐक्याची
प्रत्यक्ष निदर्शना ॥२॥
भूतकालांतली भावजीवना, वर्तमानांतली वरतराशा,
भवितव्यांतली भाग्यदेवी ॥३॥
हृदयाची स्फूर्ति, इच्छेची पूर्ति,
मांगल्याची किर्ति
श्री हृदयशारदा
ही
सर्वस्वाने अर्पिलेली

**'वाग्वैजयंती' सदैव कंठांत धारण करो !**

'गोविंदाग्रज'

# वाचकांस विज्ञापन

**शार्दूलविक्रीडित**

जे जे या समयी मनात भरले स्वच्छंद नानास्थळी,
ते ते त्या समयी जपून धरिता ही होय गंगाजळी !
मित्रा ! ही कविता-न गद्य-इजला निर्बंध कैचा बरे ?
सारे हे मनि आणुनी मग धरी 'वाग्वैजयंती' करे ॥१॥

**वसंततिलका**

प्रेमे, सख्या धरी हिला हृदयी सदाही,
दे टाकुनी; तुडवि ही अथवा पदांही !
माते दशा समचि या गमतात दोन्ही
माझी मलाच लखलाभ सदा असो ही ॥२॥

# तडजोड *

एका एक कधी जसे दिसतसे स्वांती विकारांतरे,
अन्या तें न दिसे तसेंच; असते ज्याचे तयातें खरे;
चित्तैक्यास्तव सर्वथा फुकट का हेका धरावा मग?
एका शून्य जगीं दिसे, तरि दिसे शून्यांत अन्या जग! ॥३॥

...........

*'गोविंदाग्रजा' शी ज्याचा विचारभेद होईल त्यांना या तडजोडीने समाधान वाटावयाला काय हरकत आहे ? - राम गणेश गडकरी

# माझी पहिली कविता

( आमचा एक वृद्ध गुजराथी शेजारी, रोज दुपारी जेवण झाल्यावर आमच्या घरी येऊन गप्पागोष्टी सांगत बसत असे, त्यांचे पुढील आर्येत वर्णन केलेले आहे. माझे वडिलबंधु ती. विनायक गणेश गडकरी यांना या काव्याला थोडी मदत केली होती. मु.गणदेवी, प्रांत नवसारी, संस्थान गायकवाडी. १८९६ जून किंवा जुलै.)

आर्या

चष्मा लावुनि डोळ्यां डोकिस पागोटी तांबडी घाली.
काटी टेंकित टेंकित येऊनि बैसे पथारिच्या खाली ॥१॥

# नदीस पूर आलेला पाहून

(मुठा नदीस एकदा फार पूर येऊन श्रीओंकारेश्वराचे मंदिरात पाणी शिरले होते.)

(चाल : नृपममता रामावरती)

विरहोत्सुक सागर झाला।
प्रियसखीस भेटायाला ।। मज गमे ।।

निजमित्र मेघ पाठविला ।
गिरिराज श्वशुर-सदनाला ।। मज गमे ।।

सरिता ही सागरजाया।
त्यासवे निघाली जाया ।। मज गमे ।।

आक्रांत। करित अत्यंत। ठेवितां तात।
तिजसी उतरोनी।
भूवरती तटकटिवरुनि ।। मज गमे ।। १ ।।

तो प्रसंग जणु बघवेना।
म्हणुनी रवि झांकी नयनां ।। मज गमे ।।

घन गाळिती अश्रूधारा।
दुःखें नच वाहे वारा ।। मज गमे ।।

शिवमंदिरि भगिनी गिरीजा।
भेटे तिस सागरभाजा ।। मज गमे ।।

यापरी। सिंधुमंदिरी। जात सुंदरी।
पुर्ण जलसरिता।
शिवगिरिजा दर्शनमुदिता ।। मज गमे ।।

- १९०१, पुणे.

# मोगऱ्याचा हार

(चालःनृपममता रामावरती)

मुलगा- हा हार शुभ्र किति आई
किति कोमल सुंदर पाहीं ॥ क्षणभरी ॥

किती वास मधुर या येई।
मम चित्त ओढुनी घेई ॥ बघ तरी ॥

कशिं फुलें डंवरलीं असतीं।
किती अलंकार त्यापुढती ॥ बहुपरी ॥

भुवरी। जन्म घे तरी। वास जनशिरीं।
कसा हा मिळवी ।
जनमनें कशानें वळवी ॥ वद तरी ॥१ ॥

आई- मधुवासें प्रिय हा सकलां ।
स्वगुणांनी तूं हो बाळा ॥ त्यापरी ॥

हा धवलत्वें सुंदरसा।
चारित्र्यें शोभे तैसा ॥ तूं तरी ॥

हा दिपवी जसा नगभारा।
तेज तूं लोपविं धीरां ॥ त्यापरी

यापरी। वागशिल जरी। सकल जन तरी
तुजसि मम तनया।
शिरि धरतील हारासम या ॥ कधिं तरी ॥

- १९०३, पुणे.

# काळ

कोठें असे सकलपंडितमुख्य भोज?
कोठें शिकंदर जगद्विजयी सुराज?
कोठें स्वधर्मपरिपालक श्री शिवाजी?
कोठें तदीय यशवर्धक वीर बाजी? ॥१॥

ते राजकारणपटूत्तम धीट नाना
कोठें न का दिसति ओढित कोण त्यांना?
लोकैकवीर रणधीर मुरारबाजी
कोठें लपोनि बसले कळतें न आजी ॥२॥

कोठें असे मयसभा स्पृहणीयशोभा?
निस्तेज का मज कथी पृथुची यशोभा?
धारा कुठे सकळ लोक ललामभूता?
तें हस्तिनापुर कुठे हरि ज्यास त्राता? ॥३॥

गेले कुठे सुकवि जे प्रिय शारदेशी?
नेले कोणी अखिल भारतसंपदेसी?
गेले कुठे बहुल वैभव पेशव्यांचे?
व्यापार-कौशल कुठे लपलें चिनाचें? ॥४॥

कां मृण्मया बनलि रोमकराजधानी?
कां ग्रीकराष्ट्रमहतीहि न येत कानी?
केले कुणी परमदीन दमास्कसाते?
नेले कुणी मिसरच्या सुयशोधनाते? ॥५॥

वाजीगजादि नवरत्नसुजातकोष,
प्राचीन वैभव नितान्त तसे अशेष;
स्तंभादि वीरजयसूचक वरतुजात
केले कुणी सकल हे स्मृतिमात्र ज्ञात? ॥६॥

स्थित्यंतरा करित कोण असा विदेही?
की नामरुप गुणवर्णन त्यास नाही?
छे; सर्व हे विथत; नाम तयास आहे-
तो 'काळ' जो करितसे स्थितिभेद बा हे ॥७॥

- १९०३, पुणे.

## कोणी कोणास तरी

(आपल्या रुपाचाच अभिमान धरणाऱ्या एका आचरटास उद्देशून.)
(चालः श्री हरीच्या वेणुनादे)
तुज बघुनी वाटते की भ्रम पावे विधिमती
पुरुषांते अर्पि कसा मधुरा ही स्वाकृति।
कोमलता, वर्णशोभा; तनु तनुला ही अति
जरी असती स्त्रीप्रती सार्थकता पावती॥१॥

- १९०५, पुणे.

## सगुण स्वरुप

(पंढरीस पांडुरंगाची पायभेटी झाली त्या वेळी या चार पाकळ्या अर्पण केल्या होत्या.)

(चालः नाहि सुभद्रा या वार्तेते)
धन्य पंढरी ! धन्य भीवरा ! धन्य चंद्रभागा !
भक्तांसांठी वैकुंठीचा नाथ जिथे जागा॥धृ॥

स्वानंदाचा गाभा, शोभा ब्रह्ममंडळाची।
वैरागरिचे रत्न मनोहर, आशा पुण्यांची॥
कैवल्याचें निधान केवळ, माता संतांची।
तो प्रभु झाला सगुण सांवळा गोकुळिंच्या रंगा॥धन्य.॥१॥

भक्तराज तो पुंडलीक या जगी एक जाणा।
हांक जयाची ऐकुनि धावे लक्ष्मीचा राणा॥
करावयास्तव जगत्रयाच्या अखंड कल्याणा।
कटि कर, समपद, विटेवरी करि उभा पांडुरंगा॥धन्य.॥२॥

स्वच्छंदे सच्चिदानंदपद रमे वाळवंटी।
'जय जय विठ्ठल' नाद एक हा संतांच्या कंठी॥
पहावया स्वानंदेसोहळा सुर करिती दाटी।
'पुडंलीकवरदा हरि विठ्ठल' रंगवी दिग्भागा।।धन्य.॥

- १९०८. महाद्वार पंढरी.

# नट मित्रास पत्र*

**दिंडी**

ज्येष्ठ बंधो! साष्टांग नमस्कार !
बांधवाचा घे आधिं गुणाधार।
मान्य करुनि ही विनंती विशेष
वृत्त ऐके सप्रेम मम अशेष॥१॥

पत्र पुर्वी तुज पाठविलें त्याचें
त्वरे प्रत्युत्तर खास यावयाचें
असे आधी घेतले मन्मनाने
परि ठरले भलतेच अनुभवानें॥२॥

पाहुनियां परि गद्य पत्र यांचे
कठिण तुमचे मन, कठिण द्रवायाचे।
शब्दसुमनांचा म्हणुनि करुनि झेला
पाठवी मी; हा तरी वरिच झेला॥३॥

जरा तुमच्या मी दृष्टीआड होता
सृष्टिआडहि झालोच काय आतां?
वाढलें जरि अंतर स्थळाचे
काय प्रेमातही तेच व्हावयाचे? ॥४॥

आळसाने कां हा प्रकार झाला ?
पात्र किंवा मी नसे उत्तराला?
राग अथवा का अजुनि नाही गेला?
प्रेमसिंधुच की मुळी शुष्क झाला? ॥५॥

निकट असता जो स्नेह दाखवीला
भासला तो ते सत्य मन्मतीला।
आजि कळला परि खरा अर्थ त्याचा
मासला की तो तुझ्या अभिनयाचा ! ॥६॥

खरा नट तू, रे नटवरा, खराच
तारतम्याचे ज्ञान परि न साच।
अभिनयाची तुज शक्ति तर असावी
समय पाहुनि ती परी दाखवावी॥७॥

रंगभूमी अभिनये भूषवावी
तीच वृत्ती सर्वत्र परि नसावी।
कालपट जरि दृष्टीस आड आला
तरि न विसरावे कधी मित्रतेला॥८॥

एकट्यासचि तुज दोष देत नाही
वृत्ति सर्वांची हीच दिसत पाही।
काहि काळें भेटतां तुम्हां कोठें
ओळखीसहि विसराल असे वाटे॥९॥

ओघ कवितेचा येथवरी चाले
पत्र तुमचे इतक्यांत हेच आलें।
खिन्न माझे मन सु-प्रसन्न होत
प्रवाहाचा बदलुनी रोख जात॥१०॥

पुढिल कार्यक्रम अजुनि ठाम नाही
परस्वाधिन ही गोष्ट असे पाही।
छत्रपतिच्या पत्रांत परि तयाचा
काही केला उल्लेख तोच वाचा॥११॥

लेखनाचें कौशल्य फार माझे
तुझा उपहासच त्यास योग्य साजे।
लिहित बसणे तुम्हांस नित्य पत्रे
लेखनाचें कौशल्य हेच सारे॥१२॥

असे वरचेवर पत्र पाठवावे
आणि प्रकृतीतें नित्य जपत जावे।
उण्या-अधिकाचा राग नच धरावा
भूतकालासह तोहि भूत व्हावा॥१३॥

बहुत लिहिणे वद काय याहुनीहि
विनति नित्याची लोभ असावा ही।
काव्यदेवीतें द्यावया विराम
घेइ आज्ञा---

आपला--
मित्र
'राम'॥१४॥

## ओवी

मुक्काम-नागपूर शहर
वार-पवित्र गुरुवार।
तारीख-एकोणीस नोव्हेंबर
एकोणीसशें आठची॥१॥

-१९ नोव्हेंबर १९०८,नागपूर.

# अल्लड प्रेमास

क्षणभर वेड्या प्रेमा थांब !
अधिर मनासह जासी कोठें?
चुकशिल--संकटि पडशिल वाटे,
जग हे सारे बा रे खोटे !
हृदय सोडुनि; गड्या म्हणूनी, जाई न कोठे लांब !
क्षणी पांढरा,क्षणीच काळा,
रंग आवडे असा जगाला,
ठाव तयाचा कुणा न कळला !
खुळ्या तुलाची, अशा जगाची, कळेल का कृति सांग?
जग सगळें हे देखाव्याचें !
गुलाम केवळ रे स्वार्थाचें !
स्मशान की हे शुद्धत्वाचें !
शुद्ध भाबडे, सरळ रोकडे, अशांत करिशिल काय?
प्रेमा येथे शपथ लागते !
प्रासावाचुनि कविता अडते !
कर्त्यावांचुनि कार्यही घडतें !
देव बिचारा, तया न थारा तुझी कथा मग काय?
तुझ्यासारखा तुला सोबती---
मिळेल का या अफाट जगतीं?
-- संकुचितहि हें अफाट जरि अति--
आणि न मना, अशी कल्पना, अगदी भोळा सांब !
कोणी तुजला मानिल खोटे,
तिरस्कारहि दिसेल कोठें,
अपमानाचेही भय मोठें,
बाग जगाची, ही न फुलाची, काटे जागोजाग !
टाकिल कुणि तुज धिक्काराने,
रडविल किंवा उपहासानें,
फसविल नकली की मालाने,
कोणी भटकत, उगाच रखडत,फिरविल मागोमाग !
म्हणुनि लाडक्या ! कुठे न जाई,
या हृदयांतचि लपुनी राही,
योग्य मित्र नच सुख तरि नाही !
कुसंगतीहुनि, वेड्या ! मानीं, फार बरा एकान्त !

- १९०९

# केशवसुत मेले ?

जगतास जागवायाला     केशवसुत गाउनि गेले !
इंग्लंद भूमि शेलेची     माहेर जडाचें बनले,
सन्देश गूढ जे त्याचे     तैसेच मानसीं जिरले,
तपोवना मानवतेच्या     या बघतां मानस हंसले!
देवाचे हेतु न पुरले,
अर्धेच कार्य जे उरले,
ते येथे करुनी गेले,
अवतरुनी फिरुनी शेले !     केशवसुत गाउनि गेले!

एकेका शब्दें भरले     काव्याचे अद्‌भुत पेले !
ज्यांसाठीं मानव झटले,     ते सुधाकुंभ भरलेले--
वाग्देवी वरुनी टाकी     केशवसुतहृदयी झेले!
अनुभवुनि निजानंदाने
मग त्यांचे केले गाणे,
श्वासाच्या कारंज्याने
चहुंकडे उधळुनी दिधले!     केशवसुत गाउनि गेले !

हे तुषार पडतां अंगी     बिंदूंचे सिंधू झाले!
निजलेल्या जागृति आली, हो ताजें जें थकलेले!
मरणासचि आले मरणें,     मग केले त्यानें काळे!
तों शब्द मुक्याला सुचले !
गूढास रूप सापडले !
स्वच्छंद अचेतन हाले !
नश्वर ते ईश्वर केले !     केशवसुत गाऊनि गेले !

भेदभाव विलया गेला,     सूक्ष्मात स्थूल मिळाले !
गगनाचे फाटुनि पडदे     दिसलें जें त्यापलिकडले !
मरणाचे मूळच तुटले,     जन्माचे नाते सुटले !
वस्तुंत वस्तुपण भरलें,
जीवंत जीवही झाले,
आत्म्यास आत्मपद आले,
ब्रह्महि ब्रह्मसे ठरले !     केशवसुत गाऊनि गेले !

कळले की 'आम्ही कोण !,  'हरपले श्रेय ' सापडलें;
आत्मा हो 'वेडापीर',  सृष्टीत ' भृंग ' सा रंगे;
मारुनिया 'गोंफण' काळा निज 'निशाण' नभिं फडकविंले !
ऐकताच विजयि 'तुतारी'
हो चिरंजीव 'म्हातारी'
मग वाजविताच 'सतारी'
सर्वत्र 'झपूर्झा ' झाले !  केशवसुत गाउनि गेले !

या स्थितीत त्या ब्रह्माची  ब्रह्माशीं मिळणी घडली,
जे चिरंतनाच्यासाठी  सांगता तयाची झाली.
परि जनता वेडी कुठली,  '' केशवसुत मेले '' वदली !
परि जन्ममरण हे वारे
कल्पनाच नाचवि सारे !
मूर्खानों ! रडता का रे,
की ''केशवसुत ते मेले ! '' केशवसुत गाउनि गेले !

जे एकाठायी होते,  ते सर्वांठायीं भरले;
सर्वांच्या हृदयीं भरले  सर्वांच्या जीवी भिनले;
विश्व स्थिर ज्यांनी केले  का वदता तेच निमाले?
लीलेनें त्यांनी गातां
ही सजीव केली जडता,
अणुरेणूंमधुनी आतां
निघतील तयांचे चेले !  केशवसुत गाउनि गेले !

सर्व ठायि सर्वही काळी  सर्वांनी त्यास पहावें,
पाहतां पाहतां वाटे  डोळ्यांनी ज्यास गिळावें,
तो विषय होई मरणाचा  जन बोले काय करावें ?
जे चकव्यावाचुनि चकले,
जरि ते कुणि कांहीं भकले,
तरि 'गोविंदाग्रज' बोले
केशवसुत कसले मेले?  केशवसुत गातचि बसले !

**लेखनकाल** : १९ फेब्रुवारी १९११.  **प्रसिद्धीकाल** : ऑगस्ट १९१३.

# श्रीमत् राजाधिराज पाचवे जॉर्ज हिंदुस्थानचे बादशहा यांच्या राज्यारोहणानिमित्त पदे

### ( अभिवादन करीत)

अभिनंदन करीतो प्रांजली । मंगल काली ॥ धृ ॥
प्रजाजनांच्या मंगल वचनी ॥ वाद्ये वाजति सकलहि भुवनी ॥
शुभलग्नी सुमनोहरांनी ॥ श्री वसुंधरा तुज वरुनी ॥ पावन झाली ॥१ ॥
पितामहीसम अमरसुखाते ॥ सेवि भूवरी त्रिभुवननृपते ॥
जी शोभा दे तव जनकातें । शांत वृत्तिला त्या हाते ॥ बसवी भाली ॥
क्षमादयागण किरणी रमवी । सदाही भूपा वसुधा देवी ॥
जन सारे सदया करि तेवी । तव कृपाचंद्रिकाजाली ॥ वैभवशाली ॥

### (दावर दादार)

विनती नाहिं इतर कांही, सदाहि स्वजनकसम तूंहि पाहिं नाट्यकलानिरत जनां कृपेक्षणांही ॥धृ ॥ कुंठित गति होति न जरि नृपकरिं ॥ ललितकला सकला ॥ भूपाल तरि तयाला ॥ द्रुततर गति वितरुनि अति पसरवि यश दशदिशांही ॥१ ॥ चंद्रबिंब कांति पसरि जगभरि ॥ तिमिर जी निवारी ॥ होई न तापकरी ॥ शमधन जनिं उधळि सतत तदमृतकण निजकरांही ॥२ ॥

- २२ जून १९११, पुणे.

# स्मृतिगीत

(माझ्या 'प्रेमसंन्यास' नाटकांतील नायिकेच्या तोंडी हे गाणे ठेविले आहे. उत्तररामचरित्रातील 'तेहि नो दिवसा गताः' एतदन्त सुप्रसिध्द श्लोकाची लीलेच्या-नायिकेच्या - कोमल हृदयावर पडलेली ही विततच्छाया आहे अशी कल्पना करून तिनेच हे गाणे जोडले आहे असे दाखविले आहे. एरवी भाषांतर करण्याची माझी इच्छा नव्हती.)

**(चाल : चंद्रकांत राजाची)**

आठवतो का सांग, सखे! तो काळ विवाहाचा
बाळपणाचा, मुग्धपणाचा, निर्मळ भावाचा?
संसाराचे चित्र चिमुकले, चिमुकलेच जीव
फुलले नव्हते हृदयाचेही राजस राजीव !
पाहत होते तात तदा त्या लीला बालांच्या,
जणुं आठवती त्यांसहि लीला त्याच सुकालाच्या।
जपति परोपरी प्रसन्नहृदया पुण्यमया माता।
गेले ते दिन, सीते, यापरि, हा ! बघतां बघतां॥

बाळपणीचे प्रसंग जणुं ते घडति आज फिरुनी
चित्रपटा या अश्रुजलाने चल टाकू धुवुनी।
तू सीता ती; राम तोच मी; त्याच आज माता।
परि जे गेले दिन ते आता येतिल का हाता?
कशास आशा नसती आता-झालें तें गेलें !
सुकले फूल न देत वास जरि अश्रुंनी भिजलें !

- १९११

# गुलाबी कोडे

(संध्याकाळी सूर्य पश्चिम दिशेस असताना पश्चिम तर तांबडी होतेच ; पण पूर्व दिशेवरहि त्याच रंगाची छटा दिसते, हे पुष्कळांनी पाहिलेच असेल.)

रंग गुलाबी संध्या पसरि पश्चिम दिग्भागी,
समोर पूर्वा स्वमुख रंगवी त्याच रम्य रंगी.
परी पश्चिमाहृदयि तांबडे सुर्यबिंब विलसे,
कशी रंगली पुर्वा याचें कारण काहि नसे.
विनोदचतुरा मुग्धा बाला विचारी निज नाथा,
''शास्त्रज्ञा, पंडिता, उलगडा हे कोडे आता !
अपरा वदनी रमते लाली रविसहवासाने,
रवि नसता परि का रंगावे प्राचीच्या वदने?
रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली?
ही जादूची नजरबंदि कुणि कधी कशी केली?''
विनोदपंडित पति कौतुकला, हसे तसा थोडे;
ओठ गुलाबी, गाल गुलाबी, गुलाबीच कोडे !
वदे तिला,''हे रहस्य असले कथीन कानांत !''
करि कंठी कर एक, दुज्याने धरि दुसरा हात!
ओढुनि जवळी, ऐकविला तिस मुकाच कानात,
--- गालावरचे गीत कसे ते वठवू गानांत !
दूर सरकता लज्जित बाला, प्राणनाथ बोले
''बघ हृदयाच्या आरशांत जे चित्र तुझे डोले !
रविबिंबासम चुंबन-बिंबचि विलसत या गाली !
सहज तयाची छटा गुलाबी पसरे भवताली.
चुंबनचित्र न परि उमटता या दुसऱ्या गाली,
सांग वल्लभे ! नाचतसे कां त्यावरिं ही लाली !
रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली?
ही जादूची नजरबंदि कुणि कधी कशी केली?''
'' काट्याने काढावा काटा '' शास्त्रज्ञा ठावे,
गुलाब टाकुनि गुलाबास मग का नच उडवावे ?
ही हृदयाची कोडी सोडवि हृदयाचा मेळ,
शास्त्रांना हा कसा कळावा हृदयाचा खेळ !
ओठगोष्ट मग कशी बोलली ती मिटली तोंडे,
'गोविंदाग्रज' रसिकां टाकी गुलाबीच कोडे !

- सप्टेंबर,१९११

# मनांतली पाल

(काही विचार मनांत आला आणि तितक्यात पाल चुकचुकली म्हणजे मनाला धक्का बसतो; तसेच काहीही अलौकिक करावयास जा, आधीच कसेसें वाटते!

**(चालः कसे मी मारु ? माझे नवलाचे पाखरु)**

करितां कार्य। चुकचुके पाल ही वायां ॥धृ॥
क्षणैक भरते भलते वारे। संभ्रमि बुडते जग हे सारे।
कारागृहिंची उघडति दारे । समयि अशा या॥
चुकचुके पाल ही वायां ॥१॥

सजीवतेची उकळी फुटते। बेडी पायामधली तुटते।
नसती लाज जनाची सुटते। तोच भिववाया।
चुकचुके पाल ही वायां ॥२॥

ओळख निजरुपाची पटते। क्षणभर भेकड वृत्तिहि हटते।
शक्तिही सर्वस्वाने नटते। जीव तो घ्याया।
चुकचुके पाल ही वायां ॥३॥

दृष्टिही अनंत ठायी शिरते। बघता बघता उलटी फिरते।
चहूकडे वा ठायिच जिरते। विरते माया।
चुकचुके पाल ही वायां ॥४॥

मर्यादेच्या सीमा सरती। अणूंत सर्वस्वाची वसती।
'मी तूं' शून्यामाजी रमती। वायुमय काया।
चुकचुके पाल ही वायां ॥५॥

जडतां पारदर्शि जो होई। स्फूर्तिस पद अवकाशहि देई।
कल्पकता जडरुपा घेई। ब्रह्ममय माया।
चुकचुके पाल ही वायां ॥६॥

अंधुक जे जे लखलखते। 'असते' सहजचि हाती बसते।
नसते तेहि मग दिसते। ठाव ना शून्या।
चुकचुके पाल ही वायां ॥७॥

होतो सुखी सदा ज्या गावी। पुन्हा आठवण त्याची व्हावी।
नसती ब्याद टाकुनि द्यावी। निघावें जाया।
चुकचुके पाल ही वायां ॥८॥

न दिसे कोठे अंतःकरणी। नाही तैशी वातावरणी।
नाही कधी पाहिली कोणी। ज्या त्या ठायां।
चुकचुके पाल परि वायां ॥९॥

न कळे चांडाळिण ही कुठली। निशिदिनि अडवायातें उठली।
कर्तव्याची चालच खुटली । मार रे मार।
पाल ही प्रभो अनिवार ! ॥१०॥

## पहिले चुंबन

( पहिले फूल, पहिले मूल,- सर्व काही पहिले म्हणजे पहिलेच ! तसेच पहिले चुंबन ! पहिल्याची अजब जादू दुसऱ्यात नाही !)

(चाल : श्रवणात पेरणि केली इ.)

जें मनास शिवले नाही । ठावे न कल्पनेलाही। सुख असे।
जे दिसे न कवण्या जागी। जे अवर्ण्य वाणीलागी। सुख असे।
कविताही प्रतिभाशाली। कल्पितां जयातें थकली। सुख असे।
एकदा । कष्टता सदा। पुढति नच कदा- ।
अनुभवा येई । ते पहिले चुंबन देई । सुख असे ॥१॥

चित्रासह रमणी बसली। नवयौवन शोभा ठसली। तन्मुखी।
करि ठेवुनी कोमल गाला। करि विचार न कळे कसला। सारखी।
डोले न अथवा हाले । मग कुठले बोले चाले। चित्र ते।
रंजना। मुग्धयौवना। करित कल्पना।
भावी कालाची। (तुज ठावे) त्या दिवसाची। दिवस तो॥२॥

चित्र हे पाहुनी असले। नेत्रांचे सार्थक झाले। वाटले।
परि तरंग अद्भुत उठले। अनुभवा न पूर्वी आले। जे कधी।
जाउनी चोरट्या चाली। झाकिले नयन करजाली। न कळता।
संभ्रमे। दचकली गमे। त्वरित विभ्रमे।
श्रमवि कर दोन्ही। काढाया नयनावरुनी । मम करा॥३ ॥

तो बघुनी उघड्या गाला। उन्माद मानसी भरला। स्वैरसा।
संमोह पडे नयनांला। मज विसर जगाचा पडला। क्षणभरी।
ठेवुनी मुख सखीच्या गाली। आणिली गुलाबी लाली। त्यावरी।
हासली। फार लाजली। दूर जाहली।
एक निमिषांत। झिडकारुनी माझा हात। हसतची॥४॥

हा खेळ एक निमिषांचा। एकदाच अनुभव त्याचा। नच पुन्हा।
ते वारे आले गेले। जन्माचे सार्थक झाले। परि गमे।
ते निमिष, स्थिती ती, सुख ते। चित्ताच्या दृष्टिस दिसते॥ सारखें ! ॥
स्वानंद - कमलमकरंद। सुधानिस्यंद।
भूवरी आणी। जे वर्णावे ते कोणी । सुख तसे॥५॥

एकदाच अनुभव त्याचा । आरंभ अंत सौख्याचा। एकदां।
आयुष्य न त्याला क्षणही। जन्मही पुन्हां त्या नाहीं। एकदा ।
मनि चटका लावायासी। पाठवी दैव जणु त्यासी। एकदा।
निशिदिनी। वाटते मनी नित्य जन्मुनी।
मरण सोसावे। परि पहिले चुंबन घ्यावें। फिरुनिही॥६॥

- एप्रिल, १९१२.

# आंधळ्याची माळ

रानोमाळ। आंधळ्याची चाले माळ॥धृ॥
दृष्टि न यातील एकालाही। एकामागे दुसरा जाई।
अर्धा डोळस रस्ता दावी। करी सांभाळ। आंधळ्यांची .....॥१॥

तुकड्यासाठी करिती ओरड। पैशासाठी सारी धडपड।
तोंडी हरिनामाची बडबड। हाती टाळ । आंधळ्यांची .....॥२॥

यांना साजे नाव भिकारी। थोड्यासाठी लोचट भारी।
धरुनी धरणे बसती दारी। उठवि कपाळ। आंधळ्यांची .....॥३॥

यांना दिसते केवळ 'आज'। नाही काही 'उद्या'ची लाज।
मिळेल कैशी अगदी बांझ। सायंकाळ। आंधळ्यांची .....॥४॥

येईल 'उद्या' जरी एखादी। ठेवू दृष्टि मिळवुनी आधी।
न तरी येईल ही कर्मामधि। पुन्हा जंजाळ । आंधळ्यांची .....॥५॥

अशा बिचारे देवापाशी। मायाति कधी ही दृष्टि न खाशी।
काय म्हणावे या मुर्खांशी। प्रभो सांभाळ। तूच ही आंधळी माळ॥६॥

- मे, १९९२

# एखाद्याचे नशीब

काही गोड फुले सदा विहरती स्वगागनांच्या शिरी,
काही ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद हृन्मंदिरी ;

काही जाउनी बैसती प्रभुपदीं पापापदा वारि ते ;
एकादें फुटके नशीब म्हणुन प्रेतास शृंगारिते !

कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरि हेमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला ;

कोणाला वनदेवता वरितसे मोदांत जी नाहते,
एकाद्यामधुनी परंतु जळती ज्वालानदी वाहते !

झाडें जोडुनी पत्रयुग्म फुटले मेघांप्रती याचती,
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती;

सारी पालवती, फुलें विहरती, शोभा वरी लोळते,
एखाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !

चाले खेळ असा जगांत; बहुधा सौख्यांत सारे जरी,
एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवी यापरी

पाही कोण अशा हताश हृदया? जो तो असे आपला,
देवा ! तू तरि टाकि अश्रु वरुनी, त्यासाठी तो तापला !

- जून, १९१२.

# राजहंस माझा निजला !

(पतिनिधनानंतर अल्पावधीतच बापडीवर एकुलत्या एक मुलाचे निधन पाहण्याचा प्रसंग आल्यावर असा भ्रम होणार नाही?)

**(चाल- उध्दवा शांतवन...)**

हे कोण बोलले बोला?
'राजहंस माझा निजला !'
दुर्दैवनगाच्या शिखरी। नवविधवा दुःखी आई !
ते हृदय कसे आईचे। मी उगाच सांगत नाही !
जे आनंदेही रडतें ! दुखाःत कसे ते होइ —
हे कुणी कुणा सांगावें !
आईच्या बाळा ठावें !
प्रेमाच्या गांवा जावें--
मग ऐकावे या बोला। 'राजहंस माझा निजला !'

होउनी कळस शोकाचा। भ्रम तिच्या मानसी बसला।
मग हृदय बधिरची झाले। अति दुःख थिजवी चित्ताला।
ते तिच्या जिवाचे फुल !
मांडीवर होत मलूल !
तरि शोके पडुनी मूल—
वाटतची होते तिजला।'राजहंस माझा निजला'

जन चार भोवती जमले। मृत बाला उचलायाला।
तो काळ नाथनिधनाचा। हतभागि मना आठवला।
तो प्रसंग पहिला तसला। हा दुसरा असा असला।
ते चित्र दिसे चित्ताला !
हे चित्र दिसे डोळ्याला !
निज चित्र चित्तनयनाला,
मग रडुनि वदे ती सकला। राजहंस माझा निजला !

करु नका गलबला अगदी। लागली झोप मम बाळा !
आधिच झोप त्या नाही। खेळाचा एकच चाळा।
जागताच वाऱ्यासरसा। खेळाचा घेईल आळा।
वाजवूं नका पाउल !
लागेल तया चाहुल !
झोपेचा हलका फूल !

मग झोपायचा कुठला ! राजहंस माझा निजला ।

हे दुध जरासा प्याला। आतांसा कोठें निजला।
डोळ्याला लागे डोळा। कां तोच भोवती जमला?
जा ! नका उठवु वेल्हाळा। मी ओळखतें हो सकला !
तो हिराच तेव्हा नेला !
हिरकणीस आता टपला !
परि जिवालिकडे याला–
लपविन ! एकची सरला ! राजहंस माझा निजला!

का असले भलते सलते। बोलता अमंगळ याला?
छबकड्यावरुनि माझ्या या। ओंवाळुनि टाकुनि सकलां।
घेतें मी पदराखाली। पाहुच नका लडिवाळा !
मी गरिब कितीही असले।
जरि कपाळ माझे फुटले।
बोलणे तरिही असले —
खपणार नाही हो मजला ! राजहंस माझा निजला !

हे असेच सांगुनि मागे। नेलात जिवाचा राजा।
दाखविलाही फिरुनी नाही। नाहीत कां तुम्हां लाजा?
हा असा कसा दृष्टावा?
कोणत्या जन्मिचा दावा?
कां उगिच गळा कापावा—
पाहुनी गरिब कोणाला। राजहंस माझा निजला।

हे काळे कुरळे केश। खेळतात डोक्यावरती।
ही दृष्टि पहा मम वदनी। नेहमी अशी ही असती।
हे तेज अशा रत्नांचे। झालें का आहे कमती ?
कानात नाचती डुल,
तोंडावर हंसरें फुल,
जीवाची घालुनी झुल -—
मी असाच झाकिन याला। राजहंस माझा निजला !

या अर्ध्या उघड्या नयनी।बाळ काय पाहत नाही ?
याअर्ध्या उघड्या तोंडी। बाळ काय बोलत नाही?
अर्थ या अशा हसण्याचा। मज माझा कळतो बाई!
हे हसे मुखावर नाचे !

जणु बोल दुग्धपानाचे !
की मुक्या समाधनाचे !
इतुकेही कळेना कुणाला–। राजहंस माझा निजला !

या माझ्या मानससरसी। सारखे प्रेमजळ वाही।
त्या तरंगलहरींवरती। राजहंस पोहत राही।
सारखा पोहुनी दमला। मग मला भुकेला बाही !
नयनांच्या शिंपांमधुनी,
अश्रुंचे मौक्तिकसुमणी,
मी दिले तया काढुनी,
मोत्याचा चारा असला। राजहंस माझा निजला !

ते वैकुंठेश्वर गेले। पदि त्यांच्या अर्पायाला।
ही अखंड या अश्रुंची। वैजयंति मोहनमाळा!
मी करित असे केव्हाची। धरुनिया उराशी बाळा।
कौस्तुभ हा माळेमधला!
हृदयाचे कोंदण याला !
तो चोराया का आला?
दैत्याहुनि दैत्यची झाला ! राजहंस माझा निजला !

हे असे जाहले म्हणता। तरि देवचि निजला का हो?
जरि निर्दय होऊनि निजला। आळवीन फोडुनी टाहो।
की असा पोटाचा गोळा। पोटातची देवा राहो !
ही कुऱ्हाड आकाशाची,
मजवरती पाडायाची,
नाहीच कल्पना याची,
हा तुमचा कावा सगळा ! राजहंस माझा निजला !

जरि दूत यमाचे आले। लाडक्यास या न्यायाला।
ते निष्ठुर असले तरिही। भुलतील पाहुनी याला।
हृदयाचे होऊनि पाणी। लागतील चुंबायाला।
मी मुका असा घेताना—
हा पहा पुन्हा हंसलाना !
का अशा फिरवितां माना ?
सुख खुपे काय डोळयाला। राजहंस माझा निजला !
हे सर्वस्वाचे फूल। त्या भोवति झाला गोळा।
मी बघतें कधीच आहे। त्या वरती तुमचा डोळा!

एकदा करावा त्याचा। वादाने चोळामोळा!
सर्वांच्या मनिचा लाहो,
हाच ना? स्पष्ट बोला हो,
मी इतकी वेडी का हो–
की हेही कळेना मजला। राजहंस माझा निजला !

जरि होउ नये ते झाले। तरि सोडणार नाही!
पाळणाहि रुततो ज्याला। प्रेमे जरि निजवी आई!
तो देह खाच दगडांत छेः। नको नको ग बाई!
हृदयाची खणुनी खांच,
झाकिन मी बाळ असाच,
दुःखाचे फत्तर साच !
जा!जाउनि सांगा काळा। ‘ राजहंस माझा निजला !’

जरि काळाचाहि काळ। बाळाला न्याया आला !
तरि नाही मी द्यायची। या जीवाच्या जीवाला !
सारखी गाउनी गाणी। निजवीन कल्पवर याला!
जा ! करा आपुलें काळे!
माझेही दमले डोळे !
प्राणांचे पसरुनी जाळे —
मी निजते घेउनि याला! राजहंस माझा निजला !

सांगुनी असे सकलांशी। मृत बाळा उराशी धरुनी।
तन्मुखी स्वमुखी ठेवोनी। चुंबिले एकदा फिरुनी।
पाहिले नीट निरखोनी। झणिं तीही गेली निजोनी।
मग पुन्हा कधी ती उठली,
जाणीव कुणा ही कुठली?
परि मति या प्रश्ने हटली–
‘‘ बोलेल कोण या बोला। राजहंस माझा निजला !’’

मग माता पुत्रांवरि त्या। तरु गाळिती कोमल पाने।
ढाळिती लता निज सुमने। पशुपक्षिही रडति गानें।
दशदिशा दगडही कढती। मन दुभंगुनि शोकाने।
दुमदुमतें स्थळ ते अजुनिही,
त्या एकच करुणागानीं,
जा जाउनि ऐका कानी !
ऐकाल याच बोलाला – ‘ राजहंस माझा निजला !’

- जुलै, १९१२

# वेडा

( कुणाला कशाचे वेड लागेल आणि त्याचा शेवट कशांत होईल, हे कोणि सांगावे?)

वेडा कोणि जगास सोडुनि पळे बाहेर गांवाचिया,
मैदानात भयाण जाउनि उभा राही; न काही बघे

संध्यारंग नभःपटांत रमती गांवी न ते त्याचिया
वेडाचे नवरंग चित्तफलका रंगाविती; तेच घे.

त्याचें वेड कशांतुनी उपजले कोणास हे नाकळें —
त्याचे त्यासही नाकळें, मज गमे देवाही ना ठाउके !

त्याची ती विमनस्कता नच वदे काही जरी आगळें,
वेड्याच्या हृदयास आपण तरी कैसे म्हणावे मुके?

व्हावे काय तयास हे समजण्या रस्ता न काही उरे,
शून्या दृष्टि गमे तिच्यात दिसले कोणाविशीं प्रेम न !

तोंडाचा पडदा विकार विसरे; बेरंग सारा स्फुरे;
होते का मग भावशून्य नुसते ओसाड त्यांचे मन?

छेः! मैदान उजाड ते; तरि तिथे हा वायु आहेच ना?
वारे काही तरी तसे घुमविते ओसाड वेड्या मना!

(२)

तारा एक तशांत पश्चिम दिशा फोडुन बाहेरली
संध्या कुंकुमिं दिग्वधूच टिकली लावी रुपेरी जणू !

वेड्याने तिजला भकास नयनी येताचक्षणी हेरली;
हासे भेसुर तो; सवेंच अपुले हृदयगान लागे म्हणू !

वाटे की पटली तिला बघुनियी त्या खुण कांही तरी,
तोंडाच्या पडद्यावरी उमटले चित्तांतले खेळ ते!

काही वेळ तसाच पाहि तिजला; एकाग्रता खरी ती
अशा प्रीती तसेच वेड असले, यांनाच ती साधते !

तारा आड ढगा जरा क्षणभरी झाकुन राहे जर
वेड्याच्याही तरी विषण्ण वदनी काळीच छाया दिसे!

केला काही विचार – निश्चय; वठे तच्चित्र तोंडावर,
भासे दीपसम स्मशानतिमिरीं ते निश्चयाचें पिसे!

नैराश्यादि विकार तीव्र करीती हा खेळ ऐसा पहा –
आश्चर्ये बघती तयास थिजले डोळे दिशांचे दहा!

३

किंचित मस्तक हलवी; पुटपुटतचे तोंडातची काहीसे
तारास्थानपथे सवेग मग तो चालावया लागला;
हाती तिस धरीन-निश्चय दिसे; धावें पुढे ते पिसे!'
टाकि सारखी पाउले झपझपा; नाही मुळी भागला!
काळी घोर निशा; उदास हृदयी तैशी निराशा जडे–
तारा तारक त्या तमी; मनि जसा तो एक आशाकण,
पायांखालुनि जाति डोंगर नद्या – पाही न मागे पुढें;
वर्षे कैक असाच चालत तरी लाभे न तारांगण !
वेडा यापरी जातजात पुढतीं झाला कुठें नाहीसा !
तारा ती दिसते अजून! परि हो पत्ता तयाचा कसा!
काळाच्या उदरी कधी भटकता कोणा कुठेही कसा
वेडा सांपडतां, कथा मज- पुढे झाले तयाचे कसें?
त्याचे वेड तरि कोणास मिळतां द्या ते मला आणुनी;
माझ्या जी मनिं चांदणी चमकते, जाईन तीमागुनी!

- ऑगस्ट, १९१२.

# मुरली

(प्रीति, भक्ति आणि मुक्ति या भावयोगाच्या तीन पायऱ्या आहेत. प्रीतीच्या परमोच्च स्थितीवरच भक्तीचे पाहिले पाउल उमटून भक्तीच्या मोकळ्या भरारीत भक्त -भगवंताचे पूर्णैक्य होत असते. हे दाखविण्यासाठी स्त्रीहृदयाचे प्रेमळ रहस्य ओळखून भागवत कवींनी 'राधा गौळण ' कृष्ण परमात्म्यासमोर उभी केलेली आहे जगाच्या भूतकाळात भोळ्या भाबड्या भक्तिप्रीतीच्या संयोगाचे इतके ठळक चित्र या व्यतिरिक्त इतरत्र सापडणार नाही. म्हणून या गीतात राधारुपाने भक्तजीवात्मा दाखवून प्रीतिभक्तीच्या बदलत्या सीमारेषेवर त्याची स्थापना केली आहे. मनुष्याच्या आयुष्यात असा एक काळ एकदा तरी येतोच की, ज्या वेळी ईश्वराचे अस्तित्व भावपूर्ण हृदयाला पटते. आणि तेव्हा मात्र, बुद्धिप्रधान मस्तकाचे समाधान करण्यासाठी तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराची - प्रत्युत्तराची - याचना करीत असतो. हे दैवी प्रत्युत्तर त्या योग्यवेळी मिळाले नाही म्हणजे मात्र मनुष्य पुन्हा भोवऱ्यात गुरफटतो. या गाण्यात अशा ईश्वरी उत्तराला ' मुरलीध्वनि' कल्पून त्यासाठी झुरणाऱ्या राधेच्या पाच चढत्या स्थिती (कडवी १४।१८।२१।३२।३७) दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे–)

' गोविंदाग्रज'

ही एक आस मनि उरली ॥
कन्हय्या ! बजाव बजाव मुरली ! ॥धृ॥
जरि फुटले दोन्ही कान ॥ नच राही भूक तहान ॥
तिळभरही नुरलें भान ॥
बघ वृत्ति वृत्तिमधि मुरली ॥ कन्हय्या ! बजाव. ॥१॥

कां गाणे मजला व्हावे ॥ चित्तासहि नाही ठावे ॥
दृष्टिला केवि दिसावे ॥
मम आस नसे परि पुरलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥२॥

मी अगदी भोळी राधा ॥ तू माधवजी ! नच साधा ॥
मोहिनी करी सुखबाधा ॥
तुज दासी विनवुनी झुरलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३॥

चांदणे चहुकडे खुलले ॥ फत्तरही सारे फुलले ॥
आनंदे विश्वही झुलले ॥
स्फूर्तीच त्यांत तव शिरली ॥ कन्हय्या ! बजाव. ॥४॥

तीनेच शब्द मम निघती ॥ जग फिरुनि, फिरुनि मनिं रिघती ॥
मज आता दुसरी न गति ॥
जगतीच सारी जणु जिरलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥५॥

अणुरेणुहि देही स्वैर ।। भिन्नता विसरली वैर ।।
अब नंदलाल ! कर खैर ।।
प्रेमाची दुनिया उरली ।। कन्हय्या ! बजाव. ।।६।।

बुद्धीचा तुटला धीर ।। आशामय होय शरीर ।।
जलि बुडे जलधिचे तीर ।।
बघबघता दृष्टिहि विरलि ।। कन्हय्या ! बजाव. ।।७।।

कथु काय काय मज वाटे ।। आनंद मात्र मनि दाटे ।।
तरुशिरी मूळ उफराटे ।।
शून्यात परार्धे भरलि ।। कन्हय्या ! बजाव. ।।८।।

जन्माचे झाले चीज ।। कायमची मेली नीज ।।
विश्वाचे गवसे बीज ।।
चिद्‌वृत्ति त्यात अवतरलि ।। कन्हय्या ! बजाव. ।।९।।

मायेची मेली बिजली ।। परि खऱ्या जली ती विझली ।।
तीव्रता तिथेची थिजली ।।
सुकलेली विश्वे भिजलि ।। कन्हय्या ! बजाव. ।।१०।।

कोसळति सरीवर सरी ।। लहरींवर उठती लहरी ।।
अश्रूंची गरदी भारी ।।
अवकाशे तुडुंब सगळि ।। कन्हय्या ! बजाव. ।।११।।

पुष्पाविण येई वास ।। वाऱ्याविण चाले श्वास! ।।
हर्षविण आता हास ।।
मरणाविण सुटका झाली ।। कन्हय्या ! बजाव. ।।१२।।

ब्रह्मगोल त्वन्मय झाला ।। चहुकडेच मुरलीवाला ।।
त्वद्‌रुप गोपिकाबाला ।।
मी मला शून्य या कालि ।। कन्हय्या ! बजाव. ।।१३।।

सावळ्या यशोदाबाळा ! बंधाला पडला आळा ।।
स्वैराचा वाढे चाळा ।।
बावरी राधिका बनलि ।। कन्हय्या ! बजाव. ।।१४।।

किती करु कन्हय्या ! वावा ।। गा, नाच, वाजवि पांवा ।।
त्यांतच हा जीव विरावा ।।
यावाचुनि इच्छा नुरलि ।। कन्हय्या ! बजाव. ।।१५।।

एकेका ऐकुनि सूर ।। दुःखाचा हो जरि चूर ।।
सारखी तरी हुरहूर ।।

न कळे ही लागे कसलि ॥  कन्हय्या ! बजाव. ॥१६॥

तू मनातला चंडोल ॥ मग माझ्या मनिचे बोल ॥
जरि हृदयी लपले खोल ॥
तरि खोल हृदय या कालि ॥  कन्हय्या ! बजाव. ॥१७॥

बोल, बोल तव विनमोल ॥ जीवाचे देइन मोल ॥
परि बोल एकदा बोल ॥
नातरी राधिका मुकलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥१८॥

फिर विश्वाचा हा गोल ॥ सांभाळुनि माझा तोल ॥
प्रेमाचा धरुनी सोल ॥
बघ मागुन राधा आलि ॥  कन्हय्या ! बजाव. ॥१९॥

मुरलीची प्याले भांग ॥ घडिघडी थरारे अंग ॥
या लहरि उठति का सांग ॥
आनंदवृत्ती पाझरलि ॥  कन्हय्या ! बजाव. ॥२०॥

उलगडति पीळ हृदयाचे ॥ जणु सुटति बंध देहाचे ॥
की जीव देहभर नाचे ॥
कुणिकडे राधिका भकलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥२१॥

ही लहर अशा देहाची ॥ हालचाल आनंदाची ॥
चेतनाच की जीवाची ॥
तुज भेटाया जणु आलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥२२॥

तिजमुळे होऊनि दंग ॥ वाऱ्यात तरंगे अंग ॥
अणुअणुही होति दुभंग ॥
त्यामाजि नादवी मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥२३॥

हृदयाचे ठोके पडती ॥ अवकाश त्यात जे उरती ॥
करि मुरलिरवाची भरती ॥
मग एकच धडकी सगळि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥२४॥

मुरलीचा मंजुळ नाद ॥ हृदयात खुलवि पडसाद ॥
मम जीवाची ही साद ॥
तुज हाका मारित सुटली ॥  कन्हय्या ! बजाव. ॥२५॥
सारखा मुरलि वाजीव ॥ अणुअणुसि देहि जीव ॥
त्यामाजि नाद गाजीव ॥
हृदयाचे पडदे उकलि ॥  कन्हय्या ! बजाव. ॥२६॥

जीवाच्या कमळा भुलवी ॥ निजगुंजारवि त्या डुलवी॥

पाकळी पाकळी खुलली ॥
झुलवी त्या पाडुनि भुरळि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥२७॥

कृष्णजी! त्यात तू भृंग ॥ त्यातच रे होई गुंग ॥
गुंजारव करि उत्तुंग ॥
ही मोहरात्र ओसरलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥२८॥

चांदणे खुले दिलरंगी ॥ हो एक नादरसरंगी ॥
पोहत मी स्वैर तरंगी ॥
बघ शुद्धबुद्ध मम हरलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥२९॥

या रसी देहकण न्हाले ॥ जो तो निजनादी डोले ॥
क्षणभरात सारे फुलले ॥
बघ फुले तयाची झालि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३०॥

करुनि त्या फुलांचा झेला ॥ जीवाचा छेलछबेला ॥
नटवीन कधी अलबेला ॥
झेला मज, आले जवळि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३१॥

श्रृंगाररसाने नटली ॥ तुज राधा रमवू झटली ॥
जन्माची ओळख पटली ॥
कृष्णात राधिका रमलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३२॥

वाकड्या अधरि हा पावा ॥ वाकडाच डोळा डावा ॥
किती वेळ असाच पहावा ॥
अब खेल करो वनमालि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३३॥

श्वासे मज हृदयी भरवी ॥ नादे की ओढुनि नेई ॥
चुंबने च की मज बनवी ॥
तव ओठांवरली लालि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३४॥

दृढ अलिंगन दे अथवा ॥ अवकाश न त्यात असावा ॥
एकरुप जीवाभावा ॥
तव देहि देह मम जिरवी ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३५॥

बघ आता घटका भरली ॥ बोलाची बोली सरली ॥
जीवाची भाषा हरली ॥
ठायीच वृत्तिही हरलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३६॥

जीवाचा पंची प्यारा ॥ मज आता दिससी न्यारा ॥
मुरलीचा पिउनी वारा ॥
चहुकडेच राधा झुकलि ॥ कन्हय्या ! बजाव. ॥३७॥

उरले न शीत वा उष्ण॥ काही न शुभ्र वा कृष्ण॥
एकरुप राधाकृष्ण॥
जयनाद गात ही मुरलि॥ कन्हय्या ! बजाव. ॥३८॥

चहुकडेच आता शांत॥ विश्व शांत, आत्मा शांत॥
कृष्ण शांत, राधा शांत॥
मुरलीत शांतता भरलि॥ कन्हय्या ! बजाव. ॥३९॥

भोगुनी तापमय उष्णा॥ मुरलिची लागता तृष्णा॥
जग गाइल राधाकृष्णा॥
ही साक्ष मनोमन मुरलि॥ कन्हय्या ! बजाव. ॥४०॥
ही अखंड मुरली वाजे॥ सर्वांच्या हृदयी गाजे॥
मग कोण वदाया लाजे?— ॥
'की धन्य धन्य ही मुरलि' ॥ कन्हय्या ! बजाव. ॥४१॥
त्या नादरसाचे प्याले॥ मनि 'गोविंदाग्रज' प्याले॥
शाहीर मुरलीचे बनले॥
मग गानि वाजविति मुरलि॥ कन्हय्या ! बजाव. ॥४२॥

- सप्टेंबर, १९१२.

# हृदयशारदेस

(कोणी कवीने आपल्या कवितेस ‘शब्दशारदा’ व प्रणयिनीस ‘हृदयशारदा’
अशी नावे देऊन म्हटले आहे.)

हृदयशारदे! या कवनाचे बोल ऐक माझे!
सरस्वती शब्दाची माझी तुजला जरि लाजे.

तुझ्या मनाचा, तुझ्या जिवाचा एक एक बोल,
मम कवितेच्या जादूलागी ठरवीलच फोल!

नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेली मने पुन्हा ताजी.

तिच्या गुणांवर कुणा कुणाचे जीव गुंग काही,
तरि जादूने जादूगारच फसुनि जाई?

जरी शिरावर कुणी बांधिला अमोल शिरपेच,
दिसतो का तो ज्याचा त्याला? स्तुतिचेहि हेच!

शब्दांचा बाजार बदलता जीवाची वेठ;
नको नको हे; उघड आपल्या प्रेमाची पेठ!

प्रेमाच्या जीवलगे! जिव्हाळा करिता रसभरती
भिन्नरंगि हृत्तरंग रंगति उचंबळुनि निघती!

शब्दचित्र परि काढू जाता त्याचे उल्हासे,
रंग तयांचे उडुनी जाती निःश्वासासरसे.

जनि जे दिसते, मनि जे बसते, हृदयी जे सलते,
ते बोलावे – तव हे वठतें भलत्याचे सलते!

रस तारांचा नभी पाझरे, भूवर नच येई;
शुष्क होउनी खाली येता शीतलता राही.

मूर्तरसाच्या कैक अप्सरा गगनगीत गाती;
नाद विरे परि नभीच; उतरे वारा भूवरती.

हा मोत्याचा सडा घातला वरती आकाशी,
चमक तेवढी येते त्याची या भूमीपाशी !

आशीर्वचनी शब्द तेवढे धावुनि येतात;
स्फूर्तिदायिनी इच्छा उरते तशीच हृदयात.

तीच दशा मम होते तुजला जावे जो गाया,
हृदयभावना मूर्तिमती तू ! कविता तव छाया!

सुकला चुकला जीव आजवर तुजवाचुनि फिरता
हृदयशारदे ! शब्द-शारदा नको मला आता!

धरि सावरुनि कविता पडत्या हृदयाचा तोल!
मरत्या जीवा परि वाचवी तुझा प्रणयगोल!

प्रीतीची पाउले उमटली जी या हृदयात,
जीवस्वामिनी ! किती दिवस वद बसू तीच गात?

प्रणयतटिनि! तू दूर न राही– करपलाच जीव;
हृदयसाक्षिणी! प्राणरक्षिणी ! न का येत कीव?

तव वसतीच्या दिशेवरी जी तारा लखलखते,
नेत्रयुग्म हे तीवर खिळते; नच कधिही हलते!

तव हास्याचा नाद नाचला ज्या वाऱ्यावरती,
जीव कोंडला वाचविण्याचे बळ त्याच्या हाती.

अनंत तारा, अखंड वारा, नच माझ्या कामी !
माझी तारा, माझा वारा, तुझ्या प्रेमधामी !

वस्तुवस्तुवर नेत्र वठविती तव मूर्तिच एक!
जग तराया जणू प्रीतिचा त्वन्मय अभिषेक!

नामाचा जप तुझ्या सारखा; अश्रुंची स्मरणी—
प्रतिक्षणी प्रतिनामे वाढे तिच्यात एक मणी !

ध्यास मांडिला तुझा असा हा असह्य विरहाने,
कधि येशील, कधि घेशिल मजला हृदयी प्रेमाने?

प्रीतीने रंगली पावले हृत्पटि नाचीव;
प्रेमामृत पाजुनी, देवते! भक्ता वाचीव!

प्रेमदृष्टिने, प्रिये ! मिळविता डोळ्याला डोळा,
पंचप्राणही होतिल माझे नयनी क्षणि गोळा !

हृदयी जडवी; चरणी तुडवी; मग त्या ओढुनिया,
सोक्षमोक्ष करि, तार मार वा, प्रेमाची दुनिया!

हृदयशारदे ! दर्शन परि दे, हृदयी दे स्थान,
वक्षःस्थलि तव पडता पडता येऊ दे मरण !

या प्रेमाची, तुझ्या यशाची गाणी या नादी

गाइन; जाईन गात गात ती तुजसह ईशपदी

प्रीतिदेविच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा!
प्रीतिदेवता जरा हालता कवि करि गानाला!

त्या प्रीतीला कविने पुसता, 'गाऊ काय गडे?''
प्रीति म्हणे, 'जा तिलाच गाई जी तव हृदयी जडे!''

हृदया, नयनां, ध्याना, गाना, जिने जिंकिलेस,
'गोविंदाग्रज' गाइल त्या तुज हृदयशारदेस!
- ऑक्टोबर

# प्रेमगाठ

चित्तकोकिला! प्रेमा गाया जगद्गायनाला
पंचप्राणाचा पंचम तव लावि याच काला.

हृदयवसंतहि भुलला, भुलला जीव तुझ्या गाने,
वृत्तिलता बहरल्या, फुलांनी विसरविली भाने.

प्रेमाश्रुंच्या मधुबिंदूच्या करु सेचनाते,
संतोषाच्या श्वासाच्या या मंदमंद वाते.

प्रेमरसाच्या या वर्षावे भूदेवी हृदयी,
तृणांकुरांच्या रोमांचांची पेरणीहि व्हावी.

चला मनाच्या मळ्यात पेरु प्रीतीची बीजे;
चित्तगीत-पुष्पे मग उधळू; कोण उगिच लाजे?

आज जगाची लाज सोडुनि होऊ या वेडे !
प्रीतिपटाच्या खाली दडवू जे जे मनि तेढे.

पहा नदीच्या जलात संध्यारंग उड्या घाली !
हृदयनदाच्या जली पडू द्या प्रीतीची लाली.

दीप तटीचे जली करविती किरणांचा नाच,
नयनदीपकिरणांस नाचवा हृदयजली साच.

काळ्या काळ्या ढगाढगांवरि संध्येची लाली,
काळी हृदये तशी रंगतिल प्रेमे जरि धुतली.

उषा-संगमी तप्त-करांच्या रवि होई गार,
तद्विरहे तापता जगावरी गाजवि अधिकार!

त्या मंगल संगमी रंगले सृष्टीचे गवई,
मंजुळ गुंजारवे प्रीतिच्या गुणगुणती काही !

आकाशाच्या लग्नमंडपी लता करवल्या या,
वृक्षबालका लाजुनि पल्लव सावरिता दमल्या !

काळ्या कोवळ्या, हलती कानी डूल मजेदार;
उषा-वधूवरि सुमाक्षताही करिती भडीमार,

नवरदेव नाचरा निघाला, ती पाठोपाठ–
लाजुनि झाली उषा दूर; कुणि द्या पदरा गाठं.

नव तेजाची साखर वाटित कोठे ती लपली?

स्त्रीपुरुषांची जोडी किंवा एकरुप झाली?
श्रीमंताच्या घरी चालती खेळ असे फार,

परि गरिबा, प्रीतिदेवते ! तुझाच आधार !
क्षयी कलंकी चंद्रासाठी, प्रेमा ! ऊठ तरी,

वसुंधरेशी लग्न तयाचे लावी शीघ्र करी.
दिशेदिशेच्या दिक्पालांनो! सावधान सगळे!

संध्यापट पितांबर काढा, ताराबल जमले.
प्रेममंगलाष्टके सारखी जगी गाजवा हो.

मेघांचा चौघडा गगनिचा जगी वाजवा हो,
नक्षत्रांच्या करा अक्षता,शुभ मंगल बोला;

सप्तपदीची चाल चालवा सप्तभुवनि सकला.
दुग्धचंद्रिका जिकडे तिकडे नवरदेव ओती,

पुष्परेणु- शर्कराकणांची पृथ्वी करि भरती!
त्रिभुवनि साऱ्या दुग्धशर्करा वाटा ही असली

म्हणेल जग मग ‘दुधात की या साखर ही पडली’!
हृदयदीपिके! प्रीतिदेवते! मार्ग असा दावी,

जिकडे तिकडे शुभलग्ने ही सारखीच लावी!
चराचरांनो केवळ खेळा प्रेमाचे खेळ !

दुसरे तिसरे नकोच काही करा हृदय-मेळ !
दिनरजनीची जोडी एकच, चांदणे न तिसरे–

त्या दोघांचे संमीलन हे जमले एकसरे!
एकएकट्या फिरता का गं, तारांनो ! गगनी?

जमवा जोड्या प्रेमाच्या मग गा फिरती गाणी !
निळ्या नभाला द्या ग उजळा शुभ्र चांदण्याचा,

प्रेमासाठी प्रेमसागरी खुशाल मग नाचा !
महासागरा! उगाच लाटा उसळतोस का रे?

विझवी वडवानलासि पिउनी प्रेमाचे वारे !
नदीमुखाचे चुंबन घेता ज्या लाटा उठती,

त्याच तेवढ्या नाचू दे, त्या प्रेमपाठ गाती!
हृदय सळसळे, फेस उसळला, टाकुं नको खाली,

त्या फेसाचे गेंद रुपेरी नदीपदी घाली !

नदी नदीच्या पदी बांधुनी प्रेमाचे चाळ,
नाचू दे तुजभवती त्यांना या रानोमाळ !
वनांत लपलेल्या वेलींनो ! या ग बाहेर!
वृक्षाचे कर धरुनी घ्या मग प्रेमाचे घेर
गवताचा गालिचा कोवळा हळू हळू चाला,
पायघड्या पसरल्या- फुलांचा सडा वरति घाला.
वाऱ्यावरती वरात काढा जीवाभावांनी,
वनदेविच्या मुलिंनो! या ग,या लौकर नटुनी !
कुणी गुलाबी पातळ नेसा, शालू कुणि हिरवा,
कुणि मोत्यांची जाळी लेउनि हव्या तशा मिरवा !
चला चला ग फुलाफुलाला देऊ नाव !
जसा जयाचा येइल दिसुनी प्रेमाचा भाव !
शोभापुष्पे कमले; नुसती शोभा त्या ठावी!
काव्यपुष्पपदवीही दे त्या सरस्वती देवी !
सुर्यकमल दिनपुष्प साजिरे दिवसभरीच फुले ,
निशापुष्प तव बालक कुमुदिनी चंद्रा बघुनि खुले !
उषा-पुष्प जास्वंदीवरती तसा रंग त्याचा,
प्रथमपुष्प दिवसाचे भावहि अस्फुट वासाचा !
फुले गुल्बशीवरति विहरती तांबुस अंगाची
संध्यापुष्पे संध्यासमयी संध्यारंगाची.
तीन रंग दिवसातुनि दावित फूल तेरड्याचे,
बालपुष्प ते; बालवृत्तिचे भडक रंग त्याचे!
यौवनपुष्पाचा निशिगंधा दिधला अधिकार;
हृदय खळबळे, वास दरवळे जो अपरंपार!
सुरकुतले कोरांटीवरि जे काट्यांतिल फूल ,
जरठपुष्प ते रजःकणांची वृथा उठवि धूळ!
एकलकोंडा नीरस भावहि या धत्तूराचा,
स्मशानस्थ शिव सदा हावरा स्मशानपुष्पाचा !
धड न पांढरे, लालहि नाही, वासही उग्र तसा,
गर्वपुष्प हे कण्हेर दावी, गर्वाचाच ठसा !
व्यर्थ पसारा वासावाचुनि या मखमालीचा,

दंभ-पुष्प परि नको, पथ न हा प्रेमळ चालीचा !
उगाच नावे अशी कशाला कुणास ठेवावी !

मंगलकाली मंगलवदनी मंगलताच हवी.
लीला-पुष्पे खुल्या दिलाची या शेवंतीची,

मुग्धा-पुष्पे ही जाईची कोमल वृत्तीची;
शुभ्र मोगरा दंतनिदर्शक हसऱ्या तोंडाचा,

हास्य-पुष्प ते; शुभ्र रंग हा दावित हास्याचा.
लालि गुलाबी जी लज्जेची रमणीच्या वदनी;

गुलाब दावी लज्जापुष्पापरि ती निज सुमनी.
मदपुष्पे ही आम्रावरची मत्त मना करिती,

पुण्य-पुष्प तुलसीदलि साधी पुण्य मंजरी ती.
श्वासाने जे सुमन करपते पारिजातकाचे,

हृदयपुष्प अतिकोमल ते अतिकोमल वासाचे.
सुकले तरिही सुवास राखी; दृढतेचा भाव;

प्रेमपुष्प बकुलाचे वसवी प्रेमाचा गाव!
त्या गावाचा, त्या नावाचा कायमदायमचा

रहिवाशी हा जीव गातसे प्रेमपाठ तुमचा !
वनदेवींनो ! तुम्हांसाठि हा थाट बारशाचा !

फुलाफुलांचे नांव दाखवी भाव आरशाचा;
फुले तुम्ही घ्या, फुले मला द्या, प्रेमाची ठेव,

कृष्ण घ्या कुणी, कृष्ण द्या कुणी, हीच देवघेव !
चला लतांनो! मुले बसवुनि कटिखांद्यावरती,

लग्न निसर्गासह लावी कवीहृदयस्था प्रीति!
सृष्टिदेवता माता तुमची, कार्य तिच्या घरचे,

लग्न निघे माहेरघरी मग आळस काय रुचे?
हृदयपटावरि निजलज्जेचा लाल रंग उधळा,

प्रेमपल्लवी लिहुनी कुंकुमपत्रे द्या सकला.
प्रीतिदेविचे आज निघाले लग्न निसर्गाशी;

वऱ्हाड जमले, मुहुर्त भरला, धीर न कोणाशी,
वनदेवीच्या मुलिंनो ! या ग, या लौकर म्हणुनि,

पराग उधळित, सुवास पसरित, कोमल हातांनी!

हिमवंतींच्या जली मिसळुनी मरंदमय तेला,
स्नान सुमंगल घाला कोणी प्रीतिदेवतेला !

शशिकिरणांचे तंतु भिजवुनी संध्यारंगानी,
अष्टपुत्रि द्या नव नवरीला कुणीतरी विणुनी.

हिमगिरिशिखरी स्फटिकशिलांतरि रविकिरणे शिरती,
प्रतिकिरणे पाझरती भराभर, अति कोमल असती.

मुग्ध अधरिच्या गुलाबि रंगी रंगवुनी त्यांना
त्या सूत्रांची काचोळी कुणि नवरीला द्याना !

पराग कोळुनि करुनी हरिद्रा उटी तिला लावा,
इंद्रधनुष्ये वळवुनि हाती वज्रचुडा भरवा.

शुभ्र फुलांचे तेज आटवुनि घडवा कुणि त्यांची
वेढिविरोदी; सौभाग्याची लेणी पायांची

रात्रीचे तम, उषा-रक्तिमा, काहि नका टाकू;
प्रीतिदेविच्या सौभाग्याचे हे काजळकुंकु!

मणिमंगलसूत्रांत चांदण्या चंद्र चटकदार,
तिला तिच्या भाग्याचा भगवान् निसर्ग देणार!

संध्याकाली संध्यापटि जो असे सूर्य गगनी,
भरा प्रीतिची ओटी असल्या खणानारळांनी.

मायासुरांची माया शिकुनी कविकल्पकतेने,
मंगलभूषणरचना मग ही करा शीघ्रतेने

मुक्या मनांची म्हणा मंगलाष्टके, जी न सरती
हृदयाश्रूंच्या दिव्य अक्षता वधूवरांवरती !

खुल्या दिलांचा मिलाफ घडवा मुहूर्त हा सरता,
अंतरंगिचा अंतःपटही दूर करा आता !

शुभमंगल वच तूच बोल श्रीमहन्मंगला रे !
हृदयाचा चौघडा वाजवुनि विश्व भरा सारे !

पाऊल त्यांचे एक एक मग जन्माजन्माचे,
सात पावले सात जन्मभर सप्तपदी नाचे!

पतिव्रतांनो! मंगल विश्वचि तुमचे माहेर,
वधूवरांना मांगल्याचा कराच आहेर!

सकल वेलिनो! वरात त्यांची चला चला पाहू ,

ही सोन्याची संधी ! मागे नका कुणी राहू!

लाजाळू लाजते कुणाला? नका तिला रुसवू!
चला चिमुकल्या करवलीस त्या जाउनिया हसवू.

वंशतरुवरा ! असाच गा रे प्रेमाचे सुर !
हृदयस्था हृदयाशि धरा कुणि; नका राहुं दूर !

जनि की रानी, जली स्थली, वा गगनी पाताळी,
जिवाजिवाला बाधा पसरुनि प्रेमाची जाळी !

जलदेवींनो! स्थलदेवींनो ! गगनदवेतांनो !
सकला शिकवा प्रेमपाठ; गा हाच अप्सरांनो !

हृदयशारदे! हृदयि राहुनी करि मज प्रेमकवी !
तुझ्या प्रीतिची स्फूर्तिच मज हा प्रेमपाठ शिकवी!

पशूस करशिल मानव ! मानव नेशिल देवपदा !
देवपणा स्थिर देवांचाही राखिसी तूच सदा !

प्रेमतरंगे चित्त तरंगे, आत्माही रंगे !
जगत् रंगले, विश्व रंगले एक प्रेमरंगे !

चराचरांनो ! स्थिरास्थिरांनो ! नश्वर ईश्वर वा,
प्रेमे जिंका ईशा; साक्षात् की परमेश्वर व्हा !

हृदयसंपुटी स्नेहि पाजळुनि जीवाच्या ज्योती,
प्रीतीच्या गंगेत सोडुनी गा मंगल आरती!

हृदयाची राउळे उघडुनी हृदयदेवतेला,
पंचेन्द्रियकृत प्रभावळीमधि वरच्यावर झेला!

इतर वृत्तिंचा देवीभवती चालू द्या नाच;
जीवेभावे तिच्या पुढे गा प्रेमपाठ हाच !

चित्ताच्या ताटामधि अर्पा निजपंचप्राणा;
त्या नेवैद्ये हृदयदेवता तृप्त होय जाणा !

प्रेमे नसे तर जीव नको हा ! प्रेमे जग चाले !
प्रेमावाचुनि धिग् जीवन हे असे आज झाले !

प्रेमरसावर हृदय तरंगत प्रेमपाठ बोले,
मनातले हे गाणे माझे जनातले झाले !

प्रियमित्रांनो! प्रेमरंगणी प्रेमाने नाचा !
मुक्या मनाला फुटली आता प्रेमाची वाचा !

प्रेमपाठ हा सदैव गा रे प्रेमाने ताज्या,
आण घालितो अशी तुम्हाला गळ्याचीच माझ्या !

चला गड्यांनो ! या प्रेमाची ऋणे आधि फेडा,
हेच मागतो हात जोडुनी प्रेमाचा वेडा !

प्रेमपाठ हा सरता झाला, मन हो बेताल !
प्रेमरसे गुंगले यावरी फुकट शब्दजाल !

त्या गुंगीच्या भरात गातो पडुनि मना भूल !
क्षमा करा हो गाताना जरि होई चूकभूल.

प्रेमपाठ हा रुचे कुणाला, न रुचे कवणाला,
एक नसे; जगि आवडनावड तो ज्याची त्याला !

तशांत हे तर बोलुनिचालुनि मग वेडे झाले !
बंधन कसले मग त्या? गाई जे सुचले रुचले !

परवा न तया; हसा रुसा, वा निंदा, की वंदा,
मी प्रेमाचा बंदा ! माझा हाच असे धंदा !

स्तुतिनिंदेचा भेदचि अवघा प्रेमजली जिरला,
भेदाभेदचि, न परि जीवही प्रेमांतचि विरला !

हृदयशारदा हृदयमंदिरी चित्तरंग तारा,
छेडित बसली त्या गीताचा वाहे प्रेमझरा !

देहभरी त्या निर्झरलहरी थरथरुनी भिनल्या,
वृत्तिवृत्ति त्या गायननादे प्रेममयी बनल्या !

भाव बहिरला, जीव बहिरला, बहिरलाच आत्मा !
प्रेमरुपची, प्रेमलभ्यची, रमला परमात्मा !

त्या दोघांच्या या ऐक्याचा गाया जयवाद,
घुमत सारखा बधिरवृत्तितुनि प्रेमगीतनाद!

कायावाचामनसा होउनि प्रेमाचा भाट
'गोविंदाग्रज' आळवीत मग सदा 'प्रेमपाठ'!

- नोव्हेंबर १९१२

# हुकमे हुकूम

करमत नव्हतें म्हणुनि एकदा असाच गेलों रानीं ॥
वसंत का - परि ऋतु दुसरा कधिं कुणीं पाहिला कवनीं ? ॥

समोर होता झाडावरतीं एक चिमुकला पक्षी ॥
बोलुनि चालूनि कवि पडलों मी - सहजचि त्याला लक्षीं ॥

वसंत ऋतु तो; रम्य वनहि तें; पक्षि आणि कविराय ॥
तुम्हीच सांगा रसिका, आतां हवें आणखी काय ? ॥

सत्वर कविच्या रसिकपणानें सांगितलें त्या गाया ॥
नवल वाटतें सांगण्या परि-कीं तें गेलें वायां ॥

''वृक्षावरच्या माझ्या मित्रा, कांही गाणें गाच ॥
गमतीखातर आणि जरासा इकडे तिकडे नाच ॥

बंधु तुझा मी - माझ्यासाठीं गड्या लाग तूं गाया ॥
हें बघ देतों कण धान्याचे कांहीं तुजला खाया ॥

स्तुति गाण्याची तुझ्या बहुपरी करिन चारचौघांत ॥
चित्रहि आणिन तुझें कशाच्या तरी खास अंकांत ॥

गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर ॥
कीं शाळाखातेंही वेड्या करील तें मंजूर.'' ॥

अशा प्रकारें फार विनविलें जीव तोडुनी साच ॥
भिकारडें तें कांही केल्या परंतु ऐकेनाच ॥

गा म्हटल्या जो गात नसे त्या सृष्टीचा कवि म्हणती ॥
मस्तक फिरलें हातपायही रागानें थरथरती ॥

''एक मारितों दगड असा कीं पडेल वासुनी चोंच ॥''
म्हणुनि वाकलों तसाच खालीं आवेगानें तोंच -

लगबग दिसले स्नेही माझे - संपादक त्या-ह्याचे ॥
म्हणूं लागले, '' भले ! तुम्हांला कुठें कुठें पाह्याचें ? ॥

या अंकाचा चालू तक्ता (फर्मा) होत नाहिं भरपूर ॥
कामाचा खोळंबा झाला, द्या कांही 'मजकूर' ॥

वसंत-अंकीं वसंतवर्णनपर कविता चालेल ॥

परंतु झटदिशिं करा; नातरी काम उगिच लांबेल ।।

सरासरी द्या खरडुनि ओळी अठरापासुनि वीस '' ।।
ऐकिलें न हें तों कवनाची झाली स्फूर्ति कवीस ।।

झाडावरचा पिसाट कवि तो तसाच टाकुनि रानीं ।।
चला रसिकहो लांबी रुंदी नीट ठेवुनी ध्यानीं ।।

वसंतकाळी त्या वर्णाया वनांतुनी माघारी ।।
'गोविंदाग्रज' कवीश्वराची घरीं परतली स्वारी ।।

१०-१२-१९९२, पुणें.

# अभिनंदनपर वर्धापन

(श्रीयुत चिन्तामणि द्वारकानाथ देशमुख I.C.S., मुंबई विश्व विद्यालयाच्या सन १९९२ च्या प्रवेशपरीक्षेत पहिले आले. त्या प्रसंगावर खालील 'शब्दपुष्पहार' कै. गोविंदाग्रज यांनी गुंफिला होता. )

धन्य ! धन्य ! बा, तव सुयशाची होतां जाणीव.
सहर्ष वर्षत आशीर्वच कवि ''वत्स, चिरं जीव.''

परिचय नसतां करित अतिक्रम कविमानस माझें,
राग नसावा त्याचा, बाळा ! क्षमा इथें साजे.

आनंदाचे भरांत नाचे मन्मानस, बाळ !
कशास त्याला उगीच सांगूं ''शिष्टनियम पाळ ?''

हर्षदर्शना नियम न कांही; हृदयहि अनिवार;
गुण आकर्षणकारण; परिचय केवळ उपचार !
अथवा कविला बंध न कोठें मनिं आणुनि हेंची -

क्षमा करावी, बाळ ! माझिया पुरोभागितेची.
विद्येच्या दरबारीं मिळतां तुज पहिला मान,
तुझ्या कुळाला, जातीलाही त्याचा अभिमान.

पारितोषिकें त्रिविध गौरवी श्रीविद्या तुजला,
स्वानंदानें उधळूं आम्ही सहजचि अश्रुजला !

स्वज्ञातीचें नांव उजळिलें आज, महाभागा !
भरून जाइल दुथडी म्हणुनी तुझी जातगंगा !

समाधानमय नि:श्वासाच्या वातें तुजवरती
उत्कटाश्रुजललहरी उडवुनि सुखविल शतधा ती !

गरीब माझी रसवंती; परि होतां अतिहृष्ट
शब्द मौत्किकें ओवाळुनि तुजवरूनि, काढि दृष्ट.

ममत्वमय दोषाचें लावुनि तुला गालबोट,
सदा सदिच्छासदनीं तुजला जपूं कडेकोट.

धरिलें आम्ही शिरिं तुज पाहुनि तुझा गुणासार,
परी तुझ्याही शिरिं भार नव तसाच देणार.

वंश, जाते तव, समाज, त्यापरि महाराष्ट्रभाषा,
आजपासुनी सर्वांनाही तुझी फार आशा.

दिव्य अलौकिक जें जें दिसलें ईशें मनुजाला,
ईश्वरांश तें सदा लावणें ईश्वरकार्याला.

ईश्वररूपा जगीं रमे श्री मानवता देवी,
निजदिव्यांशा जीवेंभावें तिच्या पदी ठेवी !

गुढी पाडवा आज तुझ्या हा यशोजीवनाचा,
वर्षोवर्षी असाच उगवो चढत्या मानाचा.

दंभ, गर्व, अभिमान दडपुनी पायांनी अरतीं
निजपुण्यबळें असा सारखा जा वरतीं वरतीं.
प्रतिक्षणीं वर जातां दृष्टी व्यापकतर होई,
क्षितिजवर्तुलासह वाढूं दे स्वार्थ-वर्तुलाही !

'' मी, माझें कुळ, माझी जाती, समाज माझा हा,
श्री मानवता देवी माझी, ईश्वर मीच अहा!''

अशा भावना मनिं ठेवुनियां जा वरतीं वरतीं,
हृदयसागरा सदा येउं दे अमर्याद भरती !

उंच भराऱ्या गगनीं तुजला पाहुनि घेतांना,
परस्परांना दावूं इथुनी डोलवून माना.

धन्य धन्य तूं त्रिवार धन्यचि; धन्य पिता-माता !
हर्षाश्रूंनी न्हाणित असतिल ते तुजला आतां !

फुला उमलल्या ! वास यशाचा नित्य नवा पसरी,
दरवळुनी मोहुनी गुंगवी ही दुनिया सारी !

''विजयी भव, महदायुष्मान् भव, चढवि यशोनाद !''
खेळतील तुजभंवति आमुचे हे आशीर्वाद !

पाप, अमंगल, अनिष्ट किंवा अभद्र जें कांहीं,
स्पर्श तयाचा कधीं न होवो तव छायेलाही.

जें जें मंगल, दिव्य तसें जें पुण्यहि जें जगतीं,
वृष्टि तयाची होवो, बाळा, सदैव तुजवरती !

नभीं चकाके सकल कलांची तारामय सृष्टि,
करो तुझ्यावर निजतेजोयुत दिव्यपुष्पवृष्टि !

श्रीपरमात्मन् ! मागतसों हें तुजपाशी एक,
करिं बाळावर कृपादृष्टिचा अखंड अभिषेक.

असो; असों दे ओळख बाळा, लोभहि रांहू दे.
नित्य नवा उत्कर्ष तुझा या नयनां पाहूं दे.

बालमित्र तव जमले असतिल सर्व तुझ्याभवतीं,
अथवा चिमणीं भावंडेही असतिल आवडतीं.

किंवा कौतुक करीत असतिल तात गोड वचनीं,
असेल जननी तुज कुरवाळित सजल अशा नयनी.

अशा सुखाच्या काळीं आलों घटकाभर आड,
क्षमा तयाची करिं; कविता ही अशीच रे द्वाड !

हृदयदर्शना कसाबसा हा शब्दपुष्पहार -
'गोविंदाग्रज' धाडी प्रेमें, बाळा, स्वीकार.

- १९-१२-१९९२

# घुंगुरवाळा

( जगाच्या संगीतात शब्दमय काव्यापेक्षा नि:शब्द-किंबहुना, नादशुन्यसुद्धा - काव्यांचाच भरणा विशेष आहे. अल्लड मातेला सातआठ महिन्यांच्या चिमुकल्याने उत्कट आनंदाने वाळा वाजविला म्हणजे एकाग्रतेनें ऐकत राहावेंसे वाटतें, तें याच कारणामुळे.)

वाजिवरे बाळा ! वेल्हाळा ! रुम्झुम् घुंगुरवाळा ॥ धृ. ॥
अस्फुट विश्वाचें । प्रेमाचें । गाणें आनंदाचें -
वदलों जें नादी । संवादी । तुझिया जन्माआधीं -
पहिल्या प्रीतीचे । गमतीचे कांहीसे भीतीचे,

बाळा ! ते बोल । तूं बोल । आज मनीं जे खोल.
रात्रीच्या काळी । जो बसली । ब्रह्मानंदी टाळी,
मनि तेव्हां बाणे । जें गाणें । अस्फुट मंजुळवाणें,
धीर न परि हृदया । उघडाया । उघडपणें तें गाया !

वदलों मग पाही । दोघेंही । लाजूनी कांही कांही !
हृदयीं खळबळलें । दरवळलें । विना ऐकिल्या कळलें !
गाणें मंजुळ तें । झुळझुळतें । तुझिया वाळ्याभंवते !
वाळा हालूं दे । बोलूं दे । आनंदे डोलूं दे .

एकच हा चाळा । वेल्हाळा । घे रे तान्ह्या बाळा !
एकच पायाचा । वाळ्याचा । नाच गोड बाळाचा -
ऐकुनि आनंदे । त्या छंदें । घर सगळें नांचू दे !
'गोविंदाग्रज' ही । कवनांही । त्या छंदावर गाई !

- फेब्रुवारी, १९९३.

# चिमुकलीच कविता !

नाजुक सुंदर गोंडस चिमणी बाला दशवर्षा,
कोण कुणाची कुठें चालली उधळित ही हर्षा ?

हात चिमुकले, पाय चिमुकले, चिमुकलाच बांधा,
भूदेवी-स्वर्देवी यांतिल हाच काय सांधा ?

धवल वर्ण हा देहावरती फुलत्या पुष्पाचा,
लाल छटा वर, जणूं पसरला रसचि गुलाबाचा !

त्याच फुलांच्या वळुनि पाकळ्या पोकळशीच घडी
झालि तीच वाऱ्यावर हलत्या ओठांची जोडी !

सडा पसरला आंत कोंवळ्या बारिक मोत्यांचा,
ओंठाआडचि अर्धा पडला खेळ पहा त्यांचा !

इवलीशी हुनवटी गोजिरी, खळी तिच्यावरि ही,
निजहृदयिंच उतराया वर्तुळ मुख जणुं लांबवि ही !

सरळ नासिका चांफेकळिचा जणुं अंतर्भाग,
दळांआड दडला परागमय अवकाशांग.

कपाळपट्टी विशालतेचें बालरूप पहिलें,
कुणा भाग्यवंताचें भावी भाग्य त्यांत लिहिलें ?

किंचित खुलल्या भिंवया- चिमणीं धनुष्येंच साची
चित्रपटांतिल काय चिमुकल्या रामलक्ष्मणांची ?

नखाएवढ्या दोन हिरकण्या हंसती, त्याखाली,
तेजोरूपा श्रीकमला जणुं निजकमलीं रमली !

फुलें बसविली वेलीवरतीं, गगनीं तारांना,
त्याच मुहूर्ती त्याच करें का विधि करि या नयनां !

किरणां किरणां टाकुनी भंवती या नेत्रांमधुनी
पापस्पृष्टा वसुंधरेला बाला का न्हाणी !

अभ्यासास्तव सोडत उघडुनि नयनांची खाण
बालमदन निर्दोष किरणमय हे बोथट बाण !

केंस कोंवळे सरळचि काळे, कुरळेही कांही,
तुळतुळीत मोकळे, मनासम नच बंधन त्यांही !

गालिं लोळती कांही, कांही कानांवर पळती,
पवनीं खेळति कांही किंवा मानेवर डळती;

पाशरूप पुष्कळसे परि ते पाठीवर रुळती,
चकचकीत जणुं लहरि जलाच्या पवनें झुळझुळती !

बालसर्प जणुं, अथवा उपमा कुणी अशी द्यावी?
तच्छिरिं बसवुनि साप निजशिरी पाप कोण बसवी ?

तळपति जललहरी रविकिरणीं जणूं जागजागी,
उंच सखलशा सुटल्या वेणीच्या बंधनभागी.

झुळझुळ मंजुळ वाहे चिमणा ओघ जसा कांही,
गमते रमते उगमस्थानीं ही कृष्णबाई !

गाल कोवळ्या गुलाबकळिची रुपें विधिमनिंची,
पदार्थसंसर्गविण नुसत्या चिंतनमय खनिची !

लज्जा निर्मायाची स्फूर्तिच विधिनयनी चमके,
त्या नयनांनी बघतां गालीं लाली ही फडके !

चुंबन घेतां येतिल गालचि हे श्वासासरसे
वाऱ्यावर वाहुनीच चुंबन ओठांसह खासे

सहज मुखावर हंसें खेळतां गाली गोड खळ्या,
फुटती मुग्धचि आनंदाच्या तयांतुनी उकळ्या !

ओठ कशाचे - देंठचि फुलल्या पारिजातकांचे;
हास्यरसाचे करी मोगरा सांचे कलिकांचे !

हां हंसते सारखी अशी ही ? नेत्रहि हंसती कां ?
फुलें झेलि चालती बोलती ललितदला लतिका !

कीं भावी प्रणयांचे अत्तर हृदयपुष्प पिळुनी -
बालमदन करि; उडे हास्यमय सुवास दरवळुनी,

किंवा कांही क्रियाच इजला येत नसे दुसरी
निष्कारण म्हणुनीच सदाची मुद्रा ही हंसती ?

नखें पदतलीं, की वर्खाच्या टिकल्या चकचकत्या !
कापुनि कच्चीं पोंवळींच मृदु केल्या का चकत्या !

करांगुलीमधिं बालमुद्रिका विराजते भद्रा,
पवित्रतेच्या सम्राटाची हीच राजमुद्रा !

तिलक गोजिरे गोंदवणाचे हिरव्या रंगाचे
शुभ्र मुखावर तुषार कुठल्या दिव्य तरंगाचे ?

निळ्या नभी कर शुभ्र तारका जमवितात मेळ,
शुभ्रमुखनभीं इथें निळ्याशा तारांचा खेळ !

इचा उद्यांचा धनी कोण, हें ठरवावें म्हणुनी,
पुण्याईचें गणित करित विधि दशांशचिन्हांनी !

लाल छटा वदनिंची नभींच्या शुभ्र मौक्तिकांत
कोर बालचंद्राची विलसे संध्याहृदयांत !

रक्त कपालीं दिला रक्ततर कुंकुमतिलक बरा,
अरुणपटावर मांगल्याचा नव मंगलतारा !

चिमण्या देहा शोभविणारी चिमणीशी साडी
नीटनेटकी नेसवुनी हिस कोण कुठें धाडी !

घालित बाला चित्रिंचेच का चित्र अलंकार ?
स्वप्नांतिल संसार कुणाच्या घे कीं अवतार ?

केला विधिनें स्त्रीत्वाचा हा टीचभरचि नमुना,
नवतीर्थास्तव हिंडति संगततनु गंगायमुना ?

गर्भजन्म या उपाधि भोगी कीं ही तदतीता
कीं भूमींतुनि अशीच वर ये ही दुसरी सीता ?

उषा-चंद्रिका जणूं भेटल्या; त्या संगमकालीं
तांबुस धवलहि रस पाझरतां काय त्यांत न्हाली ?

किंवा स्वर्गांतुनि ही सुटुनी आली आतांच,
नंदनवनिंचा मंद वात तरि करि भंवतीं नाच !

महाकवींच्या कल्पनेंतली भावमूर्ति का ही
बलवत् भावें स्फुटतर होउनि वस्तुरूप वाही ?

पहा थांबली विभ्रमललिता सलीलगति बाला,

बालभाव मनिं विमल, जोडि कायुग परमेशाला,

अहा ! कोणता भाव असे हा पापमना न कळे !
द्रवुनि भक्तिने आत्मा सारा देहीं कीं खेळे !

देवमनी निजभक्ताविषयी वसे भावना जी
भावरुप की काय खेळते या हृदयामाजी ?

शुद्ध भाव हा तिच्याच मनिंच्या पुण्याचा वारा,
हाच भाव, भगवंता ! आतां जगलायीं पसरा.

हात जोडुनी विमले वाले ! मागितलें काय ?
स्फूर्तिनेंच की पावित्र्याच्या नत झाला काय !

जें पावन, जें विशुद्ध, त्याची तूं मंगलमूर्ति,
देव कोणती करील आतां तव आशापूर्ति?

तुझ्या मनींचा विमल भाव हा कळतां तया क्षणीं
दगडाचा देवही वांकविल देह तुझ्या चरणीं !

स्वर्गहि तुजवर धरिल सारखी दिव्याची गळती !
त्वद्दर्शनपुण्याला मुकले गतमुनि हळहळती !

तीर्थे, पुण्यें, देवदेवता ज्यां पाहुनि पळती,
तसलीं पापें नेत्रकिरण तव पडतां क्षणिं जळती !

टाक नजर एकदां तरी ती या पाप्यावरती -
स्वर्गि सहज तरि जाण्याइतकी पुण्याची भरती

शुद्धभाव-परिपूर्ण मनीं क्षण मजला जाऊं दे,
कवित्व पावन करून घ्याया जराच रांहू दे.

ओघ एकदां त्या कवितेचा जगांत वाहूं दे.
नांव तरी पापाचें उरतें का मग पाहूं दे.

मग हृदयाच्या हिंदोळ्यावर चल ये घे झोले,
त्यांतुनि निघल्या कवनश्वासें विश्व सहज डोले !

कवनस्फूर्ती, मंगलमूर्ति, जराच धांव गडे !
दिव्य सुधारस वर्पूं जगतीं ये जिकडेतिकडे !

अहा ! चालली बाला टाकुनि मज संशयवादीं
रंगत गुंगत दंग सदा ती आपल्याच नादीं !

नवल व तिजसह नेत्र जरी मन हे भिरभिर फिरती,
भुलतें, खुलतें, डुलतें विश्वचि तिजभवंती !

पावित्र्याची उषा काय, कीं कळी पूर्णतेची?
आशी: की ही जगास पुढच्या प्रभुतन्मयतेची !

किंवा कांही तल कल्पना कुणास आठवली,
नटवावी कशि कवनीं ती या विचारि मति रमली.

तोंच चुकवुनी डोळा धांवे कल्पनाच बाल
स्वच्छंदानें पांघरल्याविण शब्दाची शाल !

पवन पिउनि मग तिची होत का अशी बालमूर्ति?
बाला कसली ? खास तीच ही नवकवनस्फूर्ति !

भरभर फिरते नग वाऱ्यावर ताराया जगता
कुण्या कवीची चुकलीमुकली चिमुकलीच कविता !

मूर्तिमती कविताच यापरी हृदया हालवितां
'गोविंदाग्रज' ही गाई मग चिमुकलीच कविता !

सप्टेंबर १९१३

# दसरा

(रुढीचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा.)

चला आज हा आला दसरा !
पाउल पुढतें टाकायाला,
सीमोल्लंघन करावयाला,
आनंदानें नाचायाला,
सणांमध्यें सण हाच खरा !

चौमासांला आतां विसरा !
मुसळधार तो पाऊस वरला,
तुडवित पायांखाली चिखला,
शेत पेरिलें येत पिकाला;
येतां आनंदाचा दसरा !

पहिल्या दुभत्या गाई विसरा !
उन्हाळ्यांत त्या उडाल्याच ना ?
त्या गाईच्या खिल्लारांना
नव्या दमानें सोडा राना,
चला खाउं द्या पहांटचारा !

करा जरासा मुखडा हंसरा !
आतां कां हीं तोंडें रडवी ?
कडवीं बीजें करवी गोडवीं,
फुटलें तुटलें पुन्हांहि जडवी,
आला ना तो तुमचा दसरा !

चला रुढिवर आतां घसरा !
टाकुनि सीमा मृत धर्माच्या,
दंभाच्या या अंधपणाच्या,
जुनेपणाच्या, अहंपणाच्या
सीमोल्लंघनकालचि दसरा !

जुन्या मतांचा जाळा कचरा
नव्या मतांचे जे राऊत,
खरेखुरे मायेचे पूत,
येऊं द्या धैर्याला ऊत,
नका हातचा दवडूं दसरा !

नका हातचा दवंडू दसरा !
जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषींमागुनी
जा तिकडे नेइल हा दसरा !

श्रुतिस्मृतींना आतां विसरा !
अंधभक्तिचा पांगुळगाडा
मोडुनि तोडुनि उपडा पाडा !
पाताळीं तो नेउनि गाडा !
करा साजरा यापरि दसरा !

नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा
जीन नको उप्लाणी सोडा !
जेरबंद वा लगाम तोडा !
सीमोल्लंघनकालचि दसरा !

जुन्यापुराण्या चिंध्या विसरा;
जरि पटका घ्या सुधारणेचा !
भगवा झेंडा नव्या मताचा !
नव्या दमानें फडकविण्याचा
मानवधर्माचा हा दसरा !

नव आशेच्या तृणांकुरांचा
तुरा शिरावर; चढवा साज,
मढवा न्यायाचें शिरताज,
समचित्ताचे बरकंदाज,
चला जमूं द्या जमाव तुमचा.

काळाचें मैदान अफाट,
दिसतां कोठें खंदक खांचा
द्या घोड्याला अमीन टांचा
वाऱ्यावरच्या करवा नाचा
कापा रस्ता आटोकाट !

चला निघूं द्या असली स्वारी;
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा

वाजवितां, त्या आधीं हाणा !
घ्या कृष्णाची करी ‘तुतारी’ *

रुढीच्या किल्ल्यावर स्वारी,
‘अगरकरां’ची झडवा नौबत !
‘भागवतां’ची धराच हिंमत !
‘केशवचंद्रां’चें घ्या चिलखत !
फुंका ‘कृष्णा’चीच ‘तुतारी’.

रुढीचा गड खालीं उतरा,
जिवंत सोनें अखंड लुटवा,
कृपण मनाचा रस्ता खुटवा.
असा साजरा कराच दसरा !

* या गाण्यात ‘केशवसुता’च्या ‘तुतारी’ या सुधारणाप्रेरक जोरदार गीताचा उल्लेख ‘कृष्णाची तुतारी’ या नांवाने केलेला आहे.

कसले पूर्वज घेउनि बसलां ?
होते मोठे सोन्या भरले
त्यांचें आतां काय राहिले ?
त्यांचे त्यांच्या मागुनि गेले.
शिक्का कायमचा तो कसला !

उगाच खाउनि बसतां हाय !
पूर्वज आले चार पावलें,
एकसारखे पुढें सरकले,
म्हणुनिच ना ते इतके आले ?
त्यांना पूर्वज नव्हते काय ?

कुंभारासारखेच लोटे,
खोटे ठरतें तत्त्व आज तें,
पूर्वज संतत पुढें चालते
घायकूत ही नसती धरिते
बडे बापके तुम्ही बेटे !

रडत बैसले महारमांग,
दीनपणाला गर्वे छळतें,
अज्ञानाला भिउनी पळतें,
त्यां वर घ्याया नच जें वळतें.
उच्चत्वा त्या लावा आग !

थांबा, ऐका देउनि कान -
सुकल्या हातीं बाला कोमल,
तशाच विधवा करिती तळमळ;
फत्तर फुटतिल येउनि कळकळ.
कुठला पोकळ गताभिमान ?

चला उठारे बांधा कंबर !
तुमच्या पुरती ही घी -शक्कर
टाकुनि, रुढीशी द्या टक्कर !
युद्ध माजवा रे घनचक्कर !
फोडा कुजकें हें अवडंबर !

गेल्या धर्माचे हे भूत
पाहुनि बसलां कारे भीत ?
नव्या मतांचे भालाईत
घोडे अपुले या उडवीत,
नातरि रडते व्हा राऊत !

अनंतकाळाचें मैदान
हिम्मतवाले चाबुकस्वार,
उत्साहाची करि तलवार,
चित्साक्षीची ढाल तयार,
घोडा फिरवा रानोरान !

सरतां काळाचे मैदान
घोडा उडवा मग आकाशी,
भिडवा नेउनि स्वर्गापाशी
पूर्णपणाशीं ईशपदाशीं.
तरीच होईल दसरा छान !

कुणी मनाचा असेल कच्चा
करील त्यालाही मनशूर
या गाण्यांचे गाउनि सूर
'केशवपुत्रा'चा महशूर
'गोविंदाग्रज' चेला सच्चा !

- ऑक्टोबर, १९१३.

# जगाचे गाणे

( केव्हांहि पहा, जग उगवत्या सूर्याला अर्घ्य देत असते.)

नमोऽस्तु ते ! धन्य एक सकल जगीं तूंच ! उगवत्या रवी !

भावगुणीं जी अतुला । भक्तीनें अर्घ्य तुला,
स्वीकारी या ऋतुला । पुण्य ज्यांत सांठवें.

गगनिं सदा जरि अससी । तरि अमुच्या नयनांसी
काल न तूं दिसलासी ! आज तुझे कर नवे ।

थोर हृदय परि तव हें । अपराधा नच पाहे,
गतवृत्त न मनिं राहे । फिरुनि कधि न आठवे ।

मावळले काल रवि । वार्ताही ती न हवी !
तेज तुझें त्यां लपवी । स्वकर पसरि नवनवे !

जो प्रकाश काल रमे। आतां ते तिमिर गमे।
हा प्रकाश कधिं न शमे । तव करिं जो संभवे.

थोर तूंच ! धन्य तूच ! तेजोनिधि दिव्य तूंच !
नयनिं मनीं एक तूंच । इतर कांहिं नाठवे !

झालें मनिं हेंच ठाम । कीं रवी तुजलाच नाम !
तेजाचें तूंच धाम । सांगावया का हवें ?

स्तुति आतां इतरांची । कधिं नाहीं व्हायाची !
वंदन हें तुजलाची । सतत, उगवत्या रवे !

जुलै, १९९४

## ती कोण ?

दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी,
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे;

भुलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी,
रात्रीमागुनि धांवतो दिवसही, की भेट व्हावी कुठें?

जीवाचें जगणें असेंच असतें सापेक्ष प्रेमावरी !
डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे !

मी हें पाहुनि जीवबंधन असें शोकाते होतों परी,
कांकीं या मम लक्ष्मशून्य हृदयीं कांही न आशा स्फुरे !

ओठांशी भिडतें रहस्य मनिंचे - सांगू कुणाला परी,
अश्रू हे नयनींहि - माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ?

आलें हें भरुनि रितें हृदयही - देऊं कुणाच्या करीं?
आला दाटुनि कंठ - हाय ! रडुनी कोठें करूं मोकळा ?

जी माझ्यास्तव, मी जिचें सकलही; आधार जी जीवनीं
देवा ! भेटवि - दाखवी तरि मला ती कोण देवी जनीं?

- ऑगस्ट, १९१४

# अरूण

अहा! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला.
जगा जागवी, तसा जागवी कविच्या चित्ताला,

जसा उडवि हा अरुण चहुंकडे गगनीं रंगाला !
तसा पहा कवि उडवी अपुल्या चित्त-तरंगाला !

विश्वसूत्रधर सारुनिया करिं पडदा रजनीचा
जगद्रंगभूवरि का उडवित गुलाल गगनींचा ?

करी मंगलाचरणा मंजुल द्विज गुंजारव हा,
येत्या संसाराची नांदी चाले काय अहा !

पूर्वदिशेवर लाल रंग हा कोण कुठुनि उधळी ?
किंवा फुटली तिच्याच हृदयीं प्रेमाची उकळी ?

रविसदनाच्या गवाक्षास हीकाय लाल कांच ?
पल्याड लपलें तोंड तयाचें, दिसेल आतांच !

प्रात:काळीं गगनपुष्प कीं सूर्याचें फुललें ?
सुगंधमकरंदांचे रस हे चहूंकडे झुकले ?

सदा सर्वदा जगदुद्धारा धरिती ज्या घेर
त्या मंगल सरितांचे आहे का हें माहेर ?

कुणी महात्मा विश्वोद्धारास्तव तप आचरितां
उचंबळुनि का वाहत त्याच्या हृदयाची सरिता ?

गत पुण्याच्या पुष्करिणींतुनि तेज काढण्याला
उडी रवीनें घालितांच कां फेस उचंबळला?

अखंड सौभाग्याची सारिता माझी भूमाता
काय लाविते कपाळभर ती हा मळवट आतां?

कीं सोडुनि जी अम्हां चालली कष्टे निस्तूळ
महाराष्ट्र-लक्ष्मीची त्या ही दिसे पायधूळ?

भरतें स्वर्गी ये पितरांच्या करुणारसरंगा,
अम्हां आळशांवर मग ये कीं पूर्वपुण्यगंगा !

कल्पलतांवर फुलें बहरता सडा परागाचा
काय तरंगे स्वर्गंगाजलिं तांबुस रंगाचा?

दिनरजनींच्या फटींतून या फार दूर ओंड
दिसते कीं हें कालगर्भिच्या स्वर्गाचें तोंड?

हा रजनीच्या उदरी दिसतो गर्भचि दिवसाचा,
कीं काळाचा बाळ नवा हा मव्याच नवसाचा !

दिनरजनींचा, शुभाशुभांचा, पापुण्यांचा,
मंगल संगम रंगपटचि हा दावित गगनाचा !

काय निघाला मानसपुत्रचि विराट पुरुषाचा
विश्वैक्यास्तव मिरवित हा ध्वज विश्वसमत्वाचा ?

विश्वहितास्तव रोज सोडि जो रविला गगनांत;
पुराणपुरुषाचा कीं उघडा पळता तळहात?

विश्वहितपरा ही खिस्ताची रक्तमया माया,
महंमदाच्या पैगामाची किंवा ही काया ?

शांत रसा या अभंग वाणी प्रसवे तुकयाची
दया परतली कीं बुद्धाच्या उदार हृदयाची ?

दिव्य भावना भक्तमनीं ज्या त्यांची ही मूर्ति,
भावि कवींच्या रसवंतीची की अस्फूट स्फूर्ति?

आज निपजल्या प्रीतीचा हा मंगल अभिषेक,
जगदिशाच्या कृपावृष्टि ची कीं पहिली फेक?

पतिव्रता गतसती जयांचें अग्निशयनिं निजणें
अखंड सौभाग्याचें त्यांचें किंवा हें लेणें?

यज्ञकाळची ही रामाची सोन्याची सीता,
येत्या अवताराची छाया, कीं रक्तस्फीता ?

कीं, भवितव्या या देवीच्या या विमल दुग्धधारा
धांवत सुटल्या, परितोषाया विश्व शुद्ध सारा?

उद्धाराया पुन्हां धांवली किंवा भवभीतां
श्रीकृष्णाच्या मनिं उरलेली श्रीभगवद्गीता?

भावि कालचें हें स्वर्गाचें स्वप्न असे काय ?

ब्रह्मस्वराचा भावि सगुण कीं तेजोमय काय ?

विश्व रची जी आधी, कारें मग वृद्धि पुढें त्याची,
'आज' रचाया आली का ती इच्छा ईशाची ?

ब्रह्मपदाच्या किल्ल्यावर कीं फडके जरिपटका?
चिरंतनाची सनद मानावां, तिचा ताम्रपट का?

अंत न पाही भगवंताला आली काय दया?
चिन्मंगल मग उभें नभीं हे भूवरिं उतराया?

अहा! तयाच्या स्पर्शे होई शुद्ध हृत्तरंग,
दिव्य दृष्टिला पुरता कळला अरुणाचा रंग !

मना ! कल्पना पुरे ! प्रभूची हीच असे जाण
सौंदर्याची, मांगल्याची, प्रेमाची खाण !

प्रीतीरसाच्या, सौंदर्याच्या, देवींच्या मूर्ति
नित्य निर्मि ही परमेशाची अरुणमया स्फूर्ति !

आज उद्यांच्या महाकवींनो ! हृदयि नीट ठेवा
प्रेमरसाचा, मांगल्याचा हा अद्‌भुत ठेवा !

अरुण-रसानें याच रंगवा मनिंची परि चित्रें !
रंगवीत जा तशी उद्यांच्या देवीचीं चित्रें !

या रंगाने रंगवितों मी माझ्या हृदयाला,
पडद्यापडद्यावरी काढिलें चित्राचित्राला !

एका पडद्यावरि परि रंगे प्रेमचित्र एक;
हृदयाच्या हृदयांतिल माझ्या तोच शिलालेख !

त्या चित्राचा, त्या पडद्याचा, मम गाना धीर;
त्या चित्रांतिल देवीचा मी विकला शाहीर !

मरतां मी, तो जपाच माझ्या हृदयाचा पडदा;
त्या देवीचा झालों अगणित जन्मांचा बंदा !

तिच्या गालिंचा अरुण सारखा, लज्जे ! वाहूं दे !
'गोविंदाग्रज' कविच्या 'अरुणा' त्यांतच राहूं दे !

- सप्टेंबर, १९१४.

# निद्रागीत

नीज गुणी बाळ झणीं शान्त, यावरी -
गाउं किती ? कुंटितमति, नीज झढकरी !
विश्वाच्या स्नेहसीं मग्न जाहलें,
प्रेमाच्या अश्रुजलें बाळ नाहलें,
मायेची तीट गालिं, चित्र जणुं हले,

सुयशाचें दुग्धपान गोड त्यावरी !
हृदयाचा केला हा पाळणा नवा,
बांधाया ममतेचा पाश मग हवा,
हृत्तरंग हलवि तया करुनि मृदु रवा,
ब्रह्म सगुण बाळरूप रमत अंतरीं !

मात करि मंगलमय गायना अहा !
प्रेमभरें विश्व त्यांत रंगलें पहा;
सोड गड्या ! हट्ट तुला शोभतो न हा,
अजुनि तुजसि नीज न ये - सांग कां तरी ?

- नोव्हेंबर, १९१४.

# भीमकबाळा

( माझ्या 'वेड्यांच्या बाजारांत' एका उपवर मुलीच्या तोंडी हें साधें गाणें तिचीच स्थिती वर्णन करण्यासाठी घातलें आहे. गाणें त्या मुलीनेंच केलें आहे. अशी कल्पना आहे. माझी स्वत:ची एवढीच कविता मला आवडते.)

(चाल : यादवराया भाई याहो)

भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ।।
निश्चय केला बंधुवरानें द्यावी शिशुपाळा ।।

विवाहकाळीं खळ तो आला तंव राजसबाळा।
शोकभरानें विव्हळ झाली, दोष देइ भाळा ।।

" अजुनि तरी या दासीसाठी या हो गोपाळा।
काळवेळ ही जवळी आलीं, संकट हें टाळा।।

ऐन समयिं का निष्ठुर झालां ? काय असे केलें?
दीनांवरिचें प्रेम सदाचें आज कुठें लपलें ?

कधि पाहिनसें झालें मजला सांवळि ती काया ।
कधिं वाहिन ही काया माझी देवा तव पागां ?

कधी सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा ?
मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा ?

नका करुं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा ।
वाट बघूं किति घेउनि हातीं अश्रूंची माळा ?

किती आळवूं परोपरीनें ? कंठ किं हो सुकला ।
तरी यावया अजुनी माझा माधव कां चुकला ?

सर्वसाक्षि भगवंता ! आतां अंत नका पाहूं ।
- कीं विषपानें प्राण तरी हा पदकमला वाहूं ।

मीच अभागी; म्हणुनी आपण अजुनी नच आलां ।
ब्रह्म सगुण जें दुर्लभ सकळां; मिळे कसें मजला ?

रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि जाई ।
ऊर भरुनि ये - शब्द न चाले - कवन विरुनि जाई ।।१।।

- १९१४

# ओसाड आडांतील एकच फूल

होता एक जुनाट आड पडका, ओसाडसा जो असे,
कोठेंसा, कधिंचा, विशेष नव्हता कोणास तो माहित;

होतें काय तयांत हें नच कधीं कोणी पहाया बसे,
नाहीं जात कधीं तिथें कुणि जिथें नाही स्वतांचे हित !

होता आड खरोखरीच अगदी तैसा दिसायास तो,
जो जैसा दिसतो जगास दुरुनी, तैसाच तो भासतो;

घेतो कोण उगाच कष्ट इतके लोकी खऱ्याखातर !
'आहे भूत तयांत खास !' वदती ऐसेंहि कोणी तर

बोले वाइट त्यास कोणि, नसती होती वंदता जरी,
लोटी सृष्टिहि त्याप्रती जरि तशा त्या आडमार्गावर,

टाकीना नुसती जरी नजरही कोणी बिचाऱ्यावर,
देवानेंहि दिलें असेंच नव्हतें टाकून त्याला तरी !

देवाला करणें-विचित्रच तरी आहे किती गोष्ट ही,
होतें नाचत एक फूल तसल्या ओसाड आडांतहि !

(२)

पानांची गरदी लता करिती त्या आडाचिया भोंवती,
वाटे अंथरलें जणूं कफन ते जीवंत तोंडावरी;

काळीभोर कभिन्न गर्द विलसे छाया मधें खोल ती,
आडांतील जलांतही मिसळूनी त्यालाहि काळें करी !

आडाच्या असल्या भकास उदरी होतें तसें फूल तें;
प्रेमाचा मृत अश्रु जेविं गिळिला जीवन्मृताच्या मनीं;

केव्हांही नच लागला सुमनसा वाराहि बाहेरुनी;
काळोखांतिल तेवढेंच जग तें होते तयाभोंवतें,

पुष्पाचें वळलें असे मुख सदा पाण्याकडे खालती,
श्वासाने जणुं त्याचिया चिमुकल्या लाटा जलीं हालती;

केव्हां तन्मकरंदबिंदु पडतां जी वर्तुलें चालती,
घालाया रमणीकरांत बघतां तेव्हांच मागाल ती !

येई एक कसाबसा तरि सदा तेथे रवीचा कर,
पुष्पाचें प्रतिबिंब जो जलिं करी त्यालागि दृग्गोचर.

(३)

त्या चित्राप्रति भावबद्धनयनें आशादृशा पाहणें -
हा नित्यक्रम भाबड्या सरळ त्या माझ्या फुलाचा असे;

त्याला सर्वहि वाहणें, विरुनिया त्याच्यामधें राहणें,
आशा एकच एवढी मनिं सदा वेड्या फुलाच्या वसे.

त्याचा वास असे मनोहर सदा, शंकर नसे याविशी,
या भावें परि गंध जो दरवळे न्यारीच त्याची मजा !

केव्हांही हलतांच फुल पवनें खेदास देते रजा,
प्रेमानें डुलतां परी करितसे वृत्तीस वेडीपिशी !

हांसे फूल जलांतल्या बघुनियां त्या स्वीय चित्राकडे,
हांसे तेंहि तसेंच तों अधिक हें हासें तसें बापडे;

नाचे हें पवनांत, तेंहि तिकडे पाण्यामधें बागडें,
'माझा भाव तयाप्रति कळतसे' मानीत हें बापडें;

जोडीचा महिमा असा चहुंकडे; धिक् सर्व जोडीविणें
लाभे जोड तरी कुणास न रुचे शून्यांतलेंही जिणें?

(४)

खाली तोंड करुन चंचल जलीं पाहून वेड्यापरी
भावाचे अपुल्याच रंग वठवी त्या प्रेमचित्रावरी;

घेई यापरि बांधुनी उगिच तें जीवास आशागुणी,
हांसू मात्र नका म्हणून कधिंही माझ्या फुलाला कुणी !

त्या आशेंत रहस्य काय लपलें जाणावयाला जरा -
वाऱ्यानें करपून जातिल अशी व्हावीं फुलांचीं मनें;

चित्रे चंचल जी अदृश्य उघड्या डोळ्यांस भावाविणे
पाहायास तयांस नीट तुमचे डोळे फुलांचे करा !

भावाचे अपुऱ्याच रंग बघणें वाटेल तेथें मना,
त्या वेड्याबगड्या फुलांतच असे का तेवढ्या दोष हा ?

मोठे पंडित काय लाविती दिवे, ते एकदांचे पहा,
कोणीं काय कधी कुठें बघितलें जें ये विकारांत ना ?

जो तो या जगतावरी पसरतो छाया मनाची सदा
निःश्वासें तुमच्याच सृष्टि करपे, तेव्हांच ती तापदा !

(५)

कांही काळ असाच फूल गमवी, आशा पुढें वाढली;
चुंबावें जलिंच्या फुलास म्हणुनी तें मान खाली करी;

वाऱ्यानें मुख लागतांच उदका छाया विराली जलीं,
पाणी मात्र पडे मुखीं सहज तों, तैसेंच आशेवरी !

त्या धक्क्यासरसेंच फूल मग जें कोमेजलें एकदां,
नाहीं ते हंसलें पुन्हां ! विकसलें नाही पुन्हां तें कदा !

आशेने दुसऱ्या दिनी फिरुनि तो आला रवीचा कर,
गेला खिन्न मनें, परी न चमके त्या प्रेतमात्रावर.

पाण्यामाजि पुढें गळून पडलें ते फूल वेडें पिसें,
पाताळांत कुठें असेल दडलें का प्रेमनिर्माल्य तें ?

छेः छेः ! प्रेममय स्वरुप धरुनि भूतापरी हिंडते,
कोठें आज उजाड जें, अजुनिही तेथे कधी ते दिसे !

ते मेलें म्हणुनी उणे न ठरतें; मच्चित्त त्याला भुले;
मेलेल्या हृदया मदीय असलीं वाहीन मेलीं फुलें !

- नोव्हेंबर १९१४.

# फुले वेंचिली पण

(प्रेमस्थान नाहीं अशा मनुष्याला चांगल्यानेंसुद्धा खेद होतो.)

पन्हाळगडचा पठार सगळा घालुनि पायांखाली ।
फुलें जमविलीं तऱ्हेतऱ्हेची जीं जीं हातीं आलीं ॥

शेवंतीचा गेंद हांसरा, शुभ्र मोगरा फुलला ।
मदनबाण हा पाहुनि असला पुष्पबाणही भुलला ॥

नाजुक जाईंचीं हीं बाळें; गुलाब ताजा छान ।
ही इवलालीं रानफुलेंही रंगें हरितां भान ॥

ही तुळशीची मंजुळ, तैसा सबजा महंमदाचा ।
भू-कमळें हीं, अनंत फुलतां औरच वास तयांचा ॥

किती आणखी सांगूं नांवें - आणि कशाला नुसतीं ?
हेंच पुरें की सगळीं होतीं जीं वासें मुसमुसतीं ॥

फुलवंतीनें ओंजळ माझी भरुनी लागे शीग ।
सुंगधि सौंदर्याचा नाचे हातावरतीं ढीग ॥

काव्यभरानें तरुण नयन हे नवतेजानें न्हाले ।
प्रणयरसानें हृदयहि माझे उचंबळुनि वर आलें ॥

'' फुलें वेंचिलीं- पण-आतां ही द्यावीं कोणालागीं ?''
राक्षसवृत्ति स्मरणदेवता क्षणात झाली जागी ॥

''हतभागी हा जीव एकला; प्रीतीदेवता नाही ।
मोडुनि पडलें हृन्मयमंदिर शतधां आघातांही ॥

निष्प्रेमाचें जीवन माझे रुक्ष चिंतनी जावें ।
संकल्पचि हा वरला ठरला; कां ते दैवा ठावे ।

कांट्यांवरि या कोमल हृदया टाकुनि देवा क्रूर ।
कुठें फुलांची धनीन माझी दिली दवडुनी दूर ?

कृतकर्माची फळें भोगणें अवश्य जीवा जगिं या ।
गुदस्त ते गुल्‌दस्त; नको ते पुन:पुन्हां मनिं याया'' ॥

अभंग निश्चय अशा प्रकारे कितीकदां जरि केला ।
या पुष्पांसम मृदुहि कारणें दुभंगती परि त्याला ॥

वृत्ति बावरी झालि, आंतल्या आंत बिचारी रडली ।
जीवाचीं नयनांतुनि पुष्पें त्या पुष्पावरि पडलीं ॥

जीव जाहला जड; तीं हातीं पुष्पेंहि जड झाली ।
'' फुलें वेंचिली पण -पण-आतां देतों टाकूनि खाली ॥

चिरंमृताला हवा कशाला हा कसला हव्यास ?
जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास !

डोळे असुनि अंध असा कुणि तुडविल यांना पायीं ।
रसिक कुणी प्रेमांध उचलुनी अर्पिल रमणीहृदयी ॥

ज्या देवानें असे मांडिला असला निष्ठुर खेळ ।
असेल त्याला बसवायाचा तसाच कांही मेळ ॥

त्याची त्याला फेंकुनि देतो; हे ब्रह्मार्पणमस्तु ।
कुठेंहि पडतां पावतील त्या विश्वचि त्याचें वास्तु ॥

नाजुक असली फुलें अशा या माझ्या हृदयासाठी ।
देवाजवळी दाद मागतिल लागुनि त्याच्यापाठी,''

देत उधळुनि फुलें अर्पितां देवा चहूंकडेही ।
'गोविंदाग्रज' तशी फुलें हीं रसिकां तुम्हा देई ॥

- जानेवारी १९१४, अथणी.

# ‘दिव्य प्रेमाची जाति’

संध्यापट  गगनीं पसरी ।
तारांची राणी हंसरी ॥
कधीं गालिचा अरुणाचा ।
करि ती तेजस्वी नाचा ॥
शुक्रतारका अशी नभा ।
नवी नवी देई शोभा ॥

तारा गगनीं
परि भूवरुनी;
बघतां नयनीं
जी संचरते हृदयीं, ती ।
दिव्य प्रेमाची जाति ॥धु. ॥ १ ॥

न मिळे अवसर अभिलाषा ।
‘दे घे’ ची नाही भाषा ॥
भाव आमचा थरारला ।
तरि दादहि त्याची न तिला ॥
एखाद्या किरणापुरता ।
प्रेमबंध होतो पुरता ॥

जिच्या जिवाला
तिळ मोबदला
नकोच कसला;
निराश जन्मापासुनि ती
दिव्य प्रेमाची जाति ॥२॥

प्राण चंद्र ज्या कुमुदांना ।
काय जाणतो तो त्यांना ?
फुलें हंसति पाहुनि रविला ।
कळे न परि त्याचें त्याला ॥

चंद्रकांत मणि पाझरती ।
चंद्र फिरे वरच्यावरती ॥
कवि कोठेंतरि,
तत्कवितापरि

फिरे दिगंतरि,
रसिकमनें मग कविवरतीं।
करितो ती दिव्य प्रीती ॥३॥

सौदर्याचा उत्कर्ष ।
कुठें असे तरि दे हर्ष ॥
दिशाकाल होउनि सान्त ।
त्या वृत्तिंत विरघळतात ॥
दर्शन - किंवा स्मरण पुरें ।
तन्मयता देहीं प्रसरे ॥

प्रभुची शोभा
दिव्य यशोभा
हरिते लोभा;
तदाकार करिते वृत्ति ।
दिव्य प्रेमाची जाति ॥४॥

सौंदर्याच्या ज्या श्रेणि ।
तीं देवाघरचीं लेणी ।
जिवास होतां जाणीव ।
देहाची सांडी शींव ॥
उदास वृत्तीचा प्रसर ।
स्वार्थाचा पाडी विसर ।

सौंदर्यानें
ऐश्वर्यानें
रंगुनि जाणें
दिव्य जीवनें तीं लोकी ।
तच्चिंतनी तदालोकीं ॥५॥

प्रेमविषय अपरंपार ।
सूक्ष्म-रुप भव्याकार ॥
निरभिलाष तन्मयता ती ।
दिव्य प्रेमाची जाति ॥
कौतुक, विस्मय आश्चर्य ।
शून्यवृत्ति किंवा सभय ॥

अनेक परिची

त्या प्रेमाची
रुपें साचीं
आविष्करणीं जाणविती ।
दिव्य प्रेमाची जाति ।।६ ।।

- फेब्रुवारी १९१४, म्हापसें.

# पुनर्विकसन

दयाघना ! विनति करित मन तुज हें चिरविरहें तापतां !
धन्य विश्वरचना ही । यशासांग सर्व कांहिं
न्यून तींत मुळिं नाही । मत्सरेंहि पाहता !
वस्तुवस्तुमात्राला । नाशकाल जरि दिधला,
तरि फिरुनी उदयाला । काल असे तत्त्वतां !
अस्तंगत सूर्याला । सुप्रभात उदयाला,
शुक्लपक्षिं चंद्राला । फिरुनी बरी पूर्णता !
वर्षाऋतु समयाला । प्रतिवर्षी ये चपला,
प्रतिवसंत वृक्षाला । जन्म नवा आणिता !
भरतीचा नियतकाल । जलधिचे हरित हाल
रात्रीं नक्षत्रजाल । वरि नवी अपूर्वता !
पाहुनि हें नवविकसन। सुप्रसन्न होई मन,
परि विचारि दीनवदन । बालक हा नेणता !
या मदीय चिरनिराश । जीवन्मृत माणसास
पुनरपि उमलावयास । काल दिला कोणता ?

- डिसेंबर, १९९४

# हालत्या पिंपळपानात

(राहत्या घराच्या खिडकीसमोर पिंपळाचे पान वाऱ्यानें सारखे फडफडत होतें. परमेश्वराच्या
इच्छेवांचून पानसुद्धा हालत नाही; या लौकिक श्रुतीवरुन
पुढील विचार सहजच मनांत वावरुं लागले. )

कोवळ्या हालत्या चिमण्या पिंपळपाना !
कल्पना हले तुज बघुनि असें हालताना !

निजशाखेच्या या शेवटच्या टोंकाशीं
कां इकडुनि तिकडे सांग सारखें फिरशी ?
हा हिरवा, तांबुस रंग काळसर कांही;
तूं भिरभिर फिरतां स्पष्ट भेद नच राही.

या झुळझुळत्या वाऱ्यानें नाचसी,
कोंवळ्या सूर्यतापानें तळपसी,
आपल्या मिश्र रंगाने झळकसी,

तुजकडेच माझें लक्ष सारखें लागे,
बांधिले तयाला गूढ कांहिं अनुरागें ।

जीं गूढ अप्सरागीतें नभिं पाझरतीं,
तीं वहात येती खाली वाऱ्यावरती ।
ऐकुनी तयांचे सुर मुके नवलाचे,
या हृदयकंपनें जीव काय तव नाचे ?

कीं जगीं ताप जो सारा उसळला,
रवितेजामार्जि भरारा मिसळला,
लागतां तयाचा वारा, कोमला,
थरकांप होत हा तव कोमल देहाचा !
वद नाच भीतिचा कीं हा आनंदाचा ?

हें तुझ्याच दु:खे हृदय असे तडफडतें?
विश्वैक्यवृत्तिची ध्वजा काय फडफडते ?
तू स्वयें हालसी, कीं तुज कोणी हलवी?
सुखदु:खी झुलसी स्वतां इतर कीं झुलवी ?

कळतसें तुझें तुज का हें हालणें ?
की दुसऱ्यासाठी आहे चालणें?

कीं भावावांचुनि पाहे डोलणें ?

तव अस्तित्वाचे ज्ञान असे कां तुजला?
तुज इच्छातृप्ति क्रियाभेद का कळला ?

तुजभंवत जी ही सृष्टि असे पानांची,
कल्पना असे का तिला तुझ्या नाचाची ?
रस एकच तरुचा तुम्हांमधूनी वाही -
सुखदु:खभाव ही जोडि तुम्हां कीं नाही ?

विश्वेच्या विश्वें सारी यापरी
स्थलि भिन्न, भिन्न आकारीं, भूवरीं
नांदती गड्या कांतारीं कितितरी !

जाणीव तुम्हांला परस्परांची का रे
जीवैक्य असे की, भिन्न भिन्न जग सारें ?

क्रम हाच काय वद तुझ्या जीवनाचा रे ?
परिणाम करित का सृष्टीवर हें सारें ?
कुणि चित्रगुप्त हें लिहून ठेवित आहे ?
की स्वैरनदाच्या ओघावर हें वाहे ?

हे अवश्य जग चालाया कां असे ?
कीं नसत्याहुनिही वायां हे पिसें ?
स्फूर्तिंची कुणाच्या काया हलतसे?

मम नयनिं चित्रसम जाऊनि बैसायाचें,
इतुकेंच कार्य का सांग तुझ्या नाचाचें ?

मम करी कपाळीं दुर्दैवाच्या रेषा
मजसाठिं लिहिती चिरदु:खभोग हा पेशा !
परि असति तुझ्या तर रेषा साऱ्या अंगी,
दु:खही असे का तितुकें त्यांच्या संगी ?

कीं वाऱ्यावरच्या ताना यापरी
उमटल्या अशा फिरतांना, तुजवरी?
त्या फिरुनि फिरुनि घेतांना अंतरीं-

निजनादब्रह्मीं गुंग होउनी डुलसी ?
तें गीत आंतल्या आंत ऐकूनी खुलसी ?

कीं दुर्दैवाच्या किंकाळ्या, या ताना,
तव कोमल हृदयीं ठेविति वण जातां ना ?
खालतीं पडुनि मग मातिंत मिसळुनि जाया,
तूं फडफड करिशी अशी भूमिवर याया ?

परि थांब ! जरा गा गाना, तोषदा,
ऐकवीं माझिया कांना एकदां;
स्थिर राहिं, पिंपळपाना ! तू कदा.

मज गाऊं दे, मज नाचूं दे, तुजसंगें,
सुखदुःख सारखें सेवूं मानसरंगे !

संबंध असो वा नसो आपणांमाजी,
मी एक कारणासाठी तुजवर राजी-
नवबालाहृदयीं प्रीतीं नवी हलतांना
तच्छिरी हलसि तूं तसाच पिंपळपाना !

जीं हृदयकंपने सारी मानसी,
ती आम्हांते बाहेरी दाविशी !
निर्दोष मनानें भारी हालसी !

कुणि बाला जरि मज देइल असला मान,
तरि सुखेंच होइन मीही पिंपळपान !

- डिसेंबर, १९१४

# हा क्षण

रमणि ! स्मरणी आमरणचि या हृदयपटावर ठसा
सदाचा ठेविला हा क्षण असा !
भूतभविष्यांमध्ये तरलतर वर्तमान ज्यापरी

चंचल सीमारेषा धरी;
गतदु:खाच्या भावि सुखाच्या मधें तसा सुंदरी !

क्षण हा संशयरेषेपरी !
गतकालाच्या दु:खाचें हें पळतें पाऊल !

सुखाची येत्या चाहूल !
जरि संशय माझ्या क्षणास या दूषवी,

तरि आयुष्यातें अवघ्या क्षण भूषवी,
करि दुभंग जीवनदास दे गति नवी;

अनंत सौख्याचा हा होइल आदिकालची तरी,
नातर अंत तरी सुंदरी !

- जुलै, १९१५

# मागे पाहणें

(चाल : नोहे हा पवन जवन.)

चालतसे सारखीच ही मुशाफरी ॥
जहांगीर या फकीर हा पिशापरी ॥ धु. ॥
जिकडे मज मार्ग फुटे । न कळत मी फिरत सुटे ॥
नच कसलीही माया । पायबंद बांधाया ।
मागुनि मज शोकवशा । पाहिना कुणी आशा ।
मग मागें वळुनी कां । पाहणें तरी? ।।१ ॥

- ३०.७.१९९५, पुणे

# फुटकी तपेली

(आत्मज्ञान मायेंतून गळूं लागलें म्हणजे आत्मा अगतिक होतोच.)

नको तपेली फुटकी असली !
जीव बोलतो पाणी पाणी
चिरकालाची तहान लागुनि;
अशी तपेली मजला देउनि, थट्टा करितां तेथें कसली ?

प्रवास करणें फार दूरवर !
आद्याच्या पर्यंतापासुनि
अंताच्या आरंभामधुनी -
एक अनंतें माप घेउनी, कैक अनंतें जाणें भरभर !

विश्व कशाचें घेउनि बसलां ?
विश्व मला जें दिसतें, त्यांतिल
विश्वें तुमची अणुसम होतिल;
निजक्षणी तें तुमच्या जिरविल, काळांचा बाजारच सगळा !

प्रवास माझा असा भयंकर !
या विश्वाच्या मागुनि जाणें,
मागुनि सुटुनी पुढें धांवणें,
अथवा सर्वांठायिं पसरणें, आद्यंताचे कापुनि अंतर !

कडक कायदा धांवायाचा !
पाउल एकादें जरि चुकणें,
पहिल्यापासुनि पुन्हां धांवणे !
आपुल्याच वा भंवतीं फिरणें ! मार्ग कुठुनि मग सरावयाचा ?

आधी असते पुष्कळ सोबत;
कितीक 'मी, मी' मजला दिसती,
पुढें चालतां भरभर मरती;
मरुनी माझ्या ठायीं जगती, माझीच मला उरते संगत !

माझें मीपण फारच मोठें !
दुज्या रहाया जागा नाहीं,
एकलकोंडा म्हणुनी राही,
खोटें 'मी' ही अंगिंच पाहीं, राहिल सोबत मग तो कोठें ?

मज जाणाया मीच विचक्षण !
नसते परके आधिं जाणतों,
असत्या मलाच न परी बघतों;
मज ओळखतां इतर विसरतो, माझें सर्वच फार विलक्षण !

तऱ्हाच माझी विचित्र असली !
असला मी - तो प्रवास तसला !
कडक कायदा त्याचा असला.
तशा प्रवासीं मजला, अशी तपेली देतां कसली ?

अनंततेची तहान माझी,
मिळतां पाणीं वाढे उलटी,
अधिकचि पाणी - अधिकचि मोठी;
जलब्रह्म द्या परि तिजसाठीं, तरीच होइल मग ती राजी !

भांडी असलीं कां मज देतां ?
भरतांना जीं होति रिकामी,
भरुनि ठेविलीं तरि कुचकामी,
पडतिल कोणाच्या तीं कामीं? कधीं परत बोला हो घेतां !

वागविण्याचें उगाच ओझें !
करी प्रवासामाजीं खोटी,
फुटकि तपेली तुमची खोटी,
मृगजळ नसतें दावी खोटी, कधी तिच्यांतुन नच गळलें जें !

मायेची ही खरी तपेली;
मृगजळ प्याया आंत उतरतों,
अफाट तरि मी त्यांतच बुडतों,
नसत्यामाजी असतां जिरतो; नको मला ही असली मेली !

ब्रह्मांडाची करा तपेली !
माझी ओळख पाणि तिच्यांतिल,
कैक अनंतें तयांत जिरतिल,
माझ्यावांचुनि सारे विरतिल, शिरे तपेली ही असा जलीं !

ब्रह्मांडाची खरी तपेली;
करा रिकामी तरिही भरली,
भरुनी भरणें भरवुनि उरली,
जिरतिल विश्वे कितीक असलीं, कांठबरी जरि आधीं भरली !

माझी ओळख विचित्र पाणी;
जुनि ओळख मग नवीस आणी,
पाण्या वी अव्याहत पाणी,
पाण्यांतहि मग खेळे पाणी, हाय ! कसें हें कोणि न जाणी !

ब्रह्मांडाची करा तपेली;
तृषा नाहिंशी तिनें करीन,
तपेलीसही जलिं भरवीन;
प्रवासही जलिं जिरवीन, नको मला ही असली मेली !

प्रकार घ्या हा मनिं एकंदर;
सर्वस्वाची करा तपेली;
माझ्या पाण्यानें भरलेली,
पाहुनि तिजला तीन्ही काळीं, खुबी ओळखा क्या है अंदर !

- जुलै १९१५

# मनांतली दिवसरात्र

अनंत नभ हें वरी पसरलें न मर्या तया;
अनंत मनहि तसें जरि लघू शरीरांत या;
सदैव नभिं खेळती दिनदिशा लपंडाव हा;
मनांतहि तशाच या दिवसरात्र दोन्ही पहा !

उषा विरुनि जात तों प्रकटतो नभीं भास्कर;
नवा दिवस नाचतो नवनव्या जगाच्या वर !
मनात उगवे तसा क्षणिं नवीन आशारवि;
प्रफुल्ल तर कल्पनेप्रति नवीन ये पालवी !

फिरे दिनभरी रवि; प्रकट होई संध्या पुढें;
गमे उदयकाळशी, रविच तो बिचारा बुडे !
तशीच मनिं सारखी वरिवरीच आशा चढे;
गमे क्षणच जाहली सफल, तोंच खालीं पडे !

तमास पसरी निशा मग जगांत जांता रवि;
दिसें सकल शून्यसें, तम नव्या तमा मात्र वी !
विषण्ण हृदयीं तशी भयकरा निराशा जडे;
तमोमय रसा गिळी मन मनीं बिचारें रडे !

तशांत गगनामधें दिसत दूर तारा परी -
मनांतहि सहस्त्रधा फिरत कल्पना बावरी !
पुन्हां उगवतो रवि प्रभवतो प्रकाशा नव;
निराश मनिंही पुन्हां करि तशीच आशा रव !

असें सतत चालतें जनिं तसें मनीं सारखे;
असे हृदयि आज जें गमत तें उद्यां पारखे !
नको दिवसरात्र तीं न सरती कधी जी पहा,
सरेल कधिं तो सरो हृदयिंचा लपंडाव हा !

- ऑगस्ट, १९९५.

# गीत-विरक्ति

देवी दर्शनदुर्लभ झाली
आशालेशहि नच कांही;
संसाराची होउनि भाषा
जीवनकवनांतुनि वाही !

प्रतिवस्तूचा शब्दचि उरला
भावमया जगती राही ;
त्या शब्दांचा अर्थ कुणातें
वस्तुज्ञानाविण नाही !

गूढार्थचि तो अलिखित भागी
मत्कवनीं भरुनी जाई;
नसतां परि संकेत जिवाचा
उमगेना तें कवणाही !

गीत कळावें जीस नसे ती
दिशा शोधिल्या जरि दाही;
'गोविंदाग्रज' सहजचि कवनें
जाळि निराशा खर दाही !

- नोव्हेंबर, १९१५.

# सुभाषित

## खरें औषध

जे जे रोग मनास होति, हृदया संताप जो जाळतो,
जे जे धाव जिवास लागुनि जगा तो नित्य कंटाळतो;
त्या त्या विस्मृति हेंच औषध खरें आहे गमे एक तें;
जें लोकी नसतें तरी मग कुणी जीवंत ना राहतें !

२५-११-१९१५, पुणे.

# दुर्दर्शन

नाना रोग, जुगुप्सिता, व्यसनिता विच्छिन्न प्रेतावलि,
भूकंपादि अनर्थ, दैवघाटितें हीं सर्वही पाहिली;
त्यांही खिन्न न चित्त होत, परि तें होतं तदा ज्यापरी
विश्वब्ध प्रणयास वंचित यदा सौंदर्य स्वार्थास्तव !

२-१२-१९१५, पुणें

# त्याच तारकेस याचना

थांब जरा, तारके ! जरा तरि थांब, सखे सुंदरि !
कुणिकडे नेशी मज यापरी ?

तव किरणांच्या सुंदर कोमल आधारावरि सखे !
केलें माझें मज पारखें !

स्वर्गसुखाची आशा लावुनि ओढिसि मजला गडे !
थांबचि-सांग परी कुणिकडे ?

अति दु:खांच्या सतत अनुभवें हळवा जिव जाहला,
सुखाची सवय नाहीं त्याजला!
परि आशा लावुनि नेशी मज वरिवरी,
देशील टाकुनी स्वर्गातुनि मज जरी,
तो अध:पातही या उन्नतिच्या परी !

उच्चतेस या योग्य न मी तरि स्वप्रेमें सांवरी,
याचना 'गोविंदाग्रज' करी.

२८-१२-१९१५, पुणे.

प्रेमें जीं कुसुमें दिलींस मजला
तूं, प्रेमले ! धाडुनी,

कोमेजून उद्यांच जातिल - सुखें
जावोत कोमेजुनी !

नाहीं वाटत खेद लेश, उलटा
आनंद वाटे मना;

प्रेमाची स्मृति त्या जिवास जडुनी
आजन्म राहील ना !

- जानेवारी, १९१६

# एका जुन्या श्लोकाची आठवण

''डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कांनी, पदी चालतों ।
जिव्हेनें रस चाखतों, मधुरही वाचें अम्ही बोलतों ॥
हातांनी बहुसाल काम करितों - विश्रांतिही घ्यावया ।
घेतों झोंप सुखे - फिरुन उठतों ही ईश्वराची दया.'' ॥१॥

पूर्वी पूर्ववयें प्रसन्नमयता जेव्हां मिळे सृष्टिला ।
शाळेच्या चिमण्या जगांत असतां हा श्लोक मीं वाचिला ।।
साध्या बाळमनास अर्थ पटला - आनंदही वाटला ।
आतां का करुणारस स्मृतिबलें त्याच्या असा दाटला ? ॥२॥

डोळ्यांनी बघणें, ध्वनी परिसणें इत्यादि सर्व क्रिया
आतांहि घडती; उपाधि चुकल्या नाहींत जीवासि या ॥
जेव्हा जीव थकून पाहत परी विश्रांतिही घ्यावया ।
नाही झोंप सुखे - अहो, हरपली ती ईश्वराची दया! ॥३॥

सौंदर्ये भरल्या जगास बघुनी हा प्रश्न चित्तीं उठे ।
जीवानें जगिं काय कार्य करणें श्लोकांत नाहीं कुठे ॥४॥

१२-२-१९१६, मुंबई

# निर्वाणीची विनवणी

(चाल: धाडुनि दिधले)

पाहसि आतां अंत असा कां? पीडिसि कां या दीना ?
सुंदरि, पदरीं मदीय हृदया घेसि न कां पदलीना?

क्षणैक हंससी, क्षणभर रुससी; निष्ठुर चंचलता ही;
संदिग्धा ही वृत्ति व्याकुल करित मनाप्रति पाही.

लाजुनि अजुनी स्वजना हा जन जवळी कां नच केला?
किंवा हृदया द्वेषचि दूषवि मजविषयींचा पहिला?

सुंदर वदनीं तव निर्दयता हृदय विदारत माझें;
पडुं दे श्रवणी ती शुभ वाणी मौन न हें तुज साजे.

प्रत्युत्तर दे प्रश्ना कांही; अंत वृथा न पहावा;
विनोदवचनीं थांबवि नच त्या, प्रश्नें परतवि नच वा.

संशयविष हें जाळित जीवा अधरसुधा दे रमणि;
करी विनवणी निर्वाणीची गोविंदाग्रजवाणी !

२-३-१९१६, मुंबई .

# हृदयास

जिवलग हृदया ! मूढ वृत्ति ही धारण केली कां असली?
लाथ मार त्या चंचल जगता - प्रेमाचीं सोंगे कसली !

चंचल, लहरी, रंग बेगडी सुंदरतेच्या मोहानें,
कां वाटेवर पडसी हृदया विकुनी कवडीमोलानें ?

तुझ्या जिवाच्या बोलासाठीं हपापले हे रसिक पहा ।
स्वागत करि जां त्यांचें - त्यांना हर्ष किती होईल अहा !

नटव्या सोंगामागें लागे जें, त्या सौंदर्यासाठी
नवलाखाचें मोल देसि कां? कशास या आटापाटी?

जिथें गुणांची चाड न कांही - कमअस्सल जें जातीचें;
सौदर्यचि तें कसलें? - केवळ एक बाहुलें मातीचें !

विद्यावैभव कुठें तुझें ! - तो ज्ञानाचा गौरव कोठे !
आणि कुठे रंगीत खेळणे ! ... नवल खरोखरि हें मोठें !

उदारता तव विशाल पाहुनि देवांनाही मोह सुटे;
आणिक असलें खोटेनाटे नकली नाणे सांग कुठे !

गर्वाचें घर खालीं पडुनी खुशाल मिळू दे मातींत;
रसिकांच्या मृदुहृदयमंदिरी रहा, निजयशा मिरवीत !

चिताडसी कां चित्र जिवाचें पाण्यावरच्या रेघांनी ?
'गोविंदाग्रज' सांगे तुजला 'रहा त्याहुनी स्वस्थानी'!

९-३-१९१६

# एका शब्दासाठी विनंति

क्षमा करी, जिवलगे ! क्षमा का ! न लाविता अवधि ॥
कोमल हृदय कठोर वचनीं छळि हा अपराधी ॥१॥

क्षमा करावी मी तुज, बाले, आणि तूंहि माते ॥
असेंच आतां जडलें आहे दोघांचे नातें ॥२॥

परस्परांस्तव आपण ऐसा प्रत्ययही आला ॥
तुजवांचुनि मज सुचेरुचेना; मजविणही तुजला ॥३॥

क्षणमात्राचा राग अनावर - स्वभाव दोघांचा ॥
समजुनि हें मग राग धरावा कोणीं कवणाचा? ॥४॥

जीवाच्या बागेंत खेळतो पक्षी प्रेमाचा ॥
पिसामागुनी पिसें काढणे, मार्ग न सुज्ञाचा ॥५॥

पश्चात्तापें हृदय हलवितां अश्रूंच्या धारा ॥
वाहुनि त्याला लांभू दे तो मोत्यांचा चारा ॥६॥

जें झालें तें विसरुनि, सखये ! टाकुनि इतराजी ॥
भला बुरा मी मान्य करुनिया होशिल ना माझी? ॥७॥

'गोविंदाग्रज' आणुनि नयनीं जीवाचें तोय ॥
विनवित; बाले ! लिही स्वहस्तें तूंच पुढें - ॥८॥

- २४.३.१९१६, मुंबई

# प्रेम आणि मरण

''जगीं सांगतात प्रीत पंतगाची खरी ।
झड घालून प्राण देतो दीपकाचे बरी ॥
कुठल्याशा जागी देख ।
मैदान मोकळे एक ॥ पसरलें ॥
वृक्ष थोर एकच त्यांत ।
वाढला पुऱ्या जोमांत ॥ सारखा ॥
चहुंकडेच त्याच्या भंवतें ।
गुडघाभर सारें जग तें ॥ तेथलें ॥
झुडुपेंच खुरट इवलालीं ।
मातींत पसरल्या वेली ॥ माजती ॥
रोज ती । कैक उपजती । आणखी मरती ।
नाहि त्या गणती । दादही अशांची नव्हती ॥ त्याप्रती ॥

त्यासाठी मैदानांत ।
किति वेली तळमळतात ।। सारख्या ॥
परि कर्माचे विंदान
कांही तरि असतें आन ॥ चहुंकडे ॥
कोणत्या मुहूर्तावरतीं ।
मेघांत वीज लखलखती ॥ नाचली ॥
त्या क्षणी । त्याचिया मनीं । तरंगति झणीं।
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी ॥ न कळतां ॥

तो ठसा मनावर ठसला ।
तो घाव जिव्हारीं बसला ॥ प्रीतिचा ॥
वेड पुरें लावी त्याला ।
गगनांतिल चंचल बाला ॥ त्यावरी ॥
जतिधर्म त्याचा सुटला ।
संबंध जगाशी तुटला ॥ त्यापुढें ॥
आशाहि । कोठली कांहि । राहिली नाहिं ।
सारखा जाळी । ध्यास त्यास तीन्ही काळीं ॥ एक तो ॥

मुसळधार पाउस पडला ।
तरि कधी टवटवी त्याला ॥ येइना ॥

जरि वारा करि थैमान ।
तरि हले न याचें पान ॥ एकही ॥
कैकदा कळ्याही आल्या ।
नच फुलल्या कांही केल्या ॥ परि कधी ॥
तो योग । खरा हठयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लागतें जगावें त्याला ।। हें असें ! ॥

ही त्याची स्थिती पाहुनिया ।
ती दीड वीतीची दुनिया ॥ बडबडे ॥
कुणी हंसे कुणी करि कींव।
तडफडे कुणाचा जीव ॥ त्यास्तव ॥
कुणि दयाहि त्यावरि करिती ।
स्वर्गस्थ देव मनिं हंसती ॥ त्याप्रती ॥
निंदिनी । कुणी त्याप्रती ॥ नजर चुकविती ।
भीतिही कोणी । जड जगास अवजड गोणी ॥ होइ तो ॥

इष्काचा जहरी प्याला ।
नशिबाला ज्याच्या आला ॥ हा असा ॥
टोंकाविण चालू मरणें ।
तें त्याचें होतें जगणें ॥ सारखें ॥
हृदयाला फसवुनि हंसणें ।
जीवाला न कळत जगणें ॥ वरिवरी ॥
पटत ना । जगीं जगपणा । त्याचिया मना ॥
भाव त्या टाकी । देवांतुनि दगडचि बाकी ॥ राहतो ॥

यापरी तपश्चर्या ती ।
किति झाली न तिला गणती ॥ राहिली ॥
इंद्राच्या इंद्रपदाला ।
थरकांप सारखा सुटला ॥ भीतिनें ॥
आश्चर्ये ॠषिगण दाटे ।
ध्रुवबाळा मत्सर वाटे ॥ पाहुनी ॥
तों स्वतां । तपोदेवता । काल संपतां ।
प्रकटली अंती । ''वरं ब्रूहि'' झाली वदती ॥ त्याप्रती ॥

''तप फळास आलें पाही ।
माग जें मनोगत कांही ॥ यावरी ॥
हो चिरंजीव लवलाही ।

कल्पवृक्ष दुसरा होई ॥ नंदनी ॥
प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें ॥ तरुवसा ॥''
तो वदे '' देवि सर्व-दे । हेंच एक दे -
भेटवी मजला । जीविंच्या जिवाची बाला ॥ एकदा ॥''

सांगती हिताच्या गोष्टी ।
देवांच्या तेतिस कोटी ॥ मग तया ॥
'' ही भलती आशा बा रे ॥
सोडि तूं वेड हें सारें ॥ घातकी ॥
स्पर्शासह मरणहि आणी ।
ती तुझ्या जिवाची राणी ॥ त्या क्षणी ॥
ही अशी शुद्ध राक्षसी । काय मागसी ।
माग तूं कांही । लाभलें कुणाला नाहीं ॥ जें कधी ॥''

तो हंसे जरा उपहासें ।
मग सर्वेच बदला खासें । त्यांप्रती ॥
'' निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाहि मिळतें ॥ धिक तया ॥
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढें ॥''
निग्रहे । वदुनि शब्द हे । अधिक आग्रहें ।
जीव आवरुनी । ध्यानस्थ बैसला फिरुनी ॥ वृक्ष तो ॥

तो निग्रह पाहुनि त्याचा ॥
निरुपाय सर्व देवांचा ॥ जाहला ॥
मग त्याला भेटायाला ।
गगनांतील चंचल बाला ॥ धाडिली ॥
धांवली उताविळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत ॥ त्याकडे ॥
कडकडे । त्यावरी पडे स्पर्श जों घडे ।
वृक्ष उन्मळला । दुभंगून खाली पडला ॥ त्या क्षणीं ॥

दुभंगून खालीं पडला ।
परि पडतां पडतां हंसला ॥एकदा ॥
हर्षाच्या येउनि लहरी ।
फडफडुनी पानें सारी ॥ हांसली ॥

त्या कळ्या सर्वही फुलल्या ॥
खुलल्या त्या कायम खुलल्या ॥ अजुनिही ॥
तो योग । खरा हठयोग । प्रीतीचा रोग ।
लागला ज्याला । लाभतें मरणही त्याला ॥ हें असें ॥

अनुष्टुम्
स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी
मराठी रसिकांसाठी 'गोविंदाग्रज' पाठवी ॥

- एप्रिल, १९१६.

# परमाणूंचे कार्यमाहात्म्य

गिरिशिखरें खरतांना त्यांतुनि कण वाळूचे पडतात,
महासागरोदरी तेथुनी विश्रांतीस्तव दडतात;

कालमापनास्तव जन त्यांना घटिकायंत्री भरतात,
क्षणाक्षणासह एक एक ते खालीं भरभर झरतात.

गिरिस्वरूपा उन्नतिच्या ते करिती देहाची घटना,
विस्तारास्तव शय्यारचना मग करणें लागे त्यांना;

इटति अनंतर अनंतांतही शोधायास्तव परिमाणा,
कालस्वरुप कालाचीही मोजिति घटका भरतांना;

निजकवनाचें मसिलेखन हें, पुसुनि न जावें क्षुद्र तरी,
'गोविंदाग्रज यास्तव त्यावरि वाळूचे कण हे पसरी !

- ६.४.१९१६

# कांही इंग्रजी कविता वाचून -

(स्वयंपूर्णतेची जाणीव सुद्धा साधुवृत्तीला बाधक म्हणून म्हटली आहे. मग तिच्या अभावीं केवळ नुसत्या अभिमानाकडे पाहून आपलेपणाला काय वाटत असेल बरें ? )

पिठांत पाणी घालुनि केलें दूध भलें निष्ठुर काळें,
पितात गरिबांची बाळें,

अम्हां मराठी शाहीरांच्या कवनाचा वाहे पूर,
समाधान त्यांतच चूर !

पोत घालुनी गळ्यांत फिरती भिल्लांच्या काळ्या पोरी;
कवीश्वरे चढलीं भारी !

गरिबीला बोलणें नसे हें, दोष दरिद्री गर्वाला -
हात घालि जो स्वर्गाला !

बाष्फळ बडबड ऐकुनि चित्तीं हास्याचे ध्वनि उठतात,
- आणि आंतडीं तुटतात !

खेद वाटला - तोंच आठवे बालकवीची रसवंती;
धीर जरा वाटे चित्ती.

नव्याजुन्यांचा प्रेमळ पाइक 'गोविंदाग्रज' नमन करी -
भल्याबुऱ्यांना एकसरी.

मे, १९१६.

# निर्दय बालेस

(चाल-मला शांत मुनि भासतो )

अखेर झाली आतां ॥ घे हा ॥ प्रणाम जातां जातां ॥ धृ. ॥

जिंकूनि तुजला प्रेमें होइन दास तुझा जन्माचा
या आशेवर जीव टांगला होता या दीनाचा ।।१ ॥

नजर जरासी तुझी बदलतां थोडा थोडा होई ॥
वेडा माझा जीव बुडविलां तूं शोकाच्या डोहीं ॥२॥

होतें नव्हतें त्याची केली तुझ्या ठिकाणीं पोंच ॥
जीवांच्या जाळ्यांत झेलला शब्द न पडला तोंच ॥३॥

रूप मनोहर असलें, बुद्धिहि तीव्र लाभली तुजला ॥
खऱ्या गुणाची पारख कांहीं असेल तव हृदयाला ॥४ ॥

वेडी आशा अशी धरुनिया धडा जिवाचा केला ॥
भल्याबुऱ्याचा भेद न तुजला, अनुभव भलता आला ॥५॥

केल्या ज्याच्या पायघड्या मीं तुझ्या पावलांसाठी ॥
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस नटव्या थाटापाठी ! ॥६॥

जग सगळें हें डोळयांपुरतें, रूप जिवाला पुरतें ॥
उदार हृदया परि निर्दय जग दगडाखालीं पुरतें ॥७॥

ज्या देवानें जग हें केलें, ज्या प्रेमें हें चाले, ॥
त्या देवाला, त्या प्रेमाला, जाळिन आतां, बाले ॥८ ॥

जगावांचुनी लाभतीस तरि जग मी केलें असतें ॥
तुझ्यावांचुनी जग हें आतां असून झालें नसतें ! ॥ ९ ॥

दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नांवा ॥
परतायाचे नाही आतां त्या प्रेमाच्या गांवा ॥१०॥

होइल होइल वाटत होतें तेंच अखेरिस झालें ॥
नांव घेतल्यावांचुन आता मनांत झुरणें आलें ॥११॥

(अपूर्ण)

मे, १९१६.

# शेवटचे प्रेमगीत

(चाल: मला शांत मुनि भासतो )

तुटे स्नेहसंबंध सर्वस्वि आतां । टकितां तूं असें या अनाथा ॥ धृ. ॥

सात वर्षे, सखे ! हर्षद स्वप्न जें । पाहिलें, भोगिलें तेंच आतां ।
धोरतिमिरा निशा सहज भय देतसे । जीव हा एकला आज उरतां ॥

अश्रुधारा पहा वाहती निर्भरा । चित्ता विव्हल; नसे वृत्ति शांता ।
नयनजलि नाहतां, त्यासवें वाहतां । पाहिना तुजविना जीव जगता ॥

जीवनव्याप हा व्यर्थ वाटे पहा । नयनविषयाच ही विश्वसंस्था ।
कांहि नाही पुढें, जीव तिमिरीं बुडे । स्तिमित वा बधिर वा जात अंता ॥

नाश तरि सर्वथा होउं दे एकदां । आपदा लोपवी रे कृतांता !
कष्टला जीव हा दु:खामात्रावहा । शून्यता जीविताप्रति वहातां ॥

यत्न केले सखे ! रत्न तुजसारखें । कविं तरी व्हावया प्राप्त हातां ।
अन्य घटना परी नाकळे कां करी । देव कीं दैव कीं तो विधाता ! ॥

जन्म हा व्यर्थसा होत ! होवो तसा । सर्वथा शिवपरा ईशसत्ता ।
प्रेमयज्ञाप्रति प्रथम ही आहुति । अपरिहार्याच जी जीवजाता ॥

एक आशा उरे - (तीच परि मज पुरे ) । तिजसवें जीव करि एकमयता ।
''जन्मजन्मांतरी एकदां क्षणभरी । प्रेम लाभो तुझें शोकघाता '' ॥

अनुष्टुभ्

भावोल्लेखार्थ आलेखी कष्टदें शोकनिग्रहें ।
'' गोविंदाग्रज'' हें बोले !अंतिम प्रेमगीत हें ॥

१.६.१९१६, मुंबई

# कधी ?

चित्रपटावरि रम्याकृतिच्या सीमारेषा परोपरी;
रंग कधी वटतील परी ?

कानाला आनंद देति हे झुळझुळ गाउनि गोड झरे;
अर्थ कधीं कळणार बरें ?

अंधुक अंधुक गोड भावना डोकावति कविमनाकडे;
शब्द कधीं होतील खडे ?

सतेज वचनें देई तारा, परी लकाके नभामधी;
खाली येईल परी कधी ?

झांपड पडते डोळ्यांवरती- चिंता छळिता हृदंतरी;
झोंप कधीं येईल परी ?

प्रतिरात्रीं ही स्वप्ने दाविति इच्छाचित्रें जीवाची;
सृष्टि कधीं येईल परी ?

अंधनयनिं ही बघते आशा विश्वचि हें रम्याकार;
जगीं कधी तें दिसणार ?

- आणि वल्लभे ! दिलींस वचनें; गोड अहा तीं किती तरी !
खरी कधी होणार परी !

'गोविंदाग्रज' जे जें आळवि कवनी - अणिक- मनामधी;
पटेल तें तें सांग कधी ?

- जून १९१६.

# अंधाला दृष्टिलाभ

(आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन; कधीं कधी हा उपकार असेल; नेहमींच मात्र नाही.)

अंधपणे मी पाहत होतों माझ्या प्रेमाची मूर्ति ॥
जीवनदेवी, जी हृदयानें देई दिव्याची स्फूर्ति ॥
मम अंधत्वा वाटत होती ती सौंदर्ये अप्रतिमा ॥
अमर्याद आशेच्या राज्याचीही उल्लंघी सीमा ॥
न कळे निर्दय दया कुणाला मजविषयी ही कां आली ॥
प्राणघातपर उपकाराची इच्छा कोणाला झाली? ॥
अमोघगुणदिव्यांजन दुर्लभ - हाय ! तेंहि परि सांपडलें ! ॥
विनायत्न या उभयहि नयनीं नेमकेंच कां हो पडलें ? ॥
स्पष्ट दृष्टि मज अंधाप्रति ही कशी लाभली अवकाळीं ॥
सतेज निजकिरणांनी जी मृदु जीवा जगता जाळी ॥
कृष्णवर्ण हां - प्रमाण कांहीं अवयवास या मुळि नाही ॥
कुरुप दर्शनतापद असली बाला ही पुढती राही ॥
दृष्टि लाभतां मूर्तिभंग हा - मनोभंगही जन्माचा ! ॥
शतविध हानीहूनही असला लाभचि दुःखप्रद साचा! ॥
दृष्टि लाभतां पहावयाचें असें तेंच उरलें न परी ॥
'गोविंदाग्रज' अंधत्वास्तव विलाप आतां सदा करी ॥

- २५.९.१९१६, पुणें.

# प्रेमाची प्रामाणिकता

(महाकवि बायरन् एके ठिकाणी प्रणयीजनास असा उपदेश करीत आहे की, ''प्रेमविषयापासून आपल्या प्रीतीची उत्कट व शरणागत उत्सुकता लपवून ठेवा म्हणजे तुमच्या इच्छेची पूर्तता होईल.'' प्रस्तुत लेखकाच्या एक बुद्धिमान् मित्रानेंहि त्याच्याजवळ अशाच अर्थाचें विधान केलें होतें. या दोन्ही प्रसंगी या लेखकाला जरा चमत्कारिक वाटलें होतें. )

सख्या !सांगसी बोध हिताचा चातुर्याचा तसाच हा ॥
व्यवहाराच्या परी संगती प्रीती होईना सुखावहा ॥

दळादळाची पुरी खुलावट फूल उमलतें जरी ॥
रसिक भ्रमरा तरीच वाटे गुंगावेंसें तदंतरीं ॥

मेघांआडुनि रविकिरणें जरि स्पष्ट दर्शनें नच देती ॥
फुलें खालतीं काय उमलती ? किंवा रसरंगा येती ?

मूठ झांकली लाखाची ती भरिते जरि चालू तूट ॥
दैव उद्यांचे पाहावया परि उघडावी लागे मूठ ॥

गंगास्नानें पावन व्हाया इच्छा झाली जरी मना ॥
देहावरचें वस्त्र वस्त्र तरि दूर करावें लागे ना? ॥

प्रीतीची रसगंगा बघतां जीव विकारी असे जरी ॥
शिष्ट कल्पना त्यजुनि तयाच्या होते आत्मा अधिकारी ॥

हृदयार्पण जरि करणें आहे स्पष्ट दान तरि करावया ॥
अश्रुजलासह अर्पावें या पुण्यमार्ग एकच सखया ॥

स्वप्रेमातें लपवायाचा बोध तुझा लाभो तुजला ॥
'गोविंदाग्रज' वाहिल प्रेमा हृदयासह निजअश्रुजला ॥

- १५.११.१९१६, जळगांव.

# इच्छा, उपभोग व विषय

( या तिघांचा अन्योन्यपोषक त्रिवेणीसंगम स्वर्गांत तरी असेल काय ?)

अखंड गायन ऐकायातें पंजरांत धरिला पक्षी।
उडती लकेर झरता, जीवा !नादचित्र केवळ लक्षी ॥१॥

जनसंमदी अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें ।
एकांती तच्चिंतन करणे; दु:खावेगीं विस्मरणें ॥

दिव्य दर्शनें हृदयपटावर नवरंगांनीं रेखावीं ।
आणि आंतल्या अश्रूंनी तीं सर्वेंच धुवुनी काढावीं ॥

अवश्य जीवश्वसने निर्दय नि:श्वासांनी योजावीं ।
हृदयजलानें भरतां नयनें गेली घटिका मोजावी ॥

आद्यंतीचे क्षण सोडुनिया अशेष जीवनिं या देख !
परिस्थितीचा रंग काढितां क्षणयुग्मचि उरतें एक ॥

पहिला क्षण तो कीं ज्यावरतीं स्वप्रकाश आशा धाडी ।
दुज्या क्षणावरि तीव्र निराशा छाया प्रेतमया पाडी ॥

आयुष्याचा क्षणाक्षणाचा हिशेब केवळ हा आहे !
परंपरेला त्यांच्या दिधलें नाम मनोहर जीवन हें ॥

रंग बदलुनी खेळत राही क्षणांची ही जोडी ।
स्थलकालाच्या भिन्नत्वानें नित्य नवीं दिसतीं कोडीं ॥

क्षणाक्षणाला जननमरण हें प्राणिमात्र भोगित राही ।
चौऱ्यांशीचा फेरा याविण आणिक दुसरा तो नाही ॥

फसव्या पाण्यावरी पोहुनी, दम कोंडुनि मरतां मरता।
'गोविंदाग्रज' म्हणे, 'जीविता ! लाभ तुझा नच यापरता!' ॥

- २२ नोव्हेंबर, १९१६

# तीन तरी

( जीवनाच्या काव्यांत जर, तर, पण, परंतु ही इच्छेला विरोध करणारी उभयान्वयी अव्ययें दुबळ्या मनुष्याला विश्वनियंत्या ईश्वराशीं जोडीत असतात.)

चल, सख्या जिवा रे, पुन्हां घरी। कां उगाच फिरसी पिशापरी ? ॥धृ.॥

पाय लागुनी कांच तडकली । पुन्हा जोडणें कुणी तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल. ॥१॥

कळस देवळावरला ढळला । पुन्हा बसविणें कुणी तरी,
तो कसा तरी कीं कधी तरी ॥ चल. ॥२॥

वेजीं उतरे मोतीदाणा । पुन्हा सांधणें कुणीं तरी,
तो कसा तर कीं कधीं तरी ॥ चल. ॥३॥

हार घेउनी घार पळाली । पुन्हां आणणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ।। चल. ॥४॥

लवून गेली बहार बिजली । पुन्हा पाहणें कुणी तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल. ॥५॥

लाट जळांतरि पळांत जिरली । पुन्हा चढविणे कुणीं तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ।। चल. ॥६॥

सूर विराला वाऱ्यावरतीं । पुन्हां छेडणें कुणी तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल. ॥ ७॥

पळे सपाटीवरती पाग । पुन्हां बांधणे कुणी तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल. ॥ ८॥

घडूं नये ते घडून गेले । पुहा घडविणें कुणी तरी,
तें कसें तरी कीं कधीं तरी ॥ चल. ॥९॥

'गोविंदाग्रज' बघे सदाही । या संसारी नवलपरी,
कीं तरीमागुनी तीन तरी ॥ चल. ॥१०॥

१९.४.१९१७, पुणे.

# चिन्तातूर जन्तु

''निजलें जग; कां आतां इतक्या तारा खिळल्या गगनाला ।
काय म्हणावें त्या देवाला ? —'' '' वर जाउनि म्हण जा त्याला.'' ॥१॥

'' तेज रवीचें फुकट सांडते उजाड माळावर उघड्या ।
उधळणूक ती बघवत नाही —'' ''डोळे फोडुनि घेच गड्या'' ॥२॥

''हिरवी पानें उगाच केली झाडांवर इतकीं कां ही ।
मातिंत त्यांचे काय होतसें? —'' '' मातिस मिळुनी जा पाही !'' ॥३॥

''पुराबरोबर फुकटावारी पाणी हें वाहुनि जात ।
काय करावें जीव तळमळे —'' '' उडी टाक त्या पूरांत'' ॥४॥

''ही जीवांची इतकी गरदी जगांत आहे का रास्त ।
भरत मूर्खांचीच होत ना ?'' ''एक तूंच होसी जास्त'' ॥ ५ ॥

देवा, तो विश्वसंसार राहूं द्या राहिला तरी ।
या चिन्तातुर जन्तूंना एकदां मुक्ति द्या परी ॥ ६ ॥

-९.११.१९१७, पुणे.

# फूल ना फुलाची पाकळी

शहाजहानाआधी मेली ख्यालिखुशाली ती त्याची ।
खडा तेवढा ताजमहालच भूषा जी या जगताची ॥

चुकल्या तरुणा ! वेश्याक्रीडन आज तुझें स्मरणांत नसे ।
कालिदासकृत शाकुंतल परि सरस्वतीच्या कंठि असे ॥

खुनी खड्यांनी भरले रांजण वाल्ह्याचे फुटले सारे ।
उरलें रामायण तें नटवी श्रीरामा निज आधारें ॥

गोकुळांतल्या चोराचा नच गोपींना आतां त्रास ।
श्रीकृष्णाची गीता उरली द्याया मरत्या उल्हास ॥

गडगडणें, काळोख, विजा हीं गेलीं वळवाच्या मागें!
अन्नब्रह्मची साक्ष तयाची द्याया हें राही जागें ॥

कांटे सुकले फांदीवरतीं - धन त्यांची झाली राना ।
गुलाब देवा, तुम्हा वाहिला, गोड करुनि तो कां घ्याना ॥

दूषण वगळुनि भूषणमात्रे प्रभुपूजन करि काळ असें ।
तुम्ही आम्ही कष्टी होणें हा कुठला मग न्याय असें? ॥

(अनुष्टुम्)

'गोविंदाग्रज' अर्पी ही स्वभावें चरणांवरी ।
रसिका, घ्या फूल नाहीं फुलाची पाकळी तरी ॥

- २४.११.१९१७, पुणे

# एक समस्या

असे एकदां दोघे चौघे कामाला प्रात:काळी ॥
घरांतुनी बाहेर निघालो; घाई जाण्याची सगळी ॥
तोंच धडकती समोर येऊनि वृद्धा विधवा दारांत ॥
अपशकून हा पाहुनि बसला त्रासिक चरका चित्तांत ॥
''वेळ साधिते कशी बरोबर पहा अशी पीडा नसती ॥
या विद्रुप अवदसा सारख्या असा चंहुकडे वणवणती'' ॥

चार पावलें पुढें सरकलों विसरुनि सारे झोकांत ॥
एक अडाणी कुणबट आलें कागद घेउनि हातांत ॥
अडवुनि बोले, '' वाचुनि दावा दादा कागद हा इतका'' ॥
त्रासुनि वदलो, ''बाबा, आम्हां दुसरी कामें नाहितं का?'' ॥
गिचमिड ओळी - भिकार अक्षर; लावित बसणें हें कोणी ? ।
दुसऱ्या कोणाच्या पाठीवर लाद नेउनी ही गोणी ॥
येईना वाचतां तुम्हांला तरि पत्रांचा व्यवहार ॥
कां करितां मग उगाच हा अव्यापरिपुव्यापार?'' ॥
दिलें चिटोरें त्याचें त्याच्या अंगावरती टाकून ॥
चालूं झालों गप्पा मारित कांही कांही हांसून ॥

जातां किंचित पुढें आढळे - नांव न घेणें कवनांत ॥
डोकीवरती पाटी घेउनि अगदीं शेजारुनि जात ॥
त्या घाणीनें मस्तक फिरलें -रागहि आला भरपूर ॥
बोलत कांही आम्ही झालों त्यापासुनि आधीं दूर ॥
'' इतका झाला दिवस तरी हे खुशाल अजुनी फिरतात ॥
घाण घेउनी चहूंकडे ही हवे तसे वावरतात ॥
उर्मट तर हे इतके असती - बेमुर्वत देतिल धक्का ॥
बंदोबस्तच या लोकांचा केला नाही कुणिं पक्का'' ॥

जातां जातां पुढे यापरी एक दिसे पिंपळपार ॥
दत्ताचें देवालय खाली छोटेसें शोभे फार ॥
सुंदर तरुणी हिंडत होती त्या देवाच्या भंवताली ॥
निरखुनि बघतां - हरहर ! होती विधवा ती बाला असली ॥
उचंबळुनी ये करुणारस - नेत्रहि अश्रूंनीं भिजले ।।

निर्दयता दैवाची बघुनी हृदय बिचारे तें थिजलें ॥
न्यायदेवता जागृत झाली त्या सौंदर्या बघताच ॥
विषय दयेचा लावित नाहीं कोणाच्या जीवा आंच ?
'' धिग् धर्माला - धिग् रुढीला- तेतिस कोटी देवांना -'' ॥
किती बोललों - नको सांगणें ! पाठ असे तें सर्वांना ॥
काम कशाचें ! धाम कशाचें ! एक प्रश्न मग हृदयांत ॥
''सुधारणा होणार तरि कधिं या दुर्दैवी देशांत ?''

अनुष्टम्

प्रश्नाच्या उत्तरासाठी रसिका जोडुनी करा.
'गोविंदाग्रज' प्रार्थी - 'कीं समस्या पूर्ण ही करा' ॥
- ११. १२.१९१७, पुणे.

# दैवाची निर्दयता

श्रीहरि मथुरानगरीं गेले, गोकुळ मागें तळमळतें ।
प्राणिमात्र नच केवळ, परि तें यमुनेचें जळही जळतें ॥

कळे सकळ हें श्रीगोपाळा कळवळुनी मनि आणि दया ।
धाडुनि दिधला व्रजांत उद्धव प्रियजनसांत्वन करावया ॥

सत्वर हरिचा निरोप घेउनि उद्धव भेटे सकळांते ।
वृत्तश्रवणा क्षणांत जमलें गोकुळ सारे त्याभवतें ॥

हें नंदाला, यशोदेस हें, कोणाला कांही कांही ।
निरोप सांगे सांत्वनपर तो; सुनें कुणी उरलें नाही ॥

या गोपीला, त्या गोपीला, गोड शब्द दे वांटुनिया ।
राधेला तर बहाल केली हरिनें जीवाची दुनिया ॥

प्रेमकथांच्या संस्मरणानें जल सर्वांच्या ये नयनां ।
व्याकुळ विव्हळ झाली राधा, सांवरितां हो पुरे जनां ॥

सुखदु:खांच्या मिश्र सागरीं निमग्न गोकुळ सर्व असे ।
परि दुर्दैवी एक जीव तो त्या काळीं त्या स्थळी नसे ॥

अष्टवक्रा, काळी, कुबडी, कुब्जा तेथे नच दिसली ।
दीन बिचारी एकटीच ती कुठें तरी जाऊनि बसली ॥

स्मरण कशाचे तिचें कुणाला जी बघवेना डोळ्यांनीं ।
गजबजतां जग आनंदाने दुर्दैवी पळती रानीं ॥

तोंड झांकुनी, ओंठ दाबुनी, रडे आंतल्या आंत मनी ।
पुसुनी टाकी झणि पदरानें अश्रू आले जरि नयनीं ॥

'' प्रेमळ देवा, जिवलग देवा, माझ्यी जीवाच्या देवा, ॥
कसे विसरलां दासीला? देवा हो, एकच देवा ! ॥

कशी विचारुं उद्धवजींना क्षेम तुझें या लोकांत ? ।
म्हणेल कोणी काय मला हें त्या न कळे भर आनंदांत? ॥

सुंदर गोपी योग्य रडाया जगन्मोहना तुजसाठी ।
परी कुठे मी ? अणि कुठें तूं ? लोकसुंदरा जगजेठी ॥

रडायासही मुक्तकंठ हा देवा रे जीवचि लाजे ।
श्रीहरिसाठी कुब्जा रडते हेंच हंसे होईल माझें !'' ॥

अनुष्टुभ्

घडेना कार्य या लोकीं भाग्यावांचूनि कोणतें ।
हंसायातेंच न परी रडायाताह लागतें ॥

असावें लागतें भाग्य हंसायातें न काय तें ।
रडायातेंही जीवाचें या लोकीं भाग्य लागतें ॥

- २.१.१९१८, मुंबई .

# फणसाचे पान

साकी

सहजचि दिसलें पायाखालीं मज फणसाचें पान ॥
सवेंच कवनाचें हृदयींच्या चढत चाललें मान ॥

फणसाच्या त्या पानावरतीं दिसल्या ज्या मज रेषा ॥
कधींकाळच्या उघडुनि दाविती मनिंच्या आंतरवेषा ॥

लिहुनि ठेविली पूर्ववयामधिं कथागोड जी पानीं ॥
पुन्हां वाचिली; - आणि जाहला सखेद हर्षहि रमणि !

दोनच नयनीं नीट दिसेना; अंधुक जग हें अवघें ॥
प्रीतीच्या उपनेत्रांवांचुनि - पुढे बोलणें नलगे ॥

डोळे झांकुनि भरभर फिरुनी कथा वाचिली मग ती ॥
हतभागी हे जीव जगीं या स्मरणे केवळ जगती ॥

गांव कुणाचें ? नांव कुणाचें ? आणि कुणाचें पान ?॥
सरोवराला परका मधुकर करित रसाचें पान ॥

वाऱ्यासरशीं अंगावरती येउनि पडतीं पानें ॥
नेमधर्म त्या कसला? अथवा नेम देव तो जाणे ॥

सुंदर चित्रा ! मदपूर्णा ती तथा तुझी आठवते ॥
बाले ! रमणी ! प्रणयभरानें हृदय किती खळबळतें ॥

सळसळती हीं आजहि सखये, भंवती हिरवीं रानें ॥
'गोविंदाग्रज' परी शोधितो तीं फणशीचीं पानें ॥

- १०.२.१९१८, बोरिवली

# जुंन्या कवितांची आठवण

साऱ्या त्या कविता तशाच असती; ते अर्थही त्यापरी ।
शाळाही अजुनी नवीच दिसते त्या रम्य जागेवरी ॥
**! वाहतसे भरुनि दुथडी 'उल्हास[१]' तेव्हां जशी ।
गेला वाहुनि काळ तो, सकळ ती सौख्येंहि त्यांची तशी ॥१॥

---

१. ही नदी बोरघाटांत खंडाळ्याच्या तळ्यांत उगम पावून कर्जत नेरळहून वाहत जाऊन कल्याणच्या खाडीस मिळते.

आनंदे भरलें असें जग तसें आतांहि**!पहा ।
**ही असतील त्यापरि किती लोकांत रम्य अहा ॥
प्रेमाची नवजीवनेंहि दिसती स्वच्छंद चोहींकडे ।
ज्याचें त्यास नसे तरे जगभरी शून्यत्व ये रोकडे ॥२॥

बाले, दृष्टि मनोहरा मजवरी तू टांकिली ज्या क्षणी ।
गेला तो क्षण सांग सांप्रत कुठे ? हे शक्य राही मनीं ॥
काळाच्या उदरांत खोल दडला जाऊनि कोठे तरी ।
**! शोकच शेष आज उरला प्रेमांतुनी अंतरी ॥३॥

विद्यादानि नसे विशेष गति या बाल्यांत आम्हां तशी ।
प्रेमाच्या पहिला धडा गिरविला निर्दोषशा मानसी ॥
**! ती वचने मरुन पडली ; पद्यांत त्यां पाठवी ।
''गोविंदाग्रज'' आज विव्हल मनें, **! तुला आठवी ॥४ ॥

- १३.२.१९१८, बोरिवली,

## माझा मृत्युलेख

यावज्जीवहि ‘काय मी’ न कळलें आप्तांप्रती नीटसें ।
मित्रांतेंहि कळे न गूढ - न कळे माझें मलाही तसें ॥
अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसे ॥
कोठें आणि कधी तरी जगतिं मी होऊन गेलों असें ॥१ ॥

- १.४.१९१८.

# गोफ

(घटनेपेक्षां विघटना सुकर असते, हा व्यवहारी जगाचा सिद्धान्त आहे. हृदयाच्या ब्रह्मांडांतहि ज्यांना हेंच सत्य पटलें आहे, तें भाग्यशाली ! )

पदर आणिले तुझे कांहिं तूं, माझे आणि मीहि तसा ॥
हांसत खेळत गोफ गुंफिला, कळलें नाही कवीं कसा ।।१ ॥

एकामेकांभंवती फिरतां, गिरकी जीवांना आली ॥
चढत चालला खेल जसा तो, नजरहि धुंद तशा झाली ॥२ ॥

कुणीं निंदिले, कुणी वंदिले, कुणि हंसले, रडलेंहि कुणी ॥
नाहि पाहिलें आम्ही तिकडे, विश्व बुडालें प्रेमगुणी ॥३ ॥

परि दैवाचा खेळ निराळा - खेळ नकोसा तुज झाला ॥
ज्या खेळानें जीव रंगला, त्याचा कंटाळा आला ॥४॥

गोफ गुंफिला उलगडण्याचा कठिण काळ येउनि थडके ॥
हाय, वदावें काय ? जिवलगे, ऊर तेवढा हा धडके ॥५ ॥

हळूहळू ओढणें हळु जरा ओढायाची कां घाई ? ॥
भलता धागा ओढितांच तूं, जीव जिवलगे, हा जाई ॥ ६ ॥

थांब, उलगडूं गोफ कठिण हा शांत बुद्धिनें सखे असा ॥
कीं न तुटावा पदर एकही, धागा धागा नीट तसा ॥७॥

ना तरि होईल हानि आपुली आणि जगाचें हंसें तसें ॥
एक्या ठायीं आलों कां वद दूर व्हावया सखे असें ? ॥८ ॥

कठिण असे, तरि उलगडणें हा गोफ असे आतां भाग ॥
ना तरि त्याचा पीळ राहुनी छळील तो जागोजाग ॥९ ॥

मनापासुनी जें केलें, जें मान्य जीवांनाही झाले ॥
विमनस्कपणें परी आज तें निस्तरणें नशिबीं आलें ॥१० ॥

कठिण जोडणें, परी तोडणें सुकर वाटतें जनांप्रती ॥
उलटा अनुभव आला आम्हां. गुंग जाहली इथें मति ॥ ११ ॥

अनुष्टुभ्

खेळतां गुंफिला गोफ, जीव त्यालागिं वाहिला ॥
'गोविंदाग्रज' सांगेना कीं त्याचा पीळ राहिला ॥

# एक शंका

नाही राहत वास-लेश कुसुमीं कोमेजतां तें त्वरे,
होतें पात्रहि कोरडेंच घडिचा तो पूर जों ओसरे,
कां प्रेमस्मृति राहते हृदय हे दु:खे दुभंगे तरी ?
आशा वावरते उगाच मग कां ही माझिया अंतरी ?

# हूरहूर

काळोखामधुनी पल्याड न दिसे या रात्रींचा शेवट,
आणि मोहकता तिला तरि कसा दुष्प्राप्य तारागण?
अज्ञेयांतुनि आरपार न दिसे दिक्काल यांचा तट,
चित्ताच्या नयनीं दुरुन खुपती कां दिव्य आशाकण?
मी श्वासास धनी, अखंड फिरतो वारा भरारा जरी,
आधीं बारिक वाडगें तरि तया हीं कुंपणें घातली !
या वाऱ्यावर बांधणार कवि मी उंची मनोरे परी?
केव्हां नांगरणार ताल उघडी ही माळरानांतली ?
जें दृष्टीस दिसे न, तेंच पटुनी वाटेल चित्ता कधी ?
बुद्धीला जिरवीन भावजलिं का? - आशा न मातें दुजी
तेजाला हुडकीन कां लपलिया या अंधकारामधी?
केव्हां मस्तक लोपुनी हृदयि या होईल उंची खुजी ?
माझें होइल सर्व हें कधिं, मला जें आजला पारखें?
माझें चित्रच नाचवीन नयनीं माझ्या कधीं सारखे ?

# स्मरणसृष्टि

प्रेमाचे ते जीव ॥ दयाळा ॥ आज कुठें दाखीव ॥
काय न ये तुज कींव ॥ धृ. ॥

प्रेमरसाचे हृदयभूवरीं वाहत होते पाट ॥
पाट कोरडे आज; खडकाची चिखलाचे घनदाट ॥ १ ॥

प्रेमनदासह आज बाळपण वाहुनि गेलें दूर ।
जें सुखकारक तेंच दु:ख दे; स्मरण लावि हूरहूर ॥२॥

अश्रु वाहती, दु:खस्मृतिचें मूर्तरुप हें जाण ॥
शोधुनि बघतां त्यांत जीव ते, नलगे ठावठिकाण ॥३॥

नवतेचा बाहेर आड हा ! स्मृतिची हृदयिं विहीर ।
दीन मनानें कुठें लपावें? प्रभो, तुटे रे धीर ॥४॥

दु:खद जीवन आज कंठितो; पुढेंहि दिसतें तेंच ॥
अमृतसुखाचा बालकाल तो; प्रभु,ने मज मागेंच ॥५॥

प्रेमनदाचीं पात्रें हृदयी वाळुनि झालीं कोळ ॥
नातरि त्यांतचि जाउनि मरतों करुनि जिवाचा घोळ ॥६॥

तारुण्याचें सौख्य निराळें असेल बहु तें गोड ॥
बाळसुखाच्या स्मृतिचीही तरि अधिक जिवाला ओढ ॥७॥

या सौख्यातें सेवित असतां सेवनींहि ये वीट ॥
त्या सौख्याची दु:खस्मृति वरि; दगडाहुनि मउ वीट ॥८ ॥

हृदयस्मशानिं मृत लीलांना जाळुनि केल्या खाक ॥
दीप स्मृतिचा जळक्या जागी दावित आतां राख ॥ ९ ॥

प्रसंग नाना, सुगंधि सुमनें शिशुतालतिकेचीं ॥
दाव मनाचा फत्तर त्यांवर सुख हें अत्तरची ॥१०॥

फार सुंगधी अल्पजीवि तरि क्षणांत उडुनी जात ॥
स्मृतिरुपानें दिगंत पसरे मिसळुनि या पवनांत ॥११॥

मायेची ही जादू जमवी त्या चंचल पवनास ॥
स्मरणसृष्टि ही दिसे एकमय चित्ताच्या नयनास ॥१२ ॥

अहा! तेच हे जीव लाडके !जमुनी त्यांचा मेळ ।
अवकाशाच्या रंगावरि करि बाळपणाचा खेळ ॥१३ ॥

स्मरणसृष्टिचा असा पसारा अद्‌भुत देवा फार ॥
जडसृष्टीचें जाळुनि गाळुनि काढियलें जणुं सार ॥१४ ॥

अवकाशाचें राज्य तयांना; इच्छेचा अवतार ॥
जीव विदेही, खूण पटवि तरि वायूचा आकार ॥१५॥

भूतकाळच्या रेषा गिरविति; एकच काळ तयांस ॥
एकच; तोही सान्त काळ; स्मृति अडवी त्याचे तास ॥१६॥

उडविति घडलें जें जें, जोंवरि जीवाची हो सुटका
भविष्यकाळा वाव न; त्याचा कडा दिसतसे तुटका ॥१७॥

जडसृष्टिचीं चित्रें वठली का ही आकाशांत ॥
कीं वायूवर ठसा उमटवी घडलेला वृत्तान्त ॥१८॥

अथवा प्रसंग ते नयनांनी गिळिले जे घडतांच ॥
निजकिरणांनी तेच उगळिले बसतां हृदया आंच ॥१९॥

भिन्न कालिंचे, भिन्न स्थलिंचे जीव दिसति हे सांग ॥
ओळख त्यांची परस्परांना पटते का रे सांग ॥२०॥

अनुभविति का गतलीलांतें फिरुनी तेच हे जीव ॥
अवताराची अपुल्या त्यांना आहे का जाणीव? ॥२१॥

स्मरणसृष्टिला पटे खूण जरि तरि मजही दीनास ॥
स्मृतिरुपानें तींत रमूं दे; विरुनि टाकि देहास ॥२२ ॥

माझी सृष्टिच जातां झालों जिवंतपणिं मी भूत ॥
बांधितसे मज येथें नसत्या आशेचें हे सूत ॥२३ ॥

तोडूनि त्यातें, ने मज देवा, त्या माझ्या मित्रांत ॥
नको जाळुं हा देह यावरी जगताच्या सत्रांत ॥ २४ ॥

# एकच मागणे !

आहे जो विधिलेख भालिं लिहिला कोणास तो नाकळे ॥
आहे जो सुखदु:खभोग नशिबीं, कोणास तो ना टळे ॥
आहे जीवित हा हिशेब सगळा - हा बोध चित्तीं ठसे ।
देणें हें गतकालिचे सकळही सव्याज देणें असे ॥१ ॥

आशा मावळल्या; समूळ तुटले हृद्बंध नानापरी ।
इच्छा केवळ दु:खदा, अनुभवें हें बाणलें अंतरी ॥
आतां एकच मागणें तव पदी, देवा, असे एवढें ।
संसारी मिळता न तें, मन सदा शोकाग्नितापें कढे ॥२ ॥

आतां दु:ख नको, नकोच सुखही, होणार होवो सुखें ।
इच्छा वावरती मनांत, तरि हीं केली मुकी तन्मुखे ॥
''जें कांही घडते सदैव तुझिया इच्छाबळें तें घडे''
ऐसें जाणुनि सोसण्यास मज ते सद्धैर्य दे तेवढे ॥३॥

# सुखदु:ख

''सुखदु:खांच्या द्वैतामधुनी दु:ख सदा वगळावें;
सुख सेवावें.'' हीच वासना सामान्यांची धांवे, १

एक पायरी चढतां वरतीं मानवता मग बोले,
''सुखदु:खांची समता आहे; एकानें नच जग चाले,'' २

सदा भरारी गगनीं ज्यांची ऐसे कविवरही वदती,
''संसाराच्या गाड्याची ही दोन्ही चाकें जणुं असती ।'' ३

परि सुखदु:खां पुढे टाकुनी वदतां ''घे जें रुचे तुला,''
अचुक सुखाला उचली मानव; दु:खा त्याची न ये तुला. ४

यापरि जगतीं सुखदु:खांचें खरे मर्म ना कळे कुणा,
रुचे मला तर दु:ख सुखाहुनि: वेडा वाटे तरी म्हणा ! ५

सुख निजभोगी नरा गुंगवी विसर पाडितें इतरांचा,
दु:ख बिलगतें थेट जिवाला; ध्वज फडकवितें समतेचा. ६

सुख उद्दाम करी आत्म्याला ओळख ज्याची त्या नसते,
कोण कुणाला पुसते जागिं या दु:ख जरि मुळीं ना वसतें ! ७

गर्भवासगत अंधपणानें दिशाभूल होवोनी,
परक्या ठायीं आत्मा आला स्वस्थानातें त्यजुनी. ८

परमात्म्यापर्यंत तयाला पुन्हा असे जें जाणें,
नांव तयाला दिलें गोडसें की 'जीवाचें जगणे.' ९

परि 'जगणें' ही मुदत ठरविली मूळपदा जायाची
सदा चालतां आत्मा तरिही मजल न संपायाची . १०

इष्ट पदा ने दु:खभोग हा प्रवास आहे आत्म्याचा
विश्रांतीचा मुकाम अगतिक काळ जात जो सौख्याचा ११

दु:ख असे कर्तव्य; तयाची जाणिव पटते जीवाला,
इंद्रियांस वरच्यावर शिवुनी सौख्य जातसे विलयाला. १२

मजल मारणें इष्ट जयाला ठरलेल्या मुदतीमाजीं
प्रवास दु:खांचा भोगाया त्यानें व्हावें राजी. १३

# अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस

(मध्यरात्रींच्या सुमाराला कोकिळेचा शब्द, विषण्ण निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो, याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाही.)

अवेळ तरिही बोल, कोकिळे अवेळ तरिही बोल !

रात्र पसरली जगतावरती,
भुरके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भंवती,
बालचंद्रचंद्रिका घाबरी गोरीमोरी होत.

उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे जरि वरुनी हंसरी -
खिन्नताच जरि अंतरि सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !

आनंदाच्या प्रात:काळीं,
दिवसाच्या गजबजल्या वेळीं,
किंवा संध्या जेव्हां नटली,
आनंदाचीं गाणीं गाया गवई लाखकरोड !

असतां आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया,
लागे ज्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !

परंतु जेथें उदासीनता
व्याकुळ करिते विषण्ण चित्ता,
तेथें त्याला द्याया समता -
गाणें गावें, हेंच अलौकिक ईश्वरतेचें काम !

बाह्य सृष्टि जरि निद्रा भोगी,
अंत:सृष्टि तरी हतभागी;
उडते तशीच राहुनि जागी,
निजवाया तिजलागीं असलें गाणें गाई गोड !

अवेळ येथें कसली बाई ?
दु:खसांत्वना गा केव्हांहि !

अनुकंपेला नियम न कांही !
रित्या मनीं या ओत सूर; त्यां जाऊं दे अति खोल !

वळवाचा हा वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षांतुनि अनिवार;
येतां जातां सूर काढितो भलभलते भेसुर !

खिन्न चांदणें ढगांआडचें
मग्न मनोरथ झाले ज्याचे -
हंसें जणूं तें अशा मनाचें,
पुष्पवतीच्या तोंडावरची छाया काय उदास !

या अवकाळी - या एकान्तीं,
निद्रेची मिळवाया शांति,
थकुनी भागुनि पडलों अंती,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाहीं ज्यास

हातीं संसाराची माती,
मनिंच्या आशा मनींच खाती,
भूतकाळचीं भुतें रडती !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !

निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भंवती,
विषण्ण येती विचार चित्तीं,
बाह्यांतर विश्वात खेळते उदासीनता एक !

गा तर चित्ता मम रमवाया;
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणें वायां.
मशाल दिवसां लावुनि होतो लाभ कुणाला काय !

दूर कराया उदासीनता
गाच गडे !अंगाई गीता,
झोंप येउं दे माझ्या चित्ता,
लक्ष लागतें सुरांकडे तव; वाटति ते बिनमोल !

पाहुनि ही तव दयाशीलता

द्रवेल कोणी भगिनी माता,
शांत कराया हताश चित्ता -
रुक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !

त्या अश्रूच्या शीतलतेनें
भोंवतालची आग जाळणें,
निद्रा घेतां शांत मनानें
'गोविंदाग्रज' ऐकत राहिल गुंगीतहि हे बोल !

कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

# क्षण एकान्त

शांत शांत अतिं बाह्यसृष्टि जरि चोंहिकडे शांत,
हृदयिं करी थैमान सारखा भयाण एकान्त.

क्षणामागुनी क्षण जाउनियां संतत वय वाढे;
देहहि वाढे त्यासहि परि नच हृदय तसे निधडें.

क्रमाक्रमाने नैराश्याचे कडे तयावरती.
कोसळले किति, तरि, कोमलता होईना कमती.

एकामागुनि एक सारखे होउनि आघात
घाव तयांचे अजुनी ताजे तसेच हृदयांत.

महती आशा, तीव्र निराशा, द्वंद्व हृदयिं करिती;
एकीमधुनी दुसरी निपजे, खळ नाहीं कशि ती.

त्या दोघींचें हृदयभूमिवर समर सदा चाले;
काळ लागला जो त्या समरा जीवन तें झालें.

कडा कडा पडतांना तुटुनी आघातासरसें
हृदयाचें या झाले जाळें राम न त्यांत असे.

तुटतां तुटतां जाळें झालें; भिन्न भिन्न तारा;
तशांतुनीही जोडी त्यांना नशिबाचा तारा.

पुढें निराशा तोडित जाई हृदयाचें सूत;
निर्जिव तरि त्या बांधित भागुनि आशेचें भूत.

तुटता तुटतां असें आजवर तुटे न कां पार?
अशा घोंगडीवर हृदयाला कसला आधार ?

नव्या दमाची कोमलताही तशीच का राही ?
नैराश्याच्या दगडासम ती कठिण कां न होई ?

अजुनी पडतां नवा निराशातट हृदयावरती
पहिल्याइतके खोल धाव हे कां त्यावर बसती?

जरा कुठेसें कोमलतेहुनि हृदय होइ दूर.
तोंच कशाला प्रेमाची ही लागे हुरहूर ?

दु:खामागुनि दु:ख भोगुनी मन फत्तर बनतां,
कधींच मेलें प्रेम; पुन्हा तें निपजे कां आतां?

सहवासानें अभ्यासानें तीव्र निराशेच्या,
विसरत होतें हृदय भावना सौख्यकल्पनेच्या.

हृदयशारदे !तशांत टाकिसि उडी कशाला गे ?
भविष्यचिंतनिं मृत आशांची मना कशा लागे ?

न कळतांच मज कसें हृदयिं तूं बसविलेंस ठाणें ?
वश न कुणा जें मन तें वश तुज कसें कोण जाणे ?

पडक्या भिंताडावर हृदयीं कळस उंच असला;
कसें करावें? हृदयशारदे ! बसू नये बसला !

ढळला, चळला, तुटला, फुटला, कीं पडला झडला;
सहन करावा कसा पात तो? जीव इथें अडला.

चढती, पडती; पुरे, सुखाचा पुरे पाठलाग;
नको दिवस तो रात्र धांवते ज्या मागोमाग.

तुझी उपजती आशा मनिंची मनींच चिरडावी?
कीं विसरुनि अनुभवा, एकदां पुन्हां धांव घ्यावी?

निराशेंतुनी प्रवास इतका पडला जो पार;
परतावें कां त्यांतुनि फिरुनी बिकट जरी फार?

पूर्वसंचिता ! वद कायमचा का तो सरणार ?
किंवा नशिबीं पहिल्यापासुनि पुन्हांहि येणार ?

सहज जोडिला मित्र तोडितां कष्ट होति फार;
एक तोडिला सखा जिवाचा एक जीवा ठार.

प्रेमाची एकदां पुरी जी झाली मनिं होळी,
विसरावी ती किंवा घ्यावी कायमची झोळी ?

भवाब्धिमधुनी कशीबशी जी निघते वर मान
पुरती काढावी ती धरुनी असेंच अवसान ?

किंवा तळिंच्या रत्नांसाठीं द्विगुणित उत्साहें
पुन्हां बुडी मारावी खाली? शंका मनिं आहे.

सरतां प्रवास नैराश्याच्या भलाबुरा झाला;
म्हणविल का तो भावि कालचा परी बरा त्याला?

अशा भावना जीवांभंवती घालिताच वेढा;
कोण त्यांतुनी काढिल होतां ज्याचा तो वेडा?

आधीं आशा तुटतां सुटलें बंधन जगताचें;
उदास हृदया वेड लागलें चढत्या कवितेचें,

शब्दशारदा परि तुज लाजुनि आज दूर झाली.
हृदयशारदे ! तुझ्या निशाणा प्रेम घाव घाली.

अशा विचारें तुझी मूर्तिही परि होतां दूर,
खराखुरा एकान्त करी हा हृदयाचा चूर

कशा भोंवती तरि गुंगाचें हा हृदयाचा धर्म;
कविता गेली, तूंही जासी, ओढवलें कर्म !

पूर्वी जग अंतरतां हृदयीं कांहि तरी होतें;
परि या कालीं तूं त्यजितां मग काय तिथें उरतें?

अनुभवितो हा, हृदयशारदे खराच एकान्त;
भीत भीत आत्माहि बावरे भयाण हृदयांत.

स्थापन करि तव मूर्ति पुन्हा ही हृदयमंदिरांत;
तुजवांचुनि एकटा फिरावा जीव कसा त्यांत.

एकान्ताचें हृदयिं माजलें, सखि ! जें थैमान,
जीव बिचारा जाइ न त्यामधिं; शून्य हृदय जाण

आण दया मनिं हृदयशारदे, चल ये हृदयांत;
शंका विवेक दूर, मरुं दे; दे मजला हात.

चल धांवुनि ये; नको असा हा भयाण एकान्त;
'गोविंदाग्रज' वेडा तुजविण; करी तया शांत !

# प्रेमाखातर

(प्रेमनिराशेमुळे हेतुशून्य व हताश झालेल्या मनुष्याला पुन्हा प्रेमाचा आधार सापडला म्हणजे नवा जीव लाभतो. असा एक प्रणयी पुरुष पावसाळ्यात आपल्या प्रेमळ संजीवनीला भेटावयास निघाला असता त्याच्या मित्राने त्याला न जाण्याचा उपदेश केला आहे, व त्या उपदेशाला त्या प्रणयी पुरुषाचें हें उत्तर आहे, अशी या गाण्याची कल्पना आहे.)

प्रणयदर्शना जातां मित्रा, न करी उपहासा,
नको थांबवू मजला, मानुनि खोल हृदयहासा.

कसले डोंगर ? नद्या कशाच्या? हीं विघ्नें कसली?
प्रेमपथावर सारखीच हीं जरि असलीं नसलीं.

हृदयदेवतादर्शनि आता ओढ जिवा लागे;
चला थांबवा त्याला, पाहूं फिरतो का मागें.

मार्गी डोंगर नद्या पाहुनी घे पळता पाय;
असें निरर्थक निर्जिव माझें प्रेम असे काय ?

नव्या दमाचा, नव्या जयाचा, ज्याचा अवतार,
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ?

हटतिल डोंगर, तटतिल सरिता ना आपोआप,
झटतिल मेघहि साह्य कराया धरुनि इंद्रचाप !

गिरिशिखरांची पडेल खालीं मोडुनिया मान;
प्रेमापुढती सांग कुणाचा टिकतो अभिमान ?

नव्या दमाचा, नव्या जमाचा, त्याचा अवतार
पाहुनि करितिल नद्याच त्याला स्वयें पैलपार.

जो निजहृदया फाडित चपलाप्रिया खेळवाया,
वृष्टि कशी ती मेघ करिल, वद, मला थांबवाया ?

तोच आपुल्या पंखांवरि मज वाहुनि नेईल;
निदान मार्गी मला विजेचा दिवा दाखवील.

प्रेमें बोले, प्रेमें डोले, प्रेमें जग हाले;
प्रेमाखातर जगीं आजवर काय नाहिं झाले?

गिरितट फोडुनि नद्या कशाला धांवतात ? सांग.
लता तरुविण सांग कुणाचे फेडितात पांग ?

संध्याहृदयीं रमावयाला सूर्य धांवतो ना ?
नातर गगनाच्या पडद्यावर भटकवेल कोणा?

प्रेमासाठी, रामापाठी सीता वनवासी;
वृंदेस्तव हरि स्मशानांतला वृंदावनवासी.

रघुवीरांनी जलनिधिवरती पर्वत नाचविले;
सांग कोणतें संकट दुसरें त्यावरि ओढवले ?

गोपिजनांच्या करुणरवाच्या ऐकुनिया ताना,
कसा नखावरि गोवर्धन धरि गोकुळिंचा कान्हा ?

पुराणांतल्या कथा कशाला? पहा आजकाल !
नाचतसेना इवें तसें जग प्रेमें बेताल?

कां ब्राह्मणपदपादशहाला राणी मस्तानी ?
कां धर्मावर लाथ मारिली पंडितरायांनी ?

ब्रिजभाषेचा प्रेमवाल्मिकी प्रेतावर तरला;
सांग तयाला प्रेमावांचुनि कोणीं हात दिला?

नजर गुंतली तुझी तरी कां तिकडे त्या नयनी ?
तसाच इकडे या नयनास्तव मी बसलों ध्यानी.

सतीदेवता पतिसह गेल्या रचुनि अग्निशय्या;
प्रेमावांचुनि धीर कवण दे दुसरा लढवय्या ?

तलवारींच्या धारेवरतीं जीवांचा नाच,
रणशूरांशी कां केला? जा विचार त्यांनाच,

प्रेमाचा हा प्रभाव असला अखंड बा चाले;
तशांत हें तर निराशेंतुनी प्रेम जन्मलेलें !

नव्या दमाचा, नव्या जमाचा, ज्याचा अवतार,
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ?

# पुनर्जात प्रेमास

प्रेमा ! उठ - चल उघड, झाकली मूठ !

तुंबळ सागर तव खळबळला,
हृदयीं तटवूं त्यास कशाला ?
जगभर लाटा उधळायाला
दिली तुज सूट - चल उघड, झाकली मूठ !

कोंडुनि असला सागर धरिला,
माझा मूर्खपणा मज कळला,
मिळता स्थल तुज नाचायाला
करीं रे लूट - चल उघड, झाकली मूठ !

क्षणभर वाटत होतें मजला,
कीं तव ओघ आटुनी गेला,
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट ? - चल उघड, झांकली मूठ !

उगवे सूर्य काल मावळतां,
फिरुनी फुलतें फूलहि मिटतां,
प्राणजीवना, तुजही शिवतां,
मरण हें झूट - चल उघड, झाकली मूठ !

द्वेषावरतीं, दुःखावरतीं,
फिरवी तुझ्या यशाची महती,
जा, जा, नाच सर्वहि जगतीं,
धांव बेछूट - चल उघड, झाकली मूठ !

विसरुनि जाऊं अनुभवजाला,
तुडवूं पायीं चल खेदाला !
टाकूं जाळुनि नैराश्याला !
दुःख सब् झूट । - चल उघड, झाकली मूठ !

तुझिया श्वासाच्या उद्गारें
टाकूं भरुनी जग हें सारें,
एकच नादें करुं आतां रे,
सुखाची लूट-चल उघड, झाकली मूठ ।

मी तूं दूर न राहूं आतां,
दाखवुं शक्ती अपुली जगता,
आणूं परमेश्वरही हातां,

ऊठ रे ऊठ - चल उघड, झाकली मूठ !

## प्रेमाचा प्रलयकाळ

(बुद्ध, तुकाराम, ख्रिस्त, नानक यांच्या मनाचें गाणें असेंच असावे.)
चला चला रे चला चला ॥ विसरुनि विश्वा चला चला ॥ धु. ॥

पूर लोटला प्रेमाचा ॥ प्रलयकाळ हा विश्वाचा ॥
लोट सारखा उचंबळे ॥ आतां कसला ओघ खळे ॥
स्वार्थाचे तट हे फुटले ॥ चहूंकडे पाणी सुटलें ॥
फुटकी होडी ॥ टाका उपडी ॥
सोडुनि साऱ्या मोहाला ॥ चला मिळूं या ओघाला ॥१॥

अलोट प्रेमाचा पूर ॥ धरणें करि सारीं चूर ॥
विश्व बुडालें पाण्यांत ॥ या प्रळयाच्या लाटांत ॥
अथांग पाण्याचा अंत ॥ जाणि एक तो भगवंत ॥
पाणी इकडे ॥ पाणी तिकडे ॥
पाणी पाणी चहूंकडे ॥ आतां लपवतां कुणीकडे ॥२॥

खडक बुडाले गर्वाचे । विरले डोंगर रागाचे ॥
खंदक जिरले द्वेषाचे ॥ कडे मोडले त्वेषाचे ॥
जीव कोंडला आशेचा ॥ श्वासचि बंद निराशेचा ॥
प्रेमजलाचा ॥ हृदयरसाचा ॥
सागर करि तांडव नाच ॥ प्रलयकाळ तो बा हाच? ॥३॥

दिशा दहाही खळबळल्या ॥ सीमा त्यांच्या विरघळल्या ॥
त्रिवेणिसंगम काळांचा ॥ मागेंपुढें न व्हायाचा ॥
रजनीचा पडदा धुतला ॥ दिवसाशीं तन्मय झाला ॥
पांचहि भूतें ॥ पंचत्वातें - ॥
गेली; गिळिलीं प्रेमजळें ॥ त्रिगुणांचा रंगहि निवळे ॥४॥

पाण्याच्या चढत्या लाटा ॥ उचंबळति बारा वाटा ॥
पृथ्वीसूर्य ग्रहगण तारे ॥ बुडबुडेच त्यांवर सारे ॥
प्रकाश वरचा फेस असे ॥ तिमिर नीलिमा आंत नसे ! ॥
एकाकारें ॥ विरलें सारें ॥
पहा पहा रे पहा पहा ॥ प्रळयाची ही मौज अहा ! ॥५॥

पाहणार परि कोण उरे ॥ जेथें सर्वचि विश्व मुरे
हृदयांचें पिंपळपान ॥ आत्मा माझा भगवान ॥
बाळरुप निजलें शांत ॥ उठविल त्याला कल्पांत ॥

चला तोंवरि ॥ आपण सारीं ॥
प्रेमाच्या या प्रळयांत ॥ उडी घालुं या निमिषांत ॥ ६ ॥

जन्म इथें मरणा जाई ॥ जन्म इथुनि मरणा नाहीं ॥
सर्वांवर फिरतां पाणी ॥ कोणास्तव रडणें कोणी ? ॥
हृदयसागराच्या लहरी ॥ पोहत आत्मा तयांवरी ॥
विश्व बहिरलें ॥ विश्व महिरलें ॥
प्रेमजलाचा भडिमार ॥ करि जीवा गारीगार ॥ ७ ॥

चिरविश्वाचा अवतार ॥ या पाण्यामधील गार ॥
विरुनि जाऊ द्या एकसरें ॥ जिरुनि जाऊ द्या प्रेमभरें ॥
'समा' होऊ द्या भरतीची ॥ एकसारखी चढतीची ॥
अखंड राही ॥ अखंड वाही ॥
प्रेमसागरा ! तव भरती ॥ चढवि सदा वरतीं वरती ॥ ८ ॥

प्रेमसागरा, तव लहरी ॥ उडवी अजुनी वरीवरी ॥
अफाट लाटा नाचीव ॥ ब्रह्मनाद तो ऐकीव ॥
लाटांचे देऊनि झोकें ॥ काळाचीं मिळवी टोकें ॥
या बाजूला ॥ त्या बाजूला ॥
कुठेंहि मग मी पडे जरी ॥ सर्व सारखें मला तरी ॥ ९ ॥

थांबवील असला पूर ॥ कोण असा आहे शूर? ॥
अनंतास देउनी वळसा ॥ ब्रह्माच्या जाइन कळसा ॥
विश्व बुडे मम हृदयांत ॥ पूर्ण हरपलें अंशांत ॥
बोलत जय जय ॥ डोलत थय थय ॥
अनंततेच्या पलीकडे ॥ प्रेमप्रळया, जाच गडे ॥ १० ॥

गाणें माझें प्रळयाचें । कुठलें तें संपायचे ॥
प्रळयाच्या लाटा उडती ॥ गाण्याचीं कडवीं चढतीं ॥
ब्रह्मस्थितिची शून्यगति ॥ तिच्यांतुनिहि गाणीं निघतीं ॥
स्वानंदाच्या - ॥ ब्रह्मपदाच्या - ॥
पूर्णपणाच्या पैलथडी ॥ गाण्याची जाईल उडी ॥ ११ ॥

ब्रह्महि स्वपदिं हालेल ॥ गाणें तरि हें चालेल ॥
शुन्यकल्पनेहुनि खोल ॥ प्रेमप्रळयाचे बोल ॥
नका थांबवूं प्रेमाला ॥ नका थांबवूं गाण्याला ॥
हृदयचि हरलें ॥ शब्दहि सरले ॥
नि:शब्दांच्या नादभरीं ॥ गाणें ऐकत रहा तरी ॥१२॥

टाकुनिया चिद्राजीव ॥ प्रळयामाजीं द्या जीव ॥

अचेतनाच्या गुंगींत ॥ ऐका प्रळयांचें गीत ॥
मृतविश्वाचें तेरावें ॥ कडवें चालें तेरावें ॥
कोणी निंदा ॥ कोणी वंदा ॥
प्रेमप्रळया प्रेमरसें ॥ 'गोविंदाग्रज' गात बसे ॥ १३ ॥

# लांडोर

(मोर नाचतो तशी लांडोर नाचते याचा अनुभव बिचाऱ्या तेजस्वी मोराला येतच असतो; लांडोरीला त्या म्हणीचा अर्थ कळून चुकला तरी उपयोग होत नाहीं; एकूण हें गाणें फुकट आहे.)

नाचतां मोर ॥ नाचते पहा लांडोर ॥ धु. ॥
कोठें त्याचा भव्य पिसारा ॥ कोठें रंगाचाहि पसारा ॥
कोठें थाटमाट तो सारा ॥ कुठें ही चोर ॥ नाचते ... ॥१॥

त्याचा आनंदाचा नाच ॥ दिवे लाविले जाळुनि पाच ॥
कोठें हिरा कुठें ही कांच ॥ तरिहि समोर ॥ नाचते ...॥ २ ॥

जगांत कसरत चाले थोर ॥ तारेवरतीं नाचत मोर ॥
पायीं अपुल्या कच्च दोर ॥ तरिहि छिचोर ॥ नाचते ... ॥ ३ ॥

कच्चा कुचका तो आधार ॥ केव्हां तुटुनि जाइल पार ॥
फुटतां आब हसतिल चार ॥ नसे तो घोर ॥ नाचते ... ॥४॥

जेथें तेथें प्रकार हाच ॥ नाच न नुसत्या मोरांचाच ॥
नाचे मोर कुठें तो साच ॥ बढाईखोर ॥ नाचते ... ॥५॥

हलतां सजीव बळकट काया ॥ लागे नसतें झट चिकटाया ॥
भंवतीं भंवती छाया । जीव ना जोर ॥ नाचते ॥ ६ ॥

कला निसर्गामागें जाण ॥ माया ब्रह्मामागें घाण ॥
छाया देवाची सैतान ॥ थोरा पोर ॥ नाचते... ॥७॥

सत्यामागें लागे भास ॥ नक्कल अस्सलास हमखास ॥
तुटली मधें जरि दमसास ॥ तरी बिनजोर ॥ नाचते... ॥ ८ ॥

जमाव यांचा जमतां थोर ॥ मोरावरही यांचा जोर ॥
चोरावरती होती मोर ॥ अशी शिरजोर॥ नाचते .. ॥९॥

कमअस्सल या अक्करमाशा । ताज्या रक्ता जळवा बाशा ॥
करिती जगतीं स्वैर तमाशा ॥ रूप अघोर ॥ नाचते ... ॥ १० ॥

खोटें नाटें जगी पसरतें ॥ फारपणानें खरेंहि ठरतें ॥
खरें बिचारें दिसतें भलते ॥ मग बिनघोर ॥ नाचतें ... ॥ ११ ॥

बघुनी प्रकार उलटा असला ॥ येत जगाचा वीट मनाला ।
वाटे विनवावें देवाला ॥ नको तो मोर ॥ आणि ही नको लांडोर

# गोड निराशा !

जादूची माझी बाग
तींत फुलें जागोजाग;
रम्य जरी बागाईत;
तरी तिची न्यारी रीत;
कळी कोंवळी चांफ्याची
मिटलेली ती कायमची ;
जरि न कधीं उमलायाची
करिल वृष्टि तरि वासाची;

तशाच कोणी,
सूत्रावांचुनि
दिधल्या रचुनि

कुंदाच्या वेण्या दोन
मोल जिवाचा त्यां होन !
नाहीं पाणी जरि भंवती
तरी दोन कमळें हंसती;

जन्म जलामधिं कमळांचा
न्याय असे हा जगताचा;
परि या कमळांच्या रंगा
खेळे प्रेमाची गंगा !

तुमच्या जगतीं,
किरणे पडतीं,
कमळें फुलतीं,

परि माझी कमळेंच बघा
निजकिरणीं खुलविती जगा

गुलाब होते दोन तसे,
आनंदाने गोड ठसे;
कळ्यावांचुनी फुललेले
कांट्यांच्या त्रासा चुकले;
जणूं फडकती मौजेचीं
नवीं निशाणें लाजेचीं !

गुलाब असले
हांसत बसले,

मनांत ठसले,
हृदयीं धरिलें या भावा
एकतरी काढुनि न्यावा !

परी फुलें तीं जादूंची;
लपंडाव खेळति साची;
रक्षण त्यांचें करणार
मनांतला जादूगार !

दिसतां हातीं लागत ना,
वेड लागलें तेंच मना;
क्षणांत फुलतीं,
क्षणांत लपती,
दिसतीं हंसती,

घेर घेतला गिर्कीचा
फेर थरकत्या फिर्कीचा
निश्चय केला जिंकाया
जादूची असली माया;
तोंडाने उडवायाचा
मंत्र हाकिला प्रेमाचा;
श्वासानें हृदयीं भरिला
मनिं वाटे आतां धरिला;

परि तो कुठला
गवसायाला !
तसाच उरला,

अधिक पसरला चहूंकडे,
तोडितांच उलटा वाढे !

यत्न मांडिला तोच पुन्हां
जीव गुलाबावीण सुना;
स्वस्थानांतुनि हलत नसे
काढावा तो वाटतसे;
गुलाब तर न मिळे मजला
परि कांटे मम देहाला !

त्या कुसुमाचे
संसर्गांचे
कांटे साचे

मांडिती अंगी थैमान !
कांट्यांचे माजे रान !

कोण असा जादूगार
खेळ करी हा अनिवार?
उघड्यावरती टाकुनियां
राखी ती फुलती दुनिया
चोरितांच वाटे ऐशी !
चोरीची थट्टा खाशी !

चित्त शरमलें
जरी विरमले
तरिही रमलें;

चोरी असली लाजेची
वाटे त्याला मौजेची !

अशी निराशा भरे मनीं
शरीर भरलें कांट्यांनीं
गुलाब मज हांसत बसला
हाताशीं नाहीं आला;
नवल तरी कैसें होई -
दु:ख निराशा नच देई !

न कळे कांही,
हुरहुर कां ही ?
वेचें मनही
कां विनवितसे देवासी ?

निराशाच दे गोड अशी !

## स्मशानांतले गाणे

( बोलून चालून भुतांचेंच गाणे - त्यांत अर्थ तरी काय असावयाचा ?
व रागी तरी काय धरावयाचा ?)

वाटे स्मशान शांतिस्थान ! ॥ धु. ॥

सजीवतेचा चाले चाळा,
कवीस त्याचा ये कंटाळा,
त्रास जगाचा चुकवायाला,
शांतपणाचें, रूप जगाचें, अशा स्मशानीं जात ॥१ ॥

विश्रांतीस्तव निसर्गदेवी,
निजसदनींचा दीप मालवी,
(ज्यातें वदती अल्पधी रवी !)
किंवा केल्या, तारा टिकल्या, फोडुनि झुंबर छान !॥ २॥

प्रकाश रवीचा यापरि मेला,
संध्यारक्षारूप पावला।
परी तिचाही शेवट झाला,
आकाशीं जी 'गंगामाई,' पडे तिच्या तीर्थांत ! ॥ ३ ॥

अनंत -तारा -तारका-नयनीं
जरी यावया खुणवी रजनी
चंद्र व वरती परि ये भिउनी,
स्थिती जी रविची, तीच तयाची, होईल हें भय त्यास ! ॥ ४ ॥

दुष्कृत्यांचा बहर चालला,
जोड तयांच्या कृष्णत्वाला
द्याया, अंधारही पसरला,
दृष्टत्वाशीं, अंतरनाशी, मिसळुनि जाई त्यांत. ॥ ५॥

भयाण जागीं, भयाण काळीं,
भयाण वृत्ती होत निराळी;
भयाण झाली तों आरोळी !
जरा दचकला, कवि तो उठला, ऐके देउनि कान. ॥ ६॥

'' शांतीची ही स्मशानकारा,
सजीवतेला इथें न थारा,

म्हणती मरुनी पडतो वारा !
प्रेम जगाचें, जर हें साचें, कसला मग हा नाद ? ॥ ७ ॥
पवन गातसे कां बेसूर ?
हंसे भुतांचे कीं भेसूर ?
प्रेतांचा चौपदरी सूर ?
कीं प्रेतांतुनि सुटला म्हणुनी आत्मा करि थैमान ? ॥ ८ ॥
तों सरणांतुनि अस्थिच उडती,
त्यांची तुटकीं प्रेतें होतीं,
स्कंधी त्यांच्या भुतें बैसती !
करिती बडबड, शब्दही न धड, कवि बसवी अनुमान. ॥ ९ ॥
अणुरेणूंच्या अवकाशांत
प्रेतांचे कण हे शिरतात,
स्वैर घर्षणें ध्वनि करितात,
स्मशानांतलें, गाणें चाले; त्याचा पडसाद. ॥ १० ॥
रातकिड्यांचा किर्र शब्द या
निघे, सारखा सूर धराया,
श्वान रडे हें साथ कराया,
तुझिया हृदयी, धडधड जी ही, धरि तबल्याचा ताल ! ॥ ११ ॥
कवि ऐकुनि हें स्तब्ध जाहला,
प्रकार सारा कळे तयाला,
मृत जिव्हेला फांटा फुटला !
ऐकायासी, त्या गानासी करि आत्म्याचा कान ॥ १२ ॥
''धन्य धन्य ती स्मशानभूमि !
धन्य येथलीं भुतेंहि आम्ही !
सदाहि देवा या सुखधामीं -
घडवी वसती; सजीव जगतीं, नको नको आम्हांस ॥ १३ ॥
धन्य तशी ती मानवजाति !
श्रेष्ठपणा जी मिरवी जगतीं,
सजीवतेचा आव घालिती,
भुतें परांतें, वदतां भुतें, तिरस्कार ये फार ॥ १४ ॥
बाह्यरुप नच भुतांस म्हणुनी,
तुच्छ मानिती त्यां अवगणुनी,

द्विविधरुप जरि धरिती प्राणी -
तरि बाह्यांतर, रुपीं अंतर, जहनम्से अस्मान् ! ॥ १५ ॥

देवनाम भूतांप्रति पळवी,
देवाची त्यां कळे थोरवी,
मानव नवसें परि त्यां फसवी !
कोणी म्हणती, 'ईश्वर नास्ति' - हाच तयाचा मान ! ॥ १६ ॥

अनेक माता, एकचि वनिता,
न्यायमार्ग हा ऐसा असता
अनेक वनिता, एकचि माता ।
व्यर्थ सारा, मांडिति पसारा, नीतीच्या जगतांत ! ॥ १७ ॥

भुतें भुतांस कधीं न खाती,
बंधु बंधुच्या रंगत रक्ती !
बाप मुलाची करितो माती !
हा जगताच्या मनुष्यतेच्या, प्रेमाचा बाजार ! ॥ १८ ॥

नीतीसाठीं वपन मांडिती,
प्रेताहातीं नवरी देती,
अनाथ विधवा पदीं चिरडती !
सैतानावरि, ताण कसा करि, सृष्टीचा सुलतान ! ॥ १९ ॥

शास्त्रांचे तोंडात फवारे,
रुढीचे परि गुलाम सारे !
स्वतंत्रतेचें उसनें वारे;
पक्षी सदनीं, बसले कोंडुनि, गाति यशाचें गान ! ॥ २० ॥

समानतेच्या मारी बाता,
वरच्या लत्ता झेलित माथां,
सवेंच खाली झाडी लाथा;
न ती निवारी, न ही आवरी, बेशरमी हैवान ॥ २१ ॥

अन्नावांचुनि सपिंड मरती;
मरतां त्यांचे पिंड अर्पिती !
सजीव तोंवरि लत्ता देती
मरतां घेती, खांद्यावरती, उरफाटा सन्मान ! ॥ २२ ॥

पुण्यविक्रया करि धनदानीं,
मांग बसे तो उच्च स्थानीं !

भाविकतेला शिवे न कोणी,
कपटी मांजर, दिले तया घर, दारिं इमानी श्वान. ॥ २३ ॥

दोन पतींनी विधवा न सती,
पतिव्रतेला परि पांच पती !
धर्म भाळला आईवरती;
परी आपुलें, तेंच चांगलें, विवेक झाला ठार ! ॥ २४ ॥

देवद्वारीं बसला नंदी,
राजद्वारीं स्वारशिबंदी,
रक्ष्य जनांला होई बंदी,
रक्ष्य वस्तुला, धक्का अपुला, रक्षक राखी प्राण ॥ २५ ॥

गर्भी भार धरि तिजला भजती,
धेनु दुग्धदा, माता वदती,
भर वाहुनि आजन्म पोषिती !
मरतां उदरीं, मातृभूमि धरि; परी तिशीं बेमान ! ॥ २६ ॥

विधवा मार्गी मागें फिरवी,
मांजर अडवें कार्य बिघडवी,
कर्तृत्वाची हीच थोरवी !
प्रेता हंसतां, कार्यक्षमता, न धरी परीं गुमान. ॥ २७ ॥

भुतें बिचारीं रात्री फिरती,
म्हणुनी त्यांतें तिरस्कारिती;
रात्रीची तर गोष्ट दूर ती -
परि दिवसांही दुष्कर्मांहीं पाडिती जन अंधार ! ॥ २८ ॥

केंसांनीं जे गळे कापिती,
स्त्रीच्या केंसांनीं ते तरती !
प्रायश्चित्तें शुद्धहि होती.
शास्त्रे रडतीं, कराच सत्कृतिं तरिही हलते मान. ॥ २९ ॥

धर्मस्त्रीचा गळी कापुनी
समाधान मग करि हिंडवुनि,
तुळशीभंवती, देवायतनीं,
विचित्र लीला दावुनि तिजला, दे दु:खावरि डाग ! ॥ ३० ॥

गोपी सोळा सहस्त्र असती,
तरिही वृंदेसाठी श्रीपति

निघे स्मशांनी; धीर न पोटी;
तुळशीभंवतीं, विधता करिती, काय न हाच विचार? ॥ ३१ ॥

वैराग्याचय सोप्या गोष्टी !
राम रडे परि सीतेंसाठी !
ब्रह्मा लागे मुलिच्या पाठी !
भोळा शंकर, स्त्री अंकावर, गणेश राखी दार ! ॥ ३२ ॥

घरच्या देवा स्त्रिया न भजती,
पुराण-कीर्तन धुंडित फिरती,
देवहि त्यांचे वेश्यांभंवतीं,
विवाहकालीं, शपथ वाहिली, दोघे पाळिति छान! ॥ ३३ ॥

सुधारणेचे भक्त निपजती,
'स्वतंत्रता द्या स्त्रियांस' म्हणती,
पारतंत्र्य परि आपण वरिती
परानुकरणी दंग; सोडुनि स्वत्वाचा अभिमान. ॥ ३४ ॥

कोणि काढितां नवी कल्पना,
करिती सारे वृथा जल्पना,
मिळतां यश त्या, देउनि माना -
पायां पडतां, लाज न चित्ता, म्हणतो तो अवतार ! ॥ ३५ ॥

सफेत येतो रंग शिराला,
रंग आतला तसाच काळा !
वृद्धपणा नच दुष्टत्वाला,
भय काळाचें, नच देवाचें तेंहि परी देहास ! ॥ ३६ ॥

चुना पांढरा, कातहि काळा,
रंग तयांतुनि निघे निराळा !
सहकार्यानें, असल्या ताळा !
दोघे मिळुनी, एक ठिकाणीं करिती परस्परनाश ! ॥ ३७ ॥

मित्रपणानें पडे गळ्यांत,
गळफांसहि तो घालिन हात !
कुणी कुणाचा करणें घात -
नेम न याचा; उपकाराचा मोबदला अपकार ! ॥ ३८ ॥

सुखदु:खांचा भावहि नसतां,
सुखदु:खांची दावी समता.
सुखी व्हावया भगवद्गीता
वेद मंथुनी श्रीकृष्णांनी, हेंच काढिलें सार ! ॥ ३९ ॥

बळी पोंचतां भुतें न छळिती,
अल्पतुष्टता हास्यास्पद ती,
मानवतेची परी न रीती.
पिंड जयाचा खातो त्याचा करितो जगिं बोभाट ! ॥ ४० ॥

म्हणती आम्ही भुतें बाधतीं
भूतांची परि नाहीं छाती -
जायाची या असल्या जगतीं !
भुतेंच भीती या भूतांप्रति, भुते भुतां हीं खास ॥ ४१ ॥

''मरतां मानव भुतें निपजती ! ''
बोलायाची परि ही रीती.
भांगेंतुनि कां तुळशी निघती?
कोठें आम्ही ? कोठें तुम्ही ? कशास कांही ठाव ? ॥ ४२ ॥

ब्रह्मपदाहुनि आत्मा ढळतो,
मरुनि जगाच्या स्मशानिं येतो,
मन मानव-छे: ! भूतचि होतो
चित्तेंत जळुनी, दिव्य भोगुनी, सुटतो आत्माराम ! ॥ ४३ ॥

भुतें विदेही, मानव सुंदर,
दिव्य भूमिका स्मशान-मंदिर,
प्रवास येथें फारचि दुष्कर !
प्रेत आणितां बोले जनता, 'राम कहो, श्रीराम ! '' ॥ ४४ ॥

इतकें गाउनि भूतें हंसली,
अखेरची जणुं तान घेतली,
तया वाहवा घुबडमंडळी -
घू घू शब्दें देत मग वदे ' घ्या आतां आराम ! ' ॥ ४५ ॥

श्वानहि सांथ करोनी दमले,
विधवेंने मृत बालक त्याजिलें,
दूध तयाच्या मुखि सांपडले,
पिउनि तेवढें, बघुनि कविकडे, हांसत पडलें श्वान. ॥ ४६ ॥

कवि हें पाहुनि विस्मित झाला,
म्हणे, '' पात्र मी न या स्थळाला ! ''
पळुनी पापी जगांत आला,
स्मशानांतले, गाणें असलें, कवीस नुरवी भान ! ॥ ४७ ॥

म्हणे, ''वरुनि जग दिसतें सुंदर -
'राम' जाणतो 'क्या है अंदर' ''
स्मशानातलें गाणें सत्वर -

अमोल म्हणुनी, टाकि उधळुनी चहूंकडे जगतांत ! ।। ४८ ॥

# घुबडास !

“ या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि या निशा पश्यतो मुनेः ॥ ”

( या प्रवचनाची आठवण घुबडाचा शब्द ऐकून होऊं नये असे त्या बिचाऱ्याने कोणतें पाप केलें आहे बरें ? आमच्या दृष्टीचा रंग त्यावर का लावायचा ?)

घुबडा, बोल रे घू घू । नकोत चिमण्या राघू ! ॥ धृ. ॥

मातिंत मिसळुनि झाली माती
धडपड असल्या फोलासाठीं
चिंवचिंव नुसत्या पोटासाठी
ओवाळुनि टाकिलें जगीं ते मीं तूं कधिंहि न मागूं. ॥ १ ॥

आज आपला बोलति नाद
उद्यांच भलत्याचा पडसाद !
पोपटपंची पोकळवाद !
जळत्या खाईसाठि म्हणाया मी तूं कधिंहि न मागूं ॥ २ ॥

शंख कुणाचा पोटापाठीं !
गात कुणी तर तिसऱ्यासाठी !
छाया जीवाची उफराटी.
“ जो तो ज्या त्यासाठी !” चल, हें मी तूं यांना सांगू. ॥ ३ ॥

पोपट गातो मंगल नाम,
जळु दे; - कुठला तयांत राम ?
उष्ट्या गुळणीचा तो ‘राम !’
आपण आपुला राम रमवितां मी तूं कधिंही न भागूं ॥ ४ ॥

सताड उघड्या रविकिरणाच्या
प्रकाशांतला जो तो नाच्या,
नाचत तालावर इतरांच्या,
ताज्या घोड्यावर गोमाशा खुशाल दे या गुंगूं ॥ ५ ॥

पोपट चिमण्या या जाऊं दे,
खुशाल रडगाणें गाऊं दे,

गोष्पदिं मुंगीला न्हाऊं दे,
मार्ग आमुचा सडेतोड हा; जगास दे रे रांगू ॥ ६ ॥
धनी जगाचा कुठला आला
तुम्हाअम्हांला शिकवायाला?
निघेल तोची सूर आपुला !
माझें मजला, तुझेंहि तुजला, 'मी-तूं पण' ना त्यागूं ॥ ७ ॥

मनांत माझ्या जी हुरहूर
जनांत काढिन तीचा सूर,
सांथ मला कर; जरि तूं दूर -
बेसूरानें, भेसूरानें, झोंप जगाची भंगूं ! ॥ ८ ॥

तुमची अमुची न्यारी रीत,
एकान्ताचे भालाईत,
काळोखावर लिहिलें गीत,
उचल जागत्या अशा जगाला चल, वाचाया सांगू ! ॥ ९॥

ऐकूनि असल्या पिशाचगाना
कितीक मोडुनि पडतिल माना,
कितेक हलतिल ऐकुनि ताना,
तुला मला परि काय होय तें ? रंगाखातर रंगू ॥ १० ॥

गगनाच्या उदरांत भरारा
काळोखावर घुमतो वारा
घो घो घो घो ओघचि सारा,
दक्षिण-उत्तर कापुनि अंतर नभास लागे लंघूं ॥ ११ ॥

वेताळाची येतां स्वारी,
भूत वाजवी काय तुतारी ?
भालदार कीं त्या ललकारी?
मरत्या रात्रीचा हा श्वासचि लागे काय तरंगूं ? ॥ १२ ॥

वरतीं नभ हें, अरती भूतळ,
सटवीच्या जात्याचे हे तळ,
पीठ त्याचें गळतें भळभळ,
त्या जात्याची घरघर वारा; त्यावर गाया लांगू ॥ १३ ॥

अफाट वारा सुटला असला
काय कुणाला भिववायाला ?

तसा घोगरा घसा आपला,
नच रिझवाया, नच खिजवाया; रंगाखातर रंगूं ॥ १४ ॥

मेघ मारुनी वरुनी गारा
काय कुणावर करिती मारा?
त्यांतुनीच परि निघती धारा,
'गोड कडू' चें गाणें असलें चल ये जगता सांगूं ॥ १५ ॥

गुरफटलें जग सारे मोहुनि,
कालतरंगावर परि मोहुनि,
बघ मी आलों त्यांतुनि पोहुनि,
फिरता फकीर तूं; तव चरणीं जरा मला दे लागूं ॥ १६ ॥

संन्यासी तूं जन्माचा रे;
इतरांची तर कथाच विस
होतीं का परि मातापितरें?
पूर्वाश्रमिंच्या संसाराचा थांग न देसी लागूं! ॥ १७ ॥

प्रीती असे का ठाउक तुजला ?
जीव कधी का दु:खें सुजला ?
प्रकाश नयना कधि का दिसला ?
तुझ्यावाचुनी तुझ्या जगांत न देसी कोण वागूं ॥ १८ ॥

व्याप कधीं जन्मामरणाचे
भोगिलेस का स्मरतें साचें?
की संस्कारहि हे पूर्वीचे ?
येतां जातां किंवा प्राणा देह लागतो बिलगूं ? ॥ १९ ॥

एकान्ताला कां पतकरशी ?
समाधींत या कधिंचा रमशी?
कुठें असा संन्यासहि शिकशी?
''घू घू'' वांचुनि दुसरें कांही तुझें न देशी उमगूं ॥ २० ॥

शिष्य तुझा मी झालों म्हणुनी,
नि:संगाची संगत धरुनी,
काळोखाची राख फांसुनी,
सांग तुझा गुरुमंत्र मला तो; करीं एकदां घू घू ॥ २१ ॥

ऐकुनि वाटे तव हें गाणें

निजल्या विश्वाचेंच धोरणें,
वाऱ्याचे बेछूट बरळणें,
किंवा काळोखाचें रडणें लागत काय तरंगूं ॥ २२ ॥
काळे डोंगर जिकडे तिकडे,
कडेकपारी त्यांचे जबडे,
काळोखामधि असतां उघडे -
तुझा शब्द जणुं निघतो त्यांतुनि 'आ' करितांना घू घू॥ २३ ॥

नादब्रम्हाचें हें प्रेत ?
कीं जीवाचा नाच हवेंत ?
मृत ओंकाराचा ध्वनि येत ?
तांडवकालीं कीं शंभूचा डमरु करि हा घू घू ? ॥ २४ ॥

भटक्या जीवा आला थकवा,
पाहुनि भुलावणीचा चकवा,
काळोखांतुनि घाली पकवा,
उलूनि काळिज ब्रह्मांडाचें लागे काय दुभंगू ? ॥ २५ ॥

विश्वात्म्याने शंख स्फुरिला,
विश्वहृदयीं तो घुमूं लागला
हृदयामाजीं या दुमदुमला,
फोडुनि हृदया गगनपथावर काय लागला वेंधूं ? ॥ २६ ॥

कीं वाऱ्याचे घुटके घेत,
रात्र की प्रळयाचा बेत,
काळ तिला हुंकारा देत,
भीषण रव तो शब्दांवर लागत काय तरंगू ? ॥ २७ ॥

बहिरासहिरा होती जीव,
घुमघुमण्याची नव जाणीव,
कानावांचुनचें ऐकीव,
थरथरतो अंगात जगाच्या एकांतांतिल घू घू ? ॥ २८ ॥

चोर मनाचे मनीं चरकती,
हलल्याविण मागेंहि सरकती,
खुलीं दिले भ्रमभरें थरकतीं,
घुम् घुम् घुम् घुम् एकसारख्या घुमतो आता घू घू ॥ २९ ॥

असें असे जर गाणें भेसुर

ऐकाया तरि आत्मा आतुर,
कां न कळे तें लावी हुरहुर,
त्यांत काहिं तरि असे थेट जें जिवास लागे बिलगूं ॥ ३० ॥
असल्या गाना तूं गातांना
काळोखावर ठरतिल ताना,
रेषारुपें दिसतील नयनां,
तुझी तीव्रता ऐकुनि माझ्या हृदया दे या जागूं ॥ ३१ ॥

मीही मिळविन माझा सूर,
लाडें लाडें जे कमसूर,
करुन टाकूं त्यांचा चूर,
'गुळाचेच गणपती' जगीं जे त्यां वेशीवर टांगूं ॥ ३२ ॥

खरें न कोणा कधींच दिसतें,
म्हणुनिच दिसते तें तें पटतें,
चुकल्या चित्ता खरें वाटतें,
वस्तुस्तुवर परि तेजाचा छाप लागतो रंगूं ॥ ३३ ॥

मूळ रुप परि अंधारांत,
न फिरे त्यावर भलता हात,
तें तूं बससी सदा पहात,
तमोभेदिनी दृष्टि तुझी ती दे मग नयनिं तरंगूं ॥ ३४ ॥

दृष्टिस इतर न दिसतां कांही,
सैरावैरा हिंडत नाही,
जो तो ज्याचा त्याला पाही,
आत्मनिरीक्षण काळोखांतिल काम दृष्टिला सांगूं ॥ ३५ ॥

अहंपणाच्या गाऊं गाना,
मुक्या मनाच्या उघड्या ताना,
स्वानुभवानें हलवूं माना,
ठराविकाला लाथ मारुनी नभासही उल्लंघूं ॥ ३६ ॥

तुझी आपुली संगत छान,
एकान्ताचें गाऊं गान,
बाणा ज्याचा त्या अभिमान,
वेळ आपुली भरास आली चल ये गाया लागूं ॥ ३७ ॥

रात्र रंगली काळोखानें,

गेलीं संगीताची गानें,
विलया गेलीं उसनी भानें,
कोणी निजलें, कोणी मेलें, आतां मी तूं जागूं ॥ ३८ ॥
वरती नभ हें खाया पाही,
खाली काळ्याकभिन्न राई,
काळोखाच्या भकास खाई,
सळसळुनी काळोख उकळतो; पवनहि लागे झिंगूं ॥ ३९ ॥

तेजाची गंगाच आटली,
काळोखाची प्रभा दाटली,
भयानकाची सभा थाटली,
चिंतरनाचें प्रेतचि नाचे; लागे विश्व दुभंगू ॥ ४०॥

दिवे चमकती आकाशांतिल,
नसत्या चिरंतना ते गातिल,
आपुल्या काळोखाला खातिल,
जळत्या आशेच्या या ज्योती काळोखानें डागूं ॥ ४१ ॥

मरुं दे त्यांचे फसवें तेज,
खोट्या मोत्यावरचें वेज,
कृष्णनभाची अखेरशेज -
करुनि घोंगडी देउनि त्यांच्या अखंड वाती भंगूं ॥ ४२ ॥

पिळुनी पाणी काळोखांतिल,
दिवे मालवूं आकाशांतिल,
आले जेथुनि तेथें जातिल,
काळोखाची धूळ गिळूनि मग काळे काळे रंगू ॥ ४३ ॥

शरीर काळें, जीवहि काळे,
बटबटीतसे काळे डोळे,
तारांच्या काजळिचे गोळे,
काळभैरवचि मी; तूं माझा गोजिरवाणा राघू ॥ ४४ ॥

घोर शब्द तूं करिं या काळीं,
-एकांताची जणुं किंकाळी,
शांतिब्रह्माची कीं उकळी,
स्वानुभवाचा तुझेपणाचा, दे रव भंवती पांगू ॥ ४५ ॥

मध्यरात्रिच्या या अवकाळीं,

गात बसूं चल गाणीं काळीं,
काळीं किरणे नेत्र उगाळी,
सजीवतेच्या काळ्या काळ्या प्रेताला आलिंगू ॥ ४६ ॥
ठराविकानें मग जें भरलें,
ठराविकचि तें आता निजलें,
ठराविकचि रीतीनें मेलें,
स्मशानांतला जलसा अपुला; चला गावया लागूं ॥ ४७ ॥

ज्याच्या प्रेताच्या तोंडावर,
काळोखाची टाकू चादर,
'राम' तयानें म्हटला, ये तर -
रामप्रहरच्या अशा भुपाळ्या आपण गाउनि रंगू ॥ ४८ ॥

भूपाळ्यांचा विभास राग,
भयानकाला लाविल आग,
ढवळुनि तमास जागोजाग,
काळोखाच्या लाटांवरती लाविल तेज तरंगू ॥ ४९ ॥

आकाराविण जीव डोलती,
बोलावांचुनि भाव बोलती,
गाणीं त्यांची दूर खोल तीं,
अर्थ खोल ते करुं बोलते; चल ये, त्यांतच गुंगूं ॥ ५० ॥

काळोखाने पीळ मोकळे,
गतकाळाचें गाणें सगळें,
घुमुनि सारखें त्यांत गोंधळे,
अर्थ तयाचा चल ये, आपण सर्वांआधीं उमगू ॥ ५१ ॥

फुलें कालचीं काळवंडली,
नक्षत्रेंही नभीं झिरपलीं,
निःश्रेयाचीं बिजें करपलीं,
जित्या सुराचा जरा जिव्हाळा दे रे त्यांना लागूं ॥ ५२ ॥

ऐकुनि तव हें शांतरसाचें,
काळें गाणें करुणरसाचें,
उफळतील कण काळोखाचे,
प्रकाशबीजें गूढ लागतिल फुलुनी स्वैर तरंगू ॥ ५३ ॥

स्वैर नाचती प्रकाशांतली

विश्वें सारीं बघ हीं सुकलीं,
उदास छाया त्यांवर भरली,
सूर खडा धर, वेळ तुझी ही; गूढ आपुलें सांगूं ॥ ५४ ॥
फुंक आपुलें भयाण शिंग,
काळोखाचें फोडुनि भिंग,
अज्ञेयाचें उकली बिंग,
पृथ्वीचें नारिंग फुंकरावर उडवाया लागूं ॥ ५५ ॥

नारिंगाच्या अशा शिदोऱ्या,
काळाखाच्या वळुं या दोऱ्या,
भुरक्या गहिऱ्या गोऱ्यामोऱ्या,
करितिल त्यांच्या आवारावर नाच उद्यांचे राघू ॥ ५६ ॥

जरी आपुलें गाणें काळें,
निघेल त्यांतुनि विश्व उजाळें,
चिरंमृतांना उठविल काळें
मरत्या ब्रह्मालाहि आजच्या होइल मात्रा लागूं ॥ ५७ ॥

झाडांच्या पानांची सळसळ,
मृतप्राय आत्म्यांची तळमळ,
विश्वाच्या हृदयांतिल खळबळ,
दूर कराया - दूर हराया चल ये, गाया लागूं ॥ ५८ ॥

काळोखांतुनि जग जें दिसें,
परब्रह्म तें त्यावर बसतें,
काळें गाणें ऐकुनि हंसतें,
नित्यासाठी साक्ष तयाची सुरासुरावर मागूं ॥ ५९ ॥

शांतरसाचा, एकान्ताचा,
स्वानुभवाचा, वैराग्याचा,
काळोखांतिल अज्ञेयाचा,
गीतझरा सोडुनी तयावर देऊं जगा तरंगू ॥ ६० ॥

शांत शांत मग जिकडे तिकडे
ब्रह्मजलाचे सडे चहुंकडे,
जें तें होइल तेव्हां उघडें,
परात्पराचें गीत रोकडें गातिल चिमण्या राघू ॥ ६१ ॥

घुबडा ! आतां वेळ न उरला,
जीव कधींचा गाया झुरला,
भाव तयाचा मनींच मुरला,
तोंड तयापरि फोडिलेंस तू आतां दे त्या रंगू ॥ ६२ ॥

काळोखाचें भिनतां वारे
शरीर सारें पहा थरारे
पंचप्राणहि थिजले सारे
सुन्न मस्तकीं घुमतो आतां एकसारखा घू घू ॥ ६३ ॥

काळीं गाणीं अशीं गाढ तीं

रसरसलीं हृदयांत वाढली,
पिळुनी हृदया सूर काढती,
'गोविंदाग्राज' घुमवितात मग घू घू घू घू घू घू ॥ ६४ ॥

## कलगीचें गाण

बोल बोलतों सलगीचे
गाणें माझें कलगीचें !
एक वेळ जी आवडती
सारंगी माझी होती,
नानापरिचे सूर तिचे
निघती कितितरि गमतीचे;
काळ पुढें तो परि गेला
आनंदहि कांही मेला
नवी नवाई - कायम नाहीं - थोडी राही
पुढें सुरानें नच रमवी
स्मृतिनें परि त्यांच्या भ्रमवी !

असाच बसलों कुठेंतरी
सारंगी घेऊन करी;
खेद मना जरि बहु झाला
आशा होती फार मला -
धिन्ना धिन्ना धिन्नकना
प्रसन्न करिशील खिन्न मना;
ही सारंगी- रंगुनि रंगी - चित्ततरंगीं
हलविल मनिंच्या तारांना
काढिल नानापरि ताना !

ढोल नगारें मजभंवतीं
नाना नादें परि रडती;
त्यांची पोकळ ओरड ती
एकपणाची करि माति;
गरीब माझी सारंगी
मुळी खुलेना हमरंगी;
सूर जमेना-चित्त रमेना - मज करमेना,

विरमेना रव भंवतींचा,
खेदहिं माझ्या चित्तींचा !

दाटी केली तों गगनीं
कृष्ण भयंकर मेघांनी,
स्वैरपणें हृदयी शिरले,
मस्तकांतही ते भरले;
कडकडाट त्यांचा भारी,
धुकें पसरलें बाहेरी;
मन घाबरलें - बहु बावरलें - भटकत फिरलें.
कांहिं सुचेना - समजेना,
कांहि रुचेना, उमजेना !

मेघांच्या छायेसरसें
काळोखाचें राज्य दिसे;
दाट तमाच्या तेजांत
नाहिंपणाचा गिरि दिसत;
काळोखाच्या किरणांचे
कांटे खुपती मग साचे;
वाटे क्षणिं पर-गिरिशिखरावरि - बाळ एक धरि
मंजुळ गाण्याचे घेर
ऐकिवाच्या बाहेर !

मेघांच्या थैमानानें
क्षणांत विसरे परि गाणे;
कल्लोळाच्या मग नादीं
यत्न करीं मी संवादी;
पडुनी भलत्या अशा भरीं
सारंगी मी न धरिं करी;
परि तें गाणें - मधुनि ऐकणें- पुन: विसरणें,
रचणें काळोखावरतीं
मग वाऱ्यांच्या इमारती

मेघांच्या गर्जनेसवें
मीहि ओरडें दीर्घ रवें;
ढोल नगारे बेसूर

त्यांतच मी मिळवी सूर;
आशा ऐशी मन भावी
सप्तसुरां मिळणी व्हावी;
अखेर फसलों - उगाच बसलों- भयाण हंसलों
सुर भिन्न एकेकाचा,
एक भाव तेथें कसचा !

यत्न करीं मग अखेरचा
सूर धरी मग अखेरचा
भेसूराचें संगीत
ऐकाया आत्मा भीत !
संतापाने भूमिवरी
सारंगीचा चुरा करी !
भान गळालें - ऐक्य पळालें - सूर जळालें,
झालें गोडीचें काळें
ताराचें झालें जाळें !

हृदयी मेघांची गरदी
दंग असे भीषण नादीं;
नाहिंपणाचा डोंगर तो
अंधपणें पाहत होतो;
मधुनिमधुनि त्या बाळाचें;
गाणें चाले भासाचें;
वृत्ति बावरी - रडे बिचारी- ऐकाया तरि
नसत्या पडद्याआड
गमे बाळ दडलें द्वाड !
स्थितींत या त्या मेघांचा
कडकडाट हो शेवटचा;
तोंच कडकडे वीज भरे
अवसानाचें ये वारे;
धुकें पळालें फार जवें
मेघ जळाले जळासवें;
वृत्ति रंगली - फारच रमली - हर्षे रडली
उफराटी सारी सृष्टि
मेघाविण झाली वृष्टि

खरेपणाचा पाऊस
स्वच्छ धूत काळोखास;
दाट तमाचें तेज बने
गेली तीं काळीं किरणे;
सारंगी तों करीं हंसे
नवल, जशीच्या तशी असे !
समोर डोंगर-परि शिखरावर - बाळ मनोहर
स्वच्छंदें गाणें गाई
सूर सूर ऐकूं येई !

वृत्ति ऐकुनी थरारली
सारंगी वाजवुं सजली;
सात सुरांस्तव ती बेडी
मुदें तिच्या तारा छेडी !
सूर एकची निघे परी
पहिल्याहुनि किती गोड तरी !
सुराबरोबर - विरला डोंगर- शिखरतळावर
नाहीचें नाहीं झालें
बाळ गात पुढती बसलें !

ढोल नगारे ते पहिले
पहिल्यापरि चालू झाले;
गाण्याचे परि या सूर
पोकळ करिती चूर !
वृद्ध वधूचें हो खासें
बालवराशीं लग्न असें !
त्या जोडीचें - अपत्य साचें- गाणें अमुचें
उपजे बाळपरी नादीं
पितराच्या जन्माआधीं !

ढोल नगारे एकसरी
त्या लग्नाचीं वाजंत्री;
सुमूहूर्ताचा झण फुटुनी
युगें निघाली त्यामधुनी !
बाळचि तें गाई गाणें;
नवरामुलगा मंत्र म्हणे;

नव्या जुन्याचें - उण्यापुऱ्याचें - असेनसेंचें
लग्न चाललें चौफेर
सारंगी मम आहेर !
साथ कराया गाण्याशीं
सारंगी घे हाताशी;
''गा तूं, करील साथ, मुला !
माझी सारंगी तुजला''
बाळ तें स्वच्छंद
गाणें करि अपुलें बंद !
बालक रुसलें- पळत चाललें - अंधुक झालें,
माझी सारंगी म्हणतां
मुकेपणा वरि तें नसता !
वेड लागलें गाण्याचें
आर्जव केलें बहु त्याचें
'' बाळा गा रे ! गाच पुन्हां,
गाण्यावांचुनि प्राण पुन्हां,
माफ करीं कसलाहि गुन्हा,
गाच, गाच परि गाच पुन्हां।''
पायां पडलों - ''चुकलों !'' वदलों - अखेर रडलों;
राग तयाचा जाईना !
कांहीं केल्या गाईना !
'' जपलों जीतें जिवापरी
सांरगी ही तूंच धरी !''
ऐकुनि आनंदें हंसलें
बाळ पुन्हा गाऊं सजलें;
एकपणा भिन्नत्वाचा
जीव तोच त्या गाण्याचा !
चिरकालींचे - मखमालीचे - मऊ गालिचे
केले माझ्या हृदयाचे
गाणें मग त्यावर नाचे.
बाळा सारखें गात पुढें
गाण्यामाजी जीव पुंढें
सर्वांगी तें विष भिनलें;
सुख मरणाचें सांपडलें;

ऐकत असतां मी मेलों,
प्रेतावारे माझ्या बसलो !
भान न साचें - आज उद्याने मग आतांचे
दिवस वाटले जायाचे
प्रेताच्या आयुष्याचे !
चहूंकडे गाणें भरलें;
सारंगी गाणें झालें;
मूर्त भाव ये गाण्याला
धरीनसे गमलें मजला;
धरावया जों हात हले
हातांचें गाणें झालें !
कानांचेंही - दृष्टीचेंही गाणें - होई !
मजला मी पाहूं गेलों
तों मीही गाणें झालों !
गाणें झालें सर्वांचें,
गाणें झालें काळाचे;
गद्याचे गाणें सगळें,
गाण्याचे गाणें झालें;
गाण्यानें मग त्या गाणें
गाण्यानें ऐकत बसणें !
नादब्रह्मीं - जिरलां 'तुम्ही' - जिरलो 'आम्ही'
ऐकतांच ऐके त्याचें
झालें जें ऐकायाचें.
स्वार्थ नसे, ना परमार्थ,
गाण्याला कुठला अर्थ?
वृत्ति जाहली चवचाल,
गाण्याला नुरली चाल !
ध्रुवपदिं गाणें जें सारें
ध्रुव पद मग कसलें बा रे ?
गाण्यांतचि जिरतां काळ
गाणें सहजचि बेताल !
क्षणिं शब्द सुरे - क्षणिं राग हरे - मग नाद मरे,
फुकट नव्हे बा, तें गाणें,
करिशिल मग '' गाणें गाणें ॥''

बोल बोललों सलगीचे,
गाणें माझें कलगीचें !
तोच तयावरि करिल तुरा
वेडा जो मनिं खराखुरा
खराखुरा परि पुरापुरा
असला वेडा करिल तुरा !
गा जगतांना - गा मरतांना - मर गातांना
मरुनि सदाही गाच परी
गाणें मरणें एक करी !
स्वप्रेतावरि जो बसतो,
तुझ्याठायीं मजला बघतो,
गाण्यामाजीं दोघांना
पाहुनि घेइल तो ताना !
त्याका हें देतों गाणें
अर्थ जयाला मानें बाणें;
आदिहि गाणें - मध्यहि गाणें - अंतहि गाणें,
असलें गाणें मिळे नवें,
काय याहुनी तुला हवें ?
होतें गाणें जरि माझें,
आतां झालें तेंच तुझे !
तुझें तरी परि तें कसचें ?
गाणें झालें सर्वांचें !
जाणे तें गाणें साचें
गाणें असलें कोणाचें ?
सवाल घ्यारे - पुढें सरारे - तुरा करारे !
बोल संपले सलगीचे,
गाणें माझें कलगीचें !

(तमााशांत कलगीच्या सवालाला तुऱ्याचा जबाब मिळतो;

जगाच्या तमाशांत तरी तसें कां नसावे ?)

## श्रीमहाराष्ट्र गीत

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ धृ. ॥
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा ।
अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा ॥

भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा ॥
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा, ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी
निशाणावरी
नाचतें करीं ॥
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासि वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ॥
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ १ ॥

अपर सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्र देशा ।
सह्याद्रीच्या सख्या ‘जिवलगा’ महाराष्ट्र देशा ॥
पाषाणाच्या देहीं वरिसी तू हिरव्या वेषा ।
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा ॥
तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची ॥
मंगल वसती जनस्थानिंवी श्री रघुनाथांनी ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी… ॥२॥

भिन्न वृत्तिंची भन्न भिन्न हीं एक जीवसत्त्वें ।
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्त्वें ।
चित्पावन बुद्धीनें करिसी तू कर्तबगारी ।
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी ॥
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर ।

ठाक मराठी मनभट दावी तुझें हाडपेर ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी ... ॥ ३ ॥

ठायीं ठायीं पांडव लेणीं सह्याद्रीपोटी ।
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं ॥
तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिंचाहि ।
लढवय्या झुंझार डोंगरी तूंच सख्या पाही ॥
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल ।
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी ... ॥ ४ ॥

तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा ।
वहाण पायीं अंगि कांबळी उशाखालिं धोंडा ॥
विळा कोयता धरी दिंगबर दख्खनचा हात ।
इकडे कर्नाटक हांसतसे, तिकडे गुजरात ॥
आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल ।
तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी ... ॥ ५ ॥

रायगडावर माय जिवाची गवळण बिनधोक ।
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ रोखठोक ॥
करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड ।
हिरडस-मावळचा श्रीबाजी, ती पावनखिंड ॥
करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा ।
कोंडाण्याचा करि सिंहगड मालुसरा तान्हा ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी .. ॥ ६ ॥

रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला ।
पहिलावहिला अष्टांगांनीं प्रणाम हा त्याला ॥
शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा
पुंडलिकांच्या, शिवरायांच्या, टिळकांच्या देशा ॥
अनंत कोटी ग्रंथ रचुनिया जोडि तुझ्या नामा ।
वाल्मिकीचें शतकोटी यश विष्णुदास नामा ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी .. ॥ ७ ॥

मयूर कविच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्र देशा ।
कवि कृष्णाच्या* निर्यमका हे महाराष्ट्र देशा ॥

*केशवसुत.
देवी ज्ञानेश्वरी करि जिथे भक्तीचा खेळ ।
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ ॥
जिथें रंगलीं साधींभोळीं जनाइचीं गाणी ।
तिथेंच खेळे श्रीपादांची कलावती वाणी ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी .... ॥ ८ ॥

विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी ।
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी ..
तुला जागवी ऐन पहांटे गवळी गोपाळ
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ ॥
मर्दानी इष्काचा प्याला तुझा भरायासी ।
उभा टाकला सगनभाउ हा शाहुनगरवासी ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी... ॥ ९ ॥

प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायाला ।
दो हातांचा मुजरा माझा तुळशीरामाला ॥
भीमथडीहुनि चहुंमुलखांवर फिरले धारकरी ॥
भीम थडीवर चहुंमुलखांतुनि जमले वारकरी ।
आळंदीच्या ज्ञानोबांची भिंत घेत धांव ॥
पुंडलिकांचें नांव चालवी दगडाची नाव ॥
गोलघुमट घुमवीत सारखा नवलाची भाक ।

जेजूरीवर चढी पायरी उभी नऊ लाख ॥
ध्येय जें तुझ्या अंतरी ..... ॥ १० ॥

**(अपूर्ण )**

# अनामिकाचे अभंग

(ज्या प्रदेशांत पाऊस टाकावयाचे आहे येथील रहिवासी साधुसंतांना तुमचा आमचा स्पर्श अनामिकापेक्षांहि अमंगळ आहे; शिवाय, मराठीचिये नगरी या पंढरीच्या पाहुण्यांची श्रीचंद्रभागातटी जी प्रेमळ पंगत झाली तिच्या उष्ट्याखरकट्यासाठीच हात पसरण्याचा जिथें संकल्प आहे, तिथें नावाचा अभिमान अनाठायी आहे. मराठी रसवंतीच्या पवित्र अभंगस्वरुपाला माझ्या अनामिक वृत्तींच्या पामर वाणीनें स्पर्शदूषित करणाऱ्या या अतिप्रसंगाची जनस्वरुप जनार्दनाकडून मला क्षमा होईल अशी आशा आहे.)

## मंगलाचरण

नमो पांडुरंगा ! नमस्ते श्रीरंगा । रुक्मिणीच्या रंगा नमोनमः ॥ १ ॥
सर्वां मंगळाचा एकरुप निधि । तूंच देवा विधी-हरिहर ॥ २ ॥
ऐकिल्या देवांच्या तेहतीस कोटी । तीं रुपें गोमटीं देवा तुझी ॥ ३ ॥
निर्गुणाचें ब्रह्म सगुणाची मूर्त । दोही ठायीं कीर्त एका तुझी ॥ ४ ॥
म्हणे 'x x' अगा पंढरीच्या देवा । अनामिक सेवा घ्यावी आतां ॥ ५ ॥

१

कवित्वाचा येथें वाहिला मीपणा । लक्ष्मीनारायण तुझे पायीं ॥ १ ॥
गणांमात्रांचा तो नको ताळेबंद । नको वृत छंद नाम गाया ॥ २ ॥
विना कानामात्रा आणिक वेलांटी । लेखन -कामाठी मांडिली हे ॥ ३ ॥
साहित्याची कळा झाली तिऱ्हाईत । शुद्धाशुद्धीतीत नाम तुझें ॥ ४ ॥
म्हणे 'x x' जें जें मनीं मुखीं आलें । तें तें येथ झालें ब्रह्मार्पण ॥ ५ ॥

२

क्षणमात्र थांबा असंगाच्या संगा । अहो पांडुरंगा कृपावंत ॥ १॥
मनाचा मुहूर्त साधुनि हा आज । सोडूनिया लाज बोलतों मी ॥ २ ॥
माझ्यावरी मीच मांडीत फिर्याद । तुझ्यापायीं दाद मागावया ॥ ३ ॥
नका देवराया धरुं भीडभाड । कराल तो निवाडा मान्य आहे ॥ ४ ॥
म्हणे 'x x' देवा रखुमाईच्या कांता । परी दूर आतां नका राहूं ॥ ५ ॥

३

जीवेंभावें देवा आम्ही अमंगळ । जातीचे चांडाळ, थोर नांवे ॥ १ ॥
पांडुरंगा आम्ही युगांचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ॥ २ ॥
व्रत एकादशी मात्र हें देहाशीं । नित्य मनापाशीं दिवाळीच ॥ ३ ॥
नांवाचेच साव आम्ही थोरथोर । मनाचे हे चोर सर्वकाळ ॥ ४ ॥
तुझे पायीं आतां चोरी नसे कांही । म्हणे 'x x' नाही भयभीत ॥ ५ ॥

४

मागायाची आहे मेख । तुजपाशीं हीच एक ॥ १ ॥
सुखदु:ख ही केवळ । जन्मा आलियाचें फळ ॥ २ ॥
इंद्राचंद्रा कर्मरेखा । तेथें माझी कोण लेखा ? ॥ ३ ॥
हेंचि एक द्यावें दान । घडी कांही तुझे गान ॥ ४ ॥
म्हणे 'x x' हीनदीन । मृगजळींचा हा मीन ॥ ५ ॥

५

नाही भक्तिभाव नीट । तरी हांक मोकली तो धीट ॥ १ ॥
नाही मुक्तीचा हव्यास । नसे नामाचाही ध्यास ॥ २ ॥
नेमधर्म कोणा ठावा । एकरुप उजवाडावा ॥ ३ ॥
तुम्ही यावें आम्हांसाठी । कवित्वही न ऐसें गांठी ॥ ४ ॥
म्हणे 'x x' हांके साच । अधिकार पाप हाच ॥ ५ ॥

६

आला गोपगोपींसाठी । देवा तुम्ही यमुनाकांठी ॥ १ ॥
पुंडलिका द्याया भेटी । देव आले वाळवंटी ॥ २ ॥
नामयाच्या कारणीं । राउळाचीही फिरवणी ॥ ३ ॥
दामाजीच्या संकष्टी । विठू धेड होई कष्टी ॥ ४ ॥
म्हणे 'x x' मायबापा । भीशी काय माझ्या पापा ॥ ५ ॥

७

धन्य धन्य माझें पाप । तुज आणिल आपोआप ॥ १ ॥
माझ्या पालकांची रास । देवा पाडील इरेस ॥ २ ॥
" आजवरी थोरथोर । पायीं नेले पतित घोर ॥ ३ ॥
परि याचें पाप फार । पाहूं होतो ता उद्धार " ॥ ४ ॥
म्हणे 'x x' ऐशा भरीं । देवा याल माझ्या घरीं ॥ ५ ॥

८

नेघे देवा तुझ्या नांवा । तुझा माझा उभा दावा ॥ १ ॥
नामें उद्धरिले सारे । मीच एक राहिन बा रे ? ॥ २ ॥
तुझ्या नांबा गालबोट । सुकें खावे दांतओठ ॥ ३ ॥
पाहूं बोलविल्यावीण । हरी का ते माझा शीण ॥ ४॥
देवा तुझी घ्याया लाज ॥ 'x x' ठाकराते आज ॥ ५ ॥

९

काय महिमा नामांकित । आज दाखवा प्रचीत ॥ १ ॥
पूर्वी नांव झालें फार । नको त्याचा बडिवार ॥ २ ॥
दाविं मज प्रत्यय कंही । नको संतांची ग्वाही ॥ ३ ॥
देणेंघेणें हातोहात । उधारीची नाहीं बात ॥ ४ ॥
धन्य 'x x' भाग्यवंत । देवा तुझा पाही अंत ॥ ५ ॥

१०

काळयवनाच्या भेणें । दही पाण्यापोटी देणें ॥ १ ॥

धाकें आणि दैत्याच्याच । मोहिनीचा केला नाच ॥ २ ॥
काच बळीचा अगोदर । देवा झाला मूठभर ॥ ३ ॥
परि येतां पापें माझी । कुठें दडला देवाजी ? ॥ ४ ॥
म्हणे 'x x' धीटपाठ । येथें अस्सलाशीं गांठ ॥ ५ ॥

## निजलेल्या बालकवीस -

( माझे परमप्रिय मित्र रा. त्र्यंबक बापूजी ठोमरे-महाराष्ट्र रसवंतीचे रसाळ बांधव - 'आनंदीआनंद' करुन सोडणारे सुप्रसिद्ध बालकवि एकदां प्रात:काळ अतीत झाला तरी झोपेंतच गुंग होते; गद्यांत दोनतीनदां हांका मारुन फुकट गेल्यावर पुढील गीतवादानें त्यांना जागें केले, सदर पद्य फारच थोड्या वेळांत केलें असल्यामुळे बाल-कवींचें यथार्थ गुणवर्णन त्यांत कोठून सांपडणार ? त्यांच्या 'अरुण' व 'चौपडा' या दोन मुरलीगीतांचा प्रस्तुत गीतांत उडता उल्लेख केला आहे. )

जगद्‌गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ॥
तूंच निजसि तरि कोण सांग मग जागवील जगता? ॥ धृ. ॥
हा तुझा अरुण बघ उगवे पूर्वेकडे ॥
वद कोण तयाचें गाणें गाइल गडे ? ॥
हा देवद्वारीं चौघडाहि धडधडे ॥
करि कोण तुझ्याविण बोल तयाचे खडे ? ॥
तव कवनाची वाट पाहतीं पहा उगवतीं किरणें ॥
गाउनि गाणीं प्रेमळ त्या उल्हास तूंच रे देणें ॥ १ ॥

बघ सृष्टीचे कवि कसे भरारति गगनीं ॥
गातात कोणत्या स्वैर सुरांची गाणीं? ॥
चल एकजीव हो लौकर त्यांच्या गानीं ॥
स्वर्गांत सांग मग तेंच आमुच्या कानीं ॥
सौदर्यांची द्वाहि फिरविण्या बा तव अवतार ॥
मग ऊठ निजसि कां असा गड्या रे झोंप झालि फार ॥ २ ॥

बघ फुलें उमललीं आतां सारीं नवीं ॥
तव रसवंतीचीं फुलेंहि आम्हां हवीं ॥
तव रसाळ रसना-रससांगरिं जग झुलवी ॥
रस उधळुनि गगनीं लपल्या मुकुला खुलवीं ॥

नव्या सृष्टीच्या नव्या यशाचा तूंच शिलेदार ॥
नव कवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार ॥ ३ ॥

तव गान खळाला नेइल पुण्याकडे ॥
शिकवील यमाला, सदयत्वाचे धडे ॥
फत्तरांत वाजविल प्रेमाचे चौघडे ॥
नेईल सज्जना आनंदापलिकडे ॥
सूर खडा धर लावुनि गगनापलिकडे नक्की
करि पुढें खडा जगदीश देउनी प्रेमगांठ पक्की ॥ ४ ॥

---

भ्रमभरें विश्व हें सर्व जयांमधिं बुडें ॥
चल फोडुनि टाकूं ते फसवे बुडबुडे ॥

मग बस् जाउनी काळाच्याही पुढें ॥
तव सुराबरोबर कोण न यापरि उडे ? ॥
'गोविंदाग्रज' कविसि* तुजसवें ने देउनि हांता ॥
जगद्गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ॥ ५ ॥

*स्वत:कडे हा शब्द लावून घेतला याबद्दल उबदार हृदयांकडून क्षमा होईलच अशी आशा आहे.

## अरुण (दुसरा)

( रा. ठोमरे यांची 'अरुण' या नांवाची एक कोमल कविता आहे. ती ऐकून अगदीं निराळ्या दृष्टीनें प्रस्तुत कवितेंत अरुणाकडे पाहिलें आहे. त्याच गोड गीताचा या कवितेंत शेवटी उल्लेख केलेला आहे. यापूर्वीची या विषयावरील पहिली कविता रा. ठोमरे यांच्या वळणाची आहे. )

पहा फडकला पूर्वदिशेवर रक्तरंग कसला ? ॥
अरुण हाच का ? उषा हीच का ? सांगा कुणि मजला ॥
लालभडक दिग्भाग जाहला मोदें वा खेदें ॥
अनुरागाचा कीं रागाचा रंग नभीं कोंदे ?॥

विरहजागरण घडलें ज्यांना फार निशाकाली ॥
त्या नयनांची एकवटुनि का ये सारी लाली ? ॥
रजनीच्या सहवासें सृष्टिंत घडलें जें पाप ॥
होत असे का सृष्टिस आतां हा पश्चात्ताप ? ॥

किंवा कोमल बाला मेली तीव्र निराशांनी ?॥
हृदया फोडुनि तिच्या प्रीतिची लाट चढे गगनी ?॥
दुखावलेल्या जळणाऱ्या परि हताश हृदयांचे ॥
जे रागाचे, जे सूडाचे, वेत निराशेचे ... ॥
रात्रीं त्यांचे श्वास चालले मिटल्या डोळ्यांनी ॥
देवपदीं मग दाद मागण्या रिघती का गगनीं? ॥

आग लागली किंवा कोठें खालीं पाताळा ॥
उंच दूरवर काय भडकल्या तिच्या अशा ज्वाळा ?॥
निशापाप निजहृदयीं धरिलें अवकाशें म्हणूनी ॥
पूर्वा जळते पुण्यरवीच्या का पहिल्या किरणीं? ॥
अन्यायानें रक्त करपतां वाफ काय झाली ?॥

रक्तनिधिस त्या जग बुडवाया कीं भरती आली? ॥
मुक्याच इच्छा, आता झाल्या कोणाच्या खाक ॥
रागानें ही लाल जाहली का त्यांची राख ? ॥
दिनरजनींनी धडक मस्तकीं परस्परां बसली ॥
ही दिवसाच्या डोक्यावर का रक्ताची लाली? ॥
की रजनीची टिकल्यासाठी फाडुनि कांचोळी ॥
जरीपुराण्यासाठी केली तारांची होळी? ॥
रविकिरणांचे भाले शिरले आकाशापोटी ॥
रक्ताचें शिंपणे करी का जखम अशी मोठी? ॥
कीं पृथ्वीच्या पापश्वासें स्वर्गचि विरघळला ॥
निराधार रस जाउनि भिडतो आतां पाताळा? ॥
निशा संपवुनि दिन आणाया सकल देव आले ? ॥

रात्र चालवूं या बाण्यानें दैत्य पुढे झाले? ॥
त्या दोघांचे समर जुंपले पूर्व दिशाप्रांती ॥
हा रक्ताचा सडा फडकवि की त्याची ख्याति? ॥
मृत रात्रीची चिता उषा ही अरुणमया ज्वाला ॥
रविरुपानें प्राणगोल का हा वरतीं आला ? ॥

भ्रमण दिवसभर करुनी संध्यागमीं हा प्राण ॥
शिरतां होईल मृतरजनीचा पुनर्जन्म जाण ॥
मरण सकाळी; सायंकाळी जन्म पुन्हा घेई ॥
रजनी यापरि भयचक्रावर सदा फिरत राही ॥
फार विचारें कविकल्पकता अति भ्रांत झाली ॥
बालकवीचें 'अरुणगीत' तों मनीं उडी घाली ॥
जसा निवळवी रंग नभाचा अरुणतेज पार ॥
'अरुणगीत'ही भीषणतेचा जिरवी हुंकार ॥
वसुंधरेशी लग्न कराया सूर्य उत्तरंग ॥
ये अरुणाचें हें सोनेरी बांधुनि बाशिंग ? ॥
स्वर्भूसंगम त्या लग्नाचा शुभकर परिणाम ॥

पुण्यमया श्री-वसुधा होइल शुद्धप्रेमधाम ॥
दहा दिशांनो !जरा जराशा बाजूला सरका ॥
दिशा नवी द्या कायमची या अरुणचित्रफलका ॥
जगन्नायका ! असा एकदां काळ येउं द्याच ॥
निशा नको; दिन नको; असावा अरुण सारखाच ॥
लाल नभांतुनि होइल तेव्हा प्रेमाची वृष्टि ॥
'गोविंदाग्रज' गानिं रंगविल तीच प्रेमसृष्टि ॥

## एका बाल-कवीस

( १४ वर्षे वयाच्या एका बाल-कवीची श्रुतिमनोहर, बऱ्याच प्रमाणांत अर्थशून्य, तथापि प्रतिभापूरित, अतएव गोड कविता वाचल्यानंतर मनाला वाटलेला आनंद पुढील शब्दांत अवतीर्ण झाला आहे. )

गा रे गा रे गाच जरा ॥ माझ्या चिमण्या मुशाफरा ॥ धृ. ॥
ठराविकाला, नियमांला ॥ बंधाला जड जगताला ॥
जीव पहा त्रासुनि जाई ॥ नको नकोसें त्या होई ॥
करी जराशी बा घाई ॥ रिझवाया त्याला गाई ॥
गोजिरवाणें । अमोल गाणें । हृदयीं बाणे ॥
अस्पष्टाचा सोड झरा । झटपट पळल्या मुशाफरा ॥ १ ॥

आम्ही गातो जें गाणें ॥ तें जगताचें रडगाणें ॥
हृदयीं जो भरला त्रास ॥ तो कविताचरणीं प्रास ॥
शब्दापाठीं हपापले ॥ अर्थासाठीं जन टपले ॥
हृदय करपलें । रसहि हरपले । कवनचि खपलें ॥
गा तूं आतां गाच जरा ॥ रसगंगेच्या मुशाफरा ॥ २ ॥

नियमांनी झालों ठार ॥ ठराविकानें बेजार ॥
हा जगण्याचा बाजार ॥ सजीवतेचा आजार ॥
अमुच्या कवनाचा पूर ॥ मरत्या जीवाचा सूर ॥
परि तव कवनें । हलतां पवनें । भूलमिल भवनें ॥
त्या कवनाचा सूर खरा ॥ गा, बागडत्या मुशाफरा ॥ ३ ॥

स्वैरवृत्ति कवितादेवी ॥ बालवृत्ति तूही तेवीं ॥
ती सौंदर्याची छाया ॥ तव वदनींही ती माया ॥
गालावरती लाल मजा ॥ दावि प्रीतीच्या यशोध्वजा ॥

कवनचि रदनीं । कवनचि वदनीं। कवनचि नयनीं ॥
झुलवी खुलवी जीव जरा ॥ सुंदरतेच्या मुशाफरा ॥ ४ ॥

हृदयाचे घुंगुर गोड ॥ मन्मनिंचे हरितिल कोड ॥
हृदयाच्या हृदयीं खोल ॥ ओत कवनरस बिनमोल ॥
फुललें विश्वाचें फुल ॥ वर आकाशाची झल ॥
सुखदु:खांची । बाग जगाची । जरि कांट्यांची ॥
फुलांचाच तू धनी खरा ॥ फुलांत फिरत्या मुशाफरा ॥ ५ ॥
चिखल दाट हा जगताचा ॥ रुढीचा, निर्बंधाचा ॥
मग हृदयाचें कल्हार ॥ पवनजलावर अवतार ॥
घेत असे करुनी धीर ॥ तूंच तयाचा शाहीर ॥
त्यांतच राही । गुंगत कांही । दंग सदाही ।
गा हृत्कमलाच्या भ्रमरा ॥ मनातल्या तूं मुशाफरा ॥ ६ ॥

हिमवंतीच्या कणांपरी ॥ तव शब्दांची मजा खरी ॥
थेंब न बा ते पाण्याचे ॥ खडेहि किंवा स्फटिकाचे ॥
अस्फुट त्यांचा आकार ॥ वाऱ्यावर पळते स्वार ॥
अर्थ बोबडे । वेडे बगडे ॥ बोल ते गडे ॥
उडवी त्यांना भराभरा ॥ वाऱ्यावरच्या मुशाफरा ॥ ७ ॥

अर्थकल्पनांसाठिं गडे ॥ कां बघसी इकडे तिकडे ?॥
अर्थशब्द सोंगें सारी ॥ बडेजाव हा बाजारीं ॥
धांव न कसली धरि हांच ॥ धांवायासाठिंच धांव ॥
अर्थ मरु दे । शब्द खरुं दे ॥ काव्य झरुं दे ॥
परि भरुं दे नाद्‌भरा ॥ चुकल्या मुकल्या मुशाफरा ॥ ८ ॥

अर्थ कळेना जरी कुणा ॥ तरि तो नशिबाचाच उणा ॥
मार्ग कुणा का दावाया ॥ ढगांमध्ये चमके माया ? ॥
मूठ झांकली लाखाची ॥ उघडतांच कुचकामाची ॥
अस्फुट गाना भिरक्या ताना ॥ त्या घेतांना ॥
नाच बिजलिच्या धरुनि करा ॥ मेघावरच्या मुशाफरा ॥९ ॥

मुग्दपदिं घुंगुरवाळा ॥ गावाचा त्याला चाळा ॥
स्वैराचें बंधन त्याला ॥ खुला ताल त्या नाचाला ॥
रुमझुम् शब्दा अर्थ नसे ॥ थबथबती परि दिव्य रसें ॥
त्या स्वच्छंदा । त्या मकरंदा । त्या रसकंदा ॥
नाचूं दे कवनांत जरा॥ हृदयामधल्या मुशाफरा ॥ १० ॥

मार भरारी नभाकडे ॥ मेघावरती नाच गडे ॥
करि त्यांचे तुकडे तुकडे ॥ उडवी जग जिकडे तिकडे ॥
कविताजल जें चहूकडे ॥ पडतां आत्मा थंड पडे ॥
'पाउसपाणी । अभाळदाणी ।' इकडे आणी ॥
शांत करी ही वसुंधरा आकाशांतिल मुशाफरा ॥ ११ ॥

ऐकवि गगनाचें गान ॥ जीव तुझ्यावर कुरबान ॥
सूर सारखा लाव लढा ॥ दिव्य नाद करि पुढें खडा ॥
शब्दा शब्दा मुशाफरा ॥ जिवाचाच देईन हिरा ॥
जीव किरकिरा । फारच अधिरा । बहिरासहिरा ॥
करावया मंजुळ मुखरा ॥ गा गगनांतिल मुशाफरा ॥ १२ ॥

अवकाशाच्या पानबुड्या ॥ तरल जलीं जा टाक उड्या ॥
आनंदाच्या पलीकडे ॥ काय मजा मज सांग गडे ॥
अज्ञेयाच्या परतीरा ॥ नाचत नाचत जाच जरा ॥
तसा तरंगत । तसाच रंगत । नसतां संगत ॥
हात घाल जा परात्परा ॥ अवकाशांतिल मुशाफरा ॥ १३ ॥

विश्वाचीं अवघड कोडीं ॥ कवनाच्या मंत्रें सोडी ॥
स्वानंदाच्या पैलथडीं ॥ ब्रह्माची चल उकल घडी ॥
सर्वेच खाली पहा बरें ॥ जगास विसरुं नको बरें ॥
परात्पराचा । भवरा साचा । विस्मरणाचा ॥
नको सांपडू त्यांत जरा । स्वानंदाच्या मुशाफरा ॥ १४ ॥

परमात्म्याच्या भवऱ्यांत ॥ पडतां तूं गिरक्या खात ॥
त्या विस्मरणाची माती ॥ जमतां, मोरा तुजवरतीं ॥
फुंकर तीन्ही काळांचा ॥ मारुनि उडवूं थर वरचा ॥

झिम् झिम् मोरा । ये सामोरा । थोरापोरां ॥
वर न्याया कर देच खरा । चिरंतनाच्या मुशाफरा ॥ १५ ॥

थकतां मग कोमल काया ॥ घेत विसावा श्रम जाया ॥
विश्वकटाहावर पैस । पाय पसरुनी वा बैस ॥
शीळ वाजवुनि पवनांत ॥ समाधान मिळवी शांत ॥
तरि त्या स्थानीं । मधुनी मधुनी । रंगुनि कवनीं ॥
गा रे गा रे गाच जरा ॥ माझ्या चिमण्या मुशाफरा ॥ १६ ॥

# कवितेसाठी धडपड

बा वाग्विलासा !

कांही लिहावें तुझ्यासाठिं हा विचार मनिं धरुनी ॥
लेखनसाधन घेउनि रात्रीं पडलों निज शयनीं ॥
वाम करावर मस्तक ठेवुनि, लेखनि अन्य करीं ॥
विषय कोणता घ्यावा याचा विचार फार करीं ॥
काठी, जोडा, छत्री, टोपी, ताट, तवा, सगळीं ॥
पसंत न पडे परी एकही, सर्वां घालविलें ॥
श्रेष्ठ प्रतीच्या विषयास्तव मग मस्तक खाजविलें ॥
मूल, फूल, फळ, संध्या, रजनी, चंद्र, सूर्य, तरुणी ॥
समोर ठाके फौज अशी ही; रुचे न परि कोणी ॥
चर्वित चर्वण होईल, किंवा जुनी कल्पना ही ॥
''येउनि गेली कधींच ही तर, हींत मजा नाही ॥
संपादक टाकुनि देइल; ही न कुणास रुचे'' ॥
अशा प्रकारें त्रासुनि गेलों; मुळीं मना न सुचे ॥
विषय शोधितां यापरी कवना, नव आले नाकीं ॥
गुंग होउनी नादी मग मी उभय नेत्र झाकीं ॥
विचार करिंता फार यापरि तन्मय होवोनी ॥

विचारब्रह्मीं लीन जाहलों नेत्रद्वय मिटुनी ॥
जागृत होउनि, नेत्र उघडुनी पाहीं मी नादी ॥
तों कळलें कीं रात्र सरोनी उजाडलें अगदीं ॥
लेखनसाधन पाहुनि शयनीं नीट उठुनि बसलों ॥
तोंच होउनी स्मृति रात्रीची स्वत:शींच हंसलो ॥
कशाबशा मग लिहिल्या सत्वर ओळी या चार ॥
धाडित सांप्रत तुजसाठीं या; या तरि स्वीकार ॥

## पांखरास -

पंख उभारुनि जरा ॥ भरारा ॥ जा जा उडुनी जा पांखरा ॥
निकट तरुच्या शाखेवरतीं नको बसूं खगवरा ॥ पंख ... ॥
गानमिषानें उडवुं नको रे रम्य नादनिर्झरा ॥
सहवासें तव नव शोभा या खास येत तरुवरा ॥
सुरासुराची लकेर चढतां जलसा येतो भरा ॥
एक एक हा सूर हालवी हृदयाला थरथरां ॥
हिरवी पानें; निळ्या नभाचा वर डोल्हारा खरा ॥
रंगवि संध्या तरल ढगेंही, नाना रंगी खरा ॥
केला देवें या घुमटाचा सोनेरी पिंजरा ॥
विश्वाचे हें पवनहृदय ते चिरित जाति चरचरा ॥
खिन्न मनीं मम गाणें हें तव वर्षि हर्षनिर्भरा ॥
वाटे हृदयीं जिरवावा हा आनंदाचा झरा ॥
तन्मय होउनि विरुनि मिळावें चिन्मय मंगलतरा ॥
चढ्या लकेरीसरशीं जावें देवाजीच्या घरा ॥
सोबत घ्यावी तव पंखांची उडती पळती त्वरा ॥
क्षण-सहवासें जीव कोंडला होत असा बावरा ॥
परंतु सारा निर्धन मनिंचा स्वप्नभास हा खरा ॥
विषण्ण मानस; उदास जीवन; पीत निराशागरा ॥
हृदय तडफडें दु:खाग्नीनें मुकलें सुखसागरा ॥
चिरंमृताला गायन हें तव उगाच हलवि जरा ॥
चिरसहवासासाठीं परि मीं पसरितांच मम करा - ॥
उडुनी जाशिल भुर्रदिशिं गगनीं खालीं टाकुनि धरा ॥
विश्वगामि तूं चंचल लहरी पवनावर भोंवरा ॥
क्षणातं गिरक्या घेता घेतां जाशिल रे गरगरा ॥
दूर दूर तें पळतें गाणें करिल मनाचा चुरा ॥

मिळतां लघु सुख अधिक सुखाचा जीव सदा हावरा ॥
तीव्र निराशा होतां होइल फार कि रे घाबरा ॥
ऐकुं न येतां सूर भासभय चिरितिल मग अंतरा ॥
क्षणही माझ्यासाठीं न बसशिल तूं उडत्या पांखरा ॥

इकडे तिकडे फिरशिल टाकुनि येथे या पामरा ॥
जड, निर्जिव मी शोधुं कुठें तुज धरुनि तुझा धोसरा ॥
फुंकर एकचि सृष्टीचा तुज दूरवील खगवरा ॥
क्षणपरिचय हा अशा स्थितीहुनि फारच बरवा खरा ॥
अपूर्व ऐकुनि हर्ष जाहला तोच लाभ मज बरा ॥
सहवासांने प्रेम जडायापूर्विच पळ, करि त्वरा ॥
हेंच मागणें हात जोडुनि आनंदी पांखरा ॥ पंख ... ॥

## हाय हाय !

दिक्कालांनी, अज्ञातांनीं, बांधिताच पाय ॥
एकलकोंडें अनंत कविमन रडें धाय धाय ॥
वाहे वारा कसा भरारां, बातचक्र फिरतें ॥
नव्याजुन्या पानांचें विश्वचि तयांत गिरगिरतें ॥
कण धूळीचे उड्डनी जाती त्या वाऱ्यासंगे ॥
हाय ! हाय !परि ठायिच ठरती माझी जड अंगे ॥
या पृथ्वीचें आकर्षण हें मला तोडवेना ॥
पायांखाली जरी तुडवितो परी सोडवेना ॥
जर इवल्याशा वाऱ्यावर हें जग गिरक्या खात ॥
मला न उडवी कसा मनींचा हा झंझावात ?॥
हा वाऱ्याच्या दरिया पाहुनि तसेंच बसवेना ॥
परि पोहाया बघतां माझें अंगच हालेना ॥
वायुसागरावर फेनाचे थेंबचि शतधारा ॥
तशा उसळती वरती वरती लखलखत्या तारा ॥
किंवा वरुनी कुणि वाऱ्याची ही गंगा ओती ॥
नभोनिधीच्या उदरी उडवी हे पळते मोती ॥
दिसतां मज तीं हवी वाटतीं पुष्पें काळाचीं ॥
परी नयन इथुनीच टाकिती किरणें आशांची ॥
लाख तारका नभीं सहज या ठेविल्यांत देवा ॥
दोनच कां या नयनिं कोंडिल्या ? - त्याहि तिथें ठेवा ॥
मनांत माझ्या कुणीं गातसे नवलाचे सूर ॥
मलाच ऐकूं येति न; नुसती लागे हूरहूर ॥
माझें गाणें तें ऐकुनि मी व्हाया बेभान ॥
एकसारखा करितों माझ्या जीवाचा कान ॥
हाय हाय तें ऐकू येत न; झालों हैराण ॥

मलाच लागति तीव्र सुरांचे मनांतले बाण ॥
आग लागतां कुठें तेथुनी भटकतात ज्वाला ॥
वाऱ्यावरती पळतां पळतां भेटतात काळा ॥
किती भावना, किती श्वासही त्यांसह जातात ॥
हाय हाय कां मलाच त्या मग इथें टाकतात ? ॥
देवा अंतरिं आग भडकुनी जळून जाऊं दे ॥
त्या ज्वालामधि माझी ज्वाला मिसळून वाहूं दे ॥
मेघपृष्ठिवर चंद्रिका वर तेजा पाडी ॥
इथेंच राहुनि जीव बिचारा मना तिथें थोडी ॥
त्या तेजस्वी ओसाडीवर खेळे जों आशा ॥
पायांखाली कठिण भूमि तों बांधित निजपाशा ॥
हाय हाय त्या मेघांमधली एकादी बिजली ॥
जागी होइ न; त्यांची सारी सृष्टिच का निजली? ॥
कडकडुनी पडतांच तनूवर सुटेल हा जीव? ॥
हाय हाय परि कुणालाच कशि येईना कींव ? ॥
येतें कांही जातें कांही - मी नुसता बघतों ॥
कोणीं येतां जातां मोठ्या आशेनें उठतों ॥
उडल्या पंखांचा जीवाला लागतांच वारा ॥

तिथल्या तिथेंच हालचालिचा खेळ होत सारा ॥
शरीर माझें, जग हें माझें, परी जीव घेतें ॥
जिथें तिथें हें माझें मजला कसें आड येतें ॥
नको मला जें, दिसें न त्या जें, तसेंच नाहीं जें ॥
तें आणाया, तेंच बघाया जीव न हा लाजे ॥
(अपूर्ण)

## कळ्यांची फुलें कशी झाली ?

( ला बाइला. ही चाल-थोडा फेरफार करुन )

बाळ कुणी । संध्याकाळी रमे गुणी ॥
खेळतसे । बाळ अंगणी हवें तसें ॥
बागेंत । मौजेनें झोंके घेत ॥
तों दिसली ! सुंदरशी त्याला वेली ॥
देठ कोंवळे । हिरवे पिवळे । नाजुक सगळे ॥
ती वेलीं । हिरवा शालू पांघरली ॥ १ ॥

परी तया । हवा सोबती खेळाया ॥
खेळगडी। मूल फूल सुंदर जोडी ॥
पाहतसे। परि वेलीली मूल नसे ॥
तिच्या कळ्या । होत्या मिटलेल्या सगळ्या ॥
जणुं दमल्या । फार खेळुनी; मग निजल्या ॥
हवेंत डुलणें । हेंच खेळणें। खेळुनि निजणें ॥
ही त्यांची । गादी हिरव्या पानांची ॥२ ॥

बाळ गुणी । वाइट वाटे फार मनीं ॥
दिवसभरी । खेळुनि आला परत घरीं ॥
झोपेंत । कितिदां गेला बागेंत ॥
धीर कुठें? पहांट होता बाळ उठे ॥
बागेंत धाव तसाची तो घेत ॥
मौज तों किती । कळ्या न दिसती । फुलेंच हंसती ॥
बाळ डुले । चहूंकडे पाहून फुलें ॥ ३ ॥

आईला । शोधाया धांवत गेला ॥
मग बोले । ''आई ! बघ हीं गोड फुलें ॥
काल कळ्या । आज फुलें झाल्या सगळ्या ॥

कशा उमलल्या ? कुणीं हंसविल्या ? हांसत बसल्या ॥
कशा कळ्या? आई सांग मला, सगळ्या ?'' ॥ ४ ॥

मग आई । बाळाला उत्तर देई ॥
''खेळासी। जमति चांदण्या आकाशीं ॥
त्या हंसती । चहूंकडे पाहत बसती ॥
तों दिसल्या । कळ्या बिचाऱ्या हिरमुसल्या ॥
कळवळल्या । फार चांदण्या मग रडल्या ॥
आंसूं पडले । ते देव झाले । धांवत आले ॥
भुईवरी । पडले साऱ्या कळ्यावरी ॥ ५ ॥

तो साचा। रंग पांढरा तारांचा ॥
कळ्यांवरी । चहूकडे जाउनि पसरी ॥
मग हंसल्या। कळ्या फुलें हंसतां झाल्या'' ॥

सर्व असें । आई बाळा सांगतसे ॥
ऐकुनि हें । बाळ तिच्या वदना पाहे ॥
कां न कळे । मिठी मारिली तिला बळें ॥
त्या काळी । आई आनंदें हंसली ॥
हंसता रडली । असवें पडलीं । त्याच्या गालीं ॥
तों साची । कळी उमलली बाळाची ! ॥ ६ ॥

## चेंडू

खेळत होता बाळ आमुचा चेंडू घेवोनी ॥
पाहत होतों आम्ही दोघे आनंदे वरुनी ॥
अडगळ होती भंवती परि तो लक्ष्य न दे तिकडे ॥
हांसे, धांवे, खेळे, उडवी चेंडू चोंहिकडे ॥
तन्मय होऊनि खेळत होता यापरि स्वच्छंदे ॥
पाहत होतों आम्ही त्यातें तशाच आनंदें ॥
पाहि तिकडे कां न कळे तों हांसु येत मला ॥
परि तें कळुनी तिला तिच्याही खळी पडे गाला ॥
इतुक्यामध्ये चेंडु उडाला अडगळींत पडला ॥
बघे बाळ चहूंकडे जरी तरि मिळे न तो त्याला ॥
निराश झाला, थकुनी बसला, बाळ जरा रडला ॥
रडत रडतची फिरुनि लाडका लागे शोधाला ॥
लक्ष्य देउनी फार शोधितां अवचित सांपडला ॥
हंसत लाडका खेळामाजीं फिरुनी दंग झाला ॥
नि:श्वासाने सोडित मी हा प्रकार पाहोनी ॥
पाहे ती मजकडे वदे मी तन्मन जाणोनी ॥
खेळत आहों असेंच आपण अतीव आनंदें ॥
बागडतो हा चेंडु आपुला असाच स्वच्छंदें ॥
परि संसारी बहु दु:खांची अडगळ ही साच ॥
एके दिवशीं बाळहि जाइल चेंडुसारखाच ॥
रडत बसूं मग असेच आपण प्रिय बाळासाठी ॥
फिरुनि हंसूं का असेंच - परि छे; आशा ती खोटी ॥
तोंच वदे ती ''पुरे गडे, हें बोलूं नये असलें'' ॥
बघे मजकेड रागानें परि हसतहि प्रेमबळें ॥

पाहत होतों असेंच आम्ही कांही दिन जातां ॥
त्या दिवसाची स्मृति होऊनि ती भग्न करी चित्ता ॥
तशीच होती अडगळ सारी -चेंडुहि तो होता ॥
किती यमाची निष्ठुरता परि - बाळ तेथ नव्हता !॥
बघुनि वदे ती ''चेंडु हाच तो ! बाळ परी नाहीं'' ॥
परस्परातें मिठी घालुनी रडलों दोघेही ॥

## ये ये ये कवितें !

( एका रविवारीं कांही मित्रांना एक कविता देण्याचें ठरलें होते; मुदत सरत आली
पण कविताच सुचेना ! तेव्हां कवितेस हें पाचारण केलें होतें. )

ये ये ये, आतां ये कविते । नको छळू याहुनि मातें ॥ धृ. ॥
रसिक मित्र हे जमले भंवती रविवारहि गेला ॥
घटका घटका भरत चालली सरत वायदा आला ॥ १ ॥

पाहूं कोठें कविते तुजला; मूढासम झालों ॥
नेत्र मनाचे फाडुनि तुजला शोधाया मी झटलों ॥ २ ॥

गरगर गरगर नेत्र फिरति जणुं चंचलता फिरती ॥
तुज हुडकाया चंहूकडे कीं स्थाना सोडुनि निघती ॥ ३ ॥

ऊर धडधडे, हृदय मारि जणुं मुक्या मनाच्या हांका ॥
हृत्पटिं आत्मा नाचत थै थै हट्ट घेउनी तव का ? ॥ ४ ॥

काव्यशून्य देहाला विटला; ध्यास तुझा मोठा ॥
वायुरुप हा आत्मा श्वासें धांवत बारा वाटा ॥ ५ ॥

वस्तुवस्तुमधिं शोधुनिया तुज चित्त बिचारें दमतें ॥
काव्यहीन परि चित्र आपुलें जगदादर्शी बघतें ॥ ६ ॥

कोठें बससी ? कैशी अससी? केव्हां येसी कविते? ॥
ये ये, देतों मोबदला तुज वस्तु कोणती हवि ते ॥ ७ ॥

तारांमाजी चंचलता जी चमकदार लुकलुकते ॥
तीच अससि, तरि हृदयभेद करि पडुनी उल्कापातें ॥८ ॥

चंद्रमया जरि क्षयकालीं कुठें जरि तरी जी दडसी ॥
तीच, निर्दये ! हपापलेच्या या हृदयि न कां पडसी ? ॥ ९ ॥

रवींत असशिल तरि किरणांचे दोर सोडूनी खालीं ॥
नेत्रगवाक्षांतुनि आत्म्याच्या भरभर शीर महालीं ॥ १० ॥

फुलांत धरिशी सुगंधमय वा अदृश्यरुपा बरवी ॥
तरि वाऱ्याचा घोडा करि त्या हृदयरंगिं फिरवी ॥ ११ ॥

मेघमंडलीं जरि तूं बिजली; पड कडकडुनी माथीं ॥
नाद हवा जर नाचाया तर गडगडाट करि साथी ॥ १२ ॥
जरी पर्वतोदरीं दडालिस, तोंड तयांचें फोडी ॥
ही ज्वालेची लाट मानितों त्या रसिंही मी गोडी ॥ १३ ॥

स्त्री-हृदयीं जरि अससी तरि धरिं रस्ता या हृदयाचा ॥
नेत्रकिरणिं तुज पूर देत हा प्रेमाच्या तारांचा ॥ १४ ॥

हाय ! हाय ! कां येशि न अजुनी ? त्रिखंड धुंडुनि झालें ॥
तुजविरहित मम हृदयिं रमाया परब्रह्म बघ भ्यालें ॥ १५ ॥

अंध, मूढतम, शून्यवृत्ति मी मानवता पाही ॥
कुठली वस्तु कुठें टाकिते भान न तिजला कांही ॥ १६ ॥

देव दडविला दगडाखाली, भावा ज्ञानजलीं ॥
स्त्री-हृदयाला तसें दडपिलें सोन्या -मोत्याखाली ॥ १७ ॥

तीच राक्षसी मानवता तुज न कळे टाकी कोठे ॥
विषय तुझा हुडकावा कैसा ? कोडें पडलें मोठे ॥ १८ ॥

देवामाजी वससी तरि तो देव पसरला जगतीं ॥
तूच न दिसती कां मग, देवी? जीवन तुजविण जगती ॥१९ ॥

शून्यमाजीं रमसि साक्षसी शून्यवृत्ति अससी ॥
शून्यवृत्ति या मम हृदयीं मग कां नच वद तूं वससी ? ॥ २० ॥

(चाल ) तों नाद विलक्षण उठले ॥ हृदय मम भरलें ॥ चालही बदले ॥
खूण तों मनाला पटली ॥
कीं कवितादेवी हंसली ॥
जी सदाच या हृत्पटली ॥
अंतर्दृष्टिसि दिसली देवी, फार मला हंसली ॥
त्या हंसण्याचे नाद निघाले; तन्मयता जमली ॥ २१ ॥

हृदयचि भरलें कवनरसानें, उचंबळुनि आलें ॥
रुप अश्रुमय भरुनि काढितें नयनांचे प्याले ॥

कवनजलाचा ओघ चालला विश्व त्यांत न्हालें ॥
नीरसतेच्या मालिन्याचें नाम नष्ट झालें ॥
वस्तुवस्तुमधिं कवन दिसें मग गावें कवणाला ॥
भांबावुनि बहु जाई कवनीं गाई मीच मला ॥
हा हृदयवसंतचि भला ॥ काय बहरला । जीव उमलला ॥
हृदयाचा केला डोला ॥
कवितेनें आत्मा ओला ॥
त्यावरी बसुनि घे झोला ॥
खोला खोला हृदयपटा; घ्या कवितेचा पूर ॥
कवन भुवन हें कवनचि जीवन; प्या महापूर ॥ २२ ॥

## ‘वेषभूषा’ कारास सादरार्पित पद्यभूषा

रचिसि काव्यभूषा? अथवा कुसुमचापपाशा? ॥ धृ. ॥
मंजुल शब्दें गूढार्थानें, कविराया ! जें झांकी,
चित्रकाव्य तव पाहुनि ऐसें प्रश्न मना पडला कीं -
रचिसि ‘वेषभूषा’? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ १ ॥

मंजुल गुंजारवें रंजवी कुंज कुंजगत भृंग,
घालिसि कुंजमुखावरि रुंजी मृदुपदिं होउनि दंग,
रचिसि नादभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥२ ॥

शब्द तुझे व्यक्तार्थाखालीं दडविति मूकार्थातें,
गूढभाव लक्षितां लक्ष्य मम भलत्या वेडा वरितें.
रचिसि शब्दभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ३ ॥

सुवेषभूषा लेख्यमिषानें योषिदंतरंगा -
शब्दचित्रिं अव्यक्त रेखुनी हसविसि चित्तरंगा !
रचिसि चित्रभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ४ ॥

व्यक्त कल्पनांसह मम चित्ता प्रतिभा तव नेई,
अव्यक्ताच्या पटाआड त्या टाकुनि मागें येई.
रचिसि काव्यभूषा? अथवा कुसुमचापपाशा? ॥५ ॥

पद्यावलिंतिल पदपुष्पांच्या अर्थामोदानें
प्रीतीदेवता हृदयिं जागविसि उद्दीपनमोदानें,
रचिसि अर्थभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ६ ॥

अर्थ खरा हा कीं प्रतिबिंबा बिंब दावि तुजशीं,
निजार्थाच मन माझे तैसे पाहत काव्यादर्शी.
रचिसि गूढभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ७ ॥

सुंदरमणीवर्णनपर हें पद्य न मज भासे,
मजसम वेडा भ्रमी पडाया मद्यचि बाहे खासें !
रचिसि पद्यभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ८ ॥

( एका तरुणीस आपल्या बालकाचें चुंबन घेतांना पाहून - )

## उपजातिवृत्त

धवाननालोकनचुंबनातें ।
लज्जा, न आज्ञा जनिं देत तीनें, ॥
ही बालरुपा प्रतिमा तयाची ।
करोनि इच्छा पुरवी मनाची . ॥ १ ॥

# काय करावे?

( आचरटपणापलीकडे या ओव्यांची फारशी किंमत नाही.)
उन्हाळ्यासाठी पाणी न ठेवून । नदी वेगें जातां पळून ।
भक्कम दगडांचे धरण बांधून । तिला अडवितां येतसें ॥ १॥

अगदीं आपला नेम धरुन । तोफ सुटतां धडधडून ।
हळुच बाजूला सरुन । मारा चुकवितां येतसें. ॥ २ ॥

अंतराळी कडकडून। बीज घरावरि पडतां तुटून ।
उंच खांबांत बांधून । पाताळीं सोडितां येतसें ॥ ३ ॥

सावकारांनी वैर धरुन । जप्ती आणितां दावा करुन ।
मागील बाकी देऊन । तिला उठवितां येतसें ॥ ४ ॥

अगदीं नीट रोंख धरुन । म्हैस मार्गी येतां धांवून ।

एकदम छत्री उघडून । तिला पळवितां येतसें. ॥ ५ ॥

जुन्यानव्याची चोरी करुन । भिकार कवि येतां कविता घेऊन ।
कशी तरी एकदां वाचून । त्रास चुकवितां येतसें. ॥ ६ ॥

सर्वास उपाय येत दिसून । परि एक गोष्टिस आहे न्यून ।
तोंडाळ बायको कडकडून। येतां, काय करावे ? ॥ ७ ॥

## सत्सुम-दाम

### आर्या

ज्याच्या बोध-सुधेनें पावन झालें मदीय हीन मन ॥
श्री ज्ञानेश्वर-चरणीं प्रेमानें मी करीतसें नमन ॥ १ ॥

नमिला शिवरायगुरु परळीचा रामदास भक्तीमणी ॥
यत्पदकमलाधारें कालभयातें कधीं न विश्व गणी ॥ २ ॥

श्रीवर-कृपा जयावर श्रीवर ज्याचें न चित्त किमपी ही ॥
श्रीवरद-साधुवर्णी श्रीवरदा प्रणति एकनाथाहि ॥ ३ ॥

शशि भगणीं, मन करणीं, साधुजनीं तेचि हे तुकाराम ॥
तद्वचनपथक्रमणा त्यजुनि धरिल अन्य हेतु का 'राम'? ॥४ ॥

जरि यवन, कवनकरणीं स्मरणीं आणूं नको कबीर कसा ॥
भक्तिवधू धरि करि ज्या भगवज्जनकंकणांत हीरकसा ॥ ५ ॥

ज्या हीन हीन म्हणति प्रणति करिती सुमति ज्यास तो चोखा ॥
वंदावा न कसा म्यां ? इंद्रियहो तद्गुणाम्ररस चोखा ॥ ६ ॥

ज्यास्तव अंत्यज रुपा धरि हरि तो वंदिलाचि दामाजी ॥
कां थोरवी न द्यावी त्यातें म्यां कृपण देत दामाजी ॥ ७॥

यत्किंकर शंकरसख नमिला जगदेकविप्रवर नरसी ॥
तद्भक्तिदशमरस सुख देई जे दे कविप्रवर न रसीं ॥ ८ ॥

नमिला भक्तिरसाचें धाम श्रीनामदेव जरि शिंपी ॥
लोकीं काम्य न कां ती मोतिं जिच्या उदरिं कठिण वरि शिंपीं ? ॥ ९॥

मान्य कसा न मला हो गोरा जरि होय हीन कुंभार? ॥
भार जयाचा प्रभुवर वंद्य मला रोहिदास चांभार ॥ १० ॥

सत्सुमदामीं दासी म्हणुनि न गुंफावि कां जनाबाई ॥
अक्षरमालेंतुनि कशि वांकडि तरि टाकवे जना बा 'ई'? ॥ ११ ॥

दासी श्रीसुखदासीं आम्हांसी मायसी मिरादेवी ॥
सकरण तनु तच्चरणीं त्यजुनि नुतामान कां न कवि ठेवीं ? ॥ १२ ॥

वंदन नंद-सुनंदकुंद-सुकलिकालि तुलसिदासाला ॥
मज्जन्मग्रामस्था साधुवरा नमन टेलदासाला ॥ १३ ॥
वंदि विवेकानंदा जरि अर्वाचीन मान्य साधु सदा ॥
कुमतप्रस्तर दूरवुनि वाहविलें जगतिं आर्यधर्मनदा ॥ १४ ॥

हीं षोडश कुसुमें निजवासें निशिदिनिं करोत शुद्ध मला ।.
वंदुनि अर्पी 'सत्सुमदास' विनत 'राम' ईशपदकमला ॥ १५ ॥

## लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद !

(लो. टिळक स्वराज्याच्या मागणीसाठी इंग्लंडास गेले त्या दिवसाकरिता )

(चाल : चन्द्रकांत )

अमृतसिद्धि हा योग मंगलचि जग सगळे गाय ॥
''महाभाग जन ! सुखं गम्यतां पुनर्दर्शनाय ॥''
जें जें नश्वर गेलें निघुनी काळाच्या पाठी ॥
अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठी ॥
अंधाराची वाट कंठिली फिरलों संकष्टी ॥
चार युगांची रात्र भोगिली यी दिवसासाठी ॥
रोज उगवला, रोज परतला, होउनि बहु कष्टी ॥
आनंदे रवि आज उगवला या दिवसासाठी ॥
दक्षिणसागार होउनि घटिकापात्र निरभिमान ॥
मोजित होता या दिवसांचे मंगल घटिमान ॥
पहिला पहिला किरण पहाया या शुभ दिवसाचा ॥
गंगासिंधू धांवत होत्या आंदोलित हृदया ॥
या दिवसाच्या या सूर्याला अर्घ्योदक द्याया ॥
स्वस्ति वाचना सिंहगडावर चढला गगनांत ॥
थरथरुनी श्री तानाजीचा तो तुटका हात ॥
मंगल हृदया बघे पांचही करुनि प्राण गोळा ॥
पंजाबी सिंहाचा दुसरा फुटकाही डोळा ॥

व्यासवाल्मिकीकालिदास कवि आळवीत बसले ॥
या दिवसाच्या भूपाळीस्तव वाङ्मय ते तसलें ॥
योगिवृंदगिरिकंदरि बसुनि लावूनि अवधान ॥
पाहत होते या दिवसाचें चिन्मंगल ध्यान ॥
आर्यभट्ट मिहिरादि काढुनी गगनाचा ठाव ॥
हुडकित होते या दिवसाचें चिन्मंगल ध्यान ॥
आर्यभट्ट मिहिरादि काढुनी गगनाचा ठाव ॥
हुडकित होते या दिवसाचें एकरास नांव ॥
सोरठचा श्री सोमनाथही या दिवसासाठीं ॥
पडे त्रिस्थळीं फुटुनि लागतां महंमदी काठी ॥
तिष्ठत अठ्ठावीस युगांवर भीमेच्या कांठी ॥
खडा पहारा पांडुरंग करि या दिवसासाठीं ॥
अठरा पद्मे सेना योजुनि जलधीच्या पाठीं ।.
श्रीरामांनी सेतु जोडिला या दिवसासाठी ॥
अठरा अध्यायांची गीता एक मुक्तकंठी ॥
रणीं गाइली श्रीकृष्णांनी या दिवसासाठीं ॥
फितुरगडावर आग लागली या दिवसासाठीं।
पानपतावर रक्त सांडलें या दिवसासाठीं ॥
पोट बांधुनी वेद राखिले सरस्वतीकांठी ॥
पुण्याई ती सर्वहि केवळ या दिवसासाठीं ॥
जन्मा येतो बाळ टिळकहि या दिवसासाठीं ॥
जन्मति श्रीमान् पंचम जॉर्जहि या दिवसासाठीं ॥

तहनाम्यावर सही घालितां करि खालीं मान ॥
दुसरा बाजीराव बघे वर धरुनी अभिमान ॥

न लगे दौलत, न लगे बरकत, नको कोहिनूर ॥
स्वदेश न लगे स्वराज्य न लगे हो सर्वहि चूर ॥
एक सांगणें एक मागणें तेंच लाखबार ॥
'' मागुनि घ्यावी श्रीशिवबांची भवानि तलवार ॥
स्वदेशभूषा, स्वराज्यजननी सकाळें दाखवावी ॥
दावित दावित सौभाग्यश्री स्वदेशिं आणावी ॥

चहुं मुलखांतुनि नव खंडांतुनि मिरवित आणावी ।।
रायगडावर समाधिची मग पूजा बांधावी '' ।।
म्हणेल जो तो ऐन जिवाचा देशभक्त कट्टा ।।
सर्वस्वाचा ताम्रपटचि तो, तोच अमरपट्टा ।।
(अपूर्ण)

## पांच देवीचा पाळणा

(हरएक रियासतीच्या राखणीसाठीं कोणतें तरी एक जागृत दैवत असतें. इंग्रजी वाचकांना माहीत आहेच कीं, इंग्लंडभोंवती सेंट जॉर्ज स्कॉटलंडभोंवती सेंट अँड्र्यूज, आणि आयर्लंडभोंवती सेंट पॅट्रिक जागत्या डोळ्यांनी नेहमी पहारा करीत असतात. मराठेशाहीला अशा पांच देवी संरक्षक होत्या ! तुळजापूरची तुळजाई, सातारची मंगळाई, प्रताप -गडची भवानी आई, पुण्याची पर्वती, आणि पाराची वरदायी, - हीं तीं पांच पवित्र नांवें ! या देवींनीं शिवनेरीच्या बाळाला निजविण्यासाठी हा पाळणा श्रीजिजाऊसाहेबांच्या मुखानें म्हटलेला आहे. इतिहास कल्पनेनें आधी पाहण्याची कल्पना रामाकाळची पुराणी आहे हे सर्वांस ठाऊक आहेच.

(चाल-अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला.)

गुणि बाळ असा जागसि कां रे वायां? ।। नीज रे नीज शिवराया ।। धृ. ।।
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ।। तरि डोळा लागत नाहीं ।।
हा चालतसे चाळा एकच असला ।। तिळ उसंत नाहिं जिवाला ।।
निजवायाला हरला सर्व उपाय ।। जागाच तरी शिवराय ।।
चालेल जागता चटका ।
हा असाच घटका घटका ।
कुरवाळा किंवा हटका ।
हा कष्टविशी तुझी सांवळी काया ? ।। नीज रे नीज शिवराया ।। १ ।।

ही शांत निजे वारा मावळ थेट ।। शिवनेरी जुन्नरपेठ ।।

त्या निजल्या ना तशाच घांटाखाली ॥ कोंकणच्या चवदा ताली ॥
ये भिववाया बागुल तो बघ बाळा ॥ किती बाई काळा काळा !॥
इकडे हे सिद्दि-जमान ।
तो तिकडे अफजुलखान ।
पलिकडे मुलुखमैदान ।
हे आले रे तुजला बाळ धराया ॥ नीज रे नीज शिवराया ! ॥ २ ॥

(अपूर्ण)

## कारंजाचे चढते पाणी

यंत्रबंधनी तिर्थजलानें अवरोधुनि यापरी
चढविता, सांगा, कां हो बरी ?
प्रवहण भूपृष्ठावर ज्याचा सहजधर्म हा असे
स्वर्गी चढेल कां तें असें ?
क्षणैक चढलें तरी निदानीं मातीवरती पडें;
होइल चिखल मात्र चहुंकडे !
पाट बांधुनी मार्ग सुगम त्या करुनी दिधला जरी
जगतिल माळ मळे किती तरी !
कारंजाचें चढतें पाणी पडतां खालीं असें
उदास ''गोविंदाग्रज'' हंसे !

## प्रेमशोधन

कोणी एक कवि स्वकीय हृदया घेऊन आहिंडत ॥
प्रेमाचा करि शोध जें जगिं जना कष्टाविना लाभत ॥
विश्वाचें अति गूढ भाग धुंडुनि बघे ज्ञानाप्रति वास्तव ॥
होता प्राणहि द्यावया विनिमयें तो शुद्ध प्रेमास्तव ॥

(अपूर्ण)

# गाणे चांगले कसे असावे ?

संगीताची करी योजना विधि का जगतींत ॥
हेंच कळेना पामर जीवा; हृदयिं न संगति ज्यांत ॥
भिन्नभिन्न हृदयांत भाव जे शब्दां पर असती ॥
संगीताच्या नादावरि ते बाहेरी येती ॥
पशूस मोही गीतध्वनि ही दंतकथा नच कांही ॥
पशु-मानव यांमधील सांधा ती जमवी पाहीं ॥

(अपूर्ण)

# काव्याची व्याख्या

शब्दांमध्यें, अर्थांमध्ये प्रासामध्यें काव्य नसे ।
नानारंगी वस्तूंतहि नच सौंदर्याचा लेख वसे ॥
सिंहाचें बळ अफाट म्हणजे शौर्याचें तें स्थानच कां ? ।
गोड सुरावट वेळू करिती; गाणें त्याला म्हणू नका ॥
उंची इमला शिल्प दाखविल; शोभा म्हणजे काव्य नव्हे ।
काव्य कराया जित्या जिवाचें जातिवंत करणेंच हवें ! ॥
काव्याची रचना नसे कठिण ही, अर्थास लागे कवि ।
आलीं वक्र जरी प्रकाशकिरणें तेजास दावी रवि ॥
अर्थावाचुनि बोल सुंदर जरी शोभा न त्यातें असे ।
शृंगारुनि उगाच प्रेत, परि तें जीवंत का होतसे ? ॥ १ ॥

(अपूर्ण)

# समशेर दुधारी दिसता*

(पद, चाल - उद्धचा शांतवन कर.....)

समशेर दुधारी दिसतां । कां भीसी ऐसा का रे ? ॥
मरणाची मिळकत लोंकीं । तूं मी हें विश्वचि सारें ॥
या कीं त्या धारेवरती । मरणाचें लागे या रे ।.

॥चाल॥ जरि शेवट एकचि साचा ॥
मग वृधा वाद दोघांचा ॥
कोणीही कोठें नाचा ॥
तो नाच जरि प्रेमाचा !
प्रेमांतचि होवो कांही । मग वादचि राहत नाही ॥ १ ॥

*ही कविता रा. के.मा. सोनाळकर यांच्या ''दैत की अद्वैत'' या कवितेस अनुलक्षून लिहिली होती.

## गुलाबाच्या पाकळ्या

मैना भटके वनांत । वेडा राघू झुरतो मनांत ॥ धु. ॥
विस्कळले पर, पिसें विखुरलीं, गळले दोन्ही पांख ॥
अखंड झरणी झुळझुळ लाविर्तिं अरधे उघडे आंख ॥ १ ॥
हालचालही ठरली सारी-कुठलें चारापाणी? ॥
बसल्या ठायीं खिळून बसला चित्र रेखिल्यावाणी ॥ २ ॥
घुमे पारवा इकडे, तिकडे त्या घुबडाला घू घू ।.
जित्या जिवाची समाध बांधुनि मधेच बसला राघू ॥ ३ ॥
(अपूर्ण)

## दिवाळी

जी दु:खी कष्टी जीवां दुसरी माता ।
वाढत्या वयांतहि लोभ जिचा नच सरता ॥
त्या निद्रादेवीच्या मी मांडीवरती ।
शिर ठेउनि पडलों घ्यावया विश्रांति ॥
भोगितां या परि शांती । दिव्य ती ।
निजतात जगाचीं नातीं । जागतीं ॥
जाळत्या मनाच्या वाती । लोपती ।
धडधडां भोंवती तोंच फटाके उडती ।
मी जागा होउनि पाहत बसलों पुढतीं ॥
तों कळे उगवला आज दिवस वर्षाचा ।
वर्षाव जगावर करीत जो हर्षाचा ॥ १ ॥

ही जुनी दिवाळी नव्या दमानें आली ।
ही नवी टवटवी जुन्या जगाच्या गालीं ॥
या नव्याजुन्याच्या मंगल संगमकालीं ।
जगिं आनंदीआनंद झूल जणुं घाली ॥
चहूंकडे दिवे हे; दिवेच वरतीं खालीं ।
स्वर्गीय अग्नितेजानें जगतीं न्हाली ॥
    काढिलें फोल विश्वाचें । चाळुनी ।
    या रसांत नव तेजाचें । जाळुनी ।
    ढीगच्या ढीग हीणाचे । गाळुनी ।
    सत्त्वाचे बावनकशीच सोने सारें ।
    ठेविलें करा रे लक्ष्मीपूजन या रे ॥ २ ॥

ही त्रयोदशी धन पूजायाला असलें ।
काढिलें जुन्यांतुनि नवें मनीं जें ठसलें ॥
जरि घरोंघरी नव धन हें हांसत बसलें ।
नच परवा जरि लेणें जुनेंच असलें नसलें ॥
    ती लेणीं गतकाळाचीं । सर्वही ।
    टाकिते गिळुनियां साची । जणुं मही ।
    उघडते नव्या खात्याची । ही वही ।
जी झरली खरली शोभा वर्षाजालीं ।
ती पुन्हा लागली ल्याया सृष्टी सगळी ॥ ३ ॥

पालवी पळाली कधींच मधुमासाची ।
धुंदीही नाही आतां वर्षावाची ।
तरि साधीभोळी माता देवी सरला ।
हें तत्त्व शिकविते चुकल्या मुकल्या बाळा ॥
    जें जुनें फार उपयोगें । जाहलें ।
    त्यांतुनी आपुल्या जोगे । जें भलें ।

रंगवा नव्या नवरंगे । चांगलें ।
प्रतिवर्ष नव्याला जन्म जुन्यांतुनि देई ।
होळींत जाळितां शिशिर, वसंतचि येई ॥ ४ ॥

अति निर्मल जलयुत श्यानपुलिन सरिता या ।
घनदाट तमांतुनि चिमणासा शशिराया ॥
जें काल पेरिलें तेव्हां वाटे गेलें ।
तें आज पिकाला आलें शतपट झालें ।

(अपूर्ण)

## लक्ष्मीपूजन

ही सरती संध्या या सालाची जमली।
तिजसवें दिवाळी ऐन भराला आली ।.
जनमनें उजळली; आनंदाने हंसती ।
प्रतिबिंबदर्शना लाख लाविल्या वाती ॥
नवनव्या परीचे दिवे भिन्न रंगाचे ।
मांडिलें प्रदर्शन तेजोमय सौंदर्याचें ॥
(अपूर्ण)

## पानपतचा फटका

(चाल: भल्या माणसा, दसलाखाची.)
कौरव -पांडव-संगर-तांडव द्वापर-काली होय अती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपती ॥ धृ. ॥
जासुद आला कथी पुण्याला - ''शिंदा दत्ताजी पडला;
कुतुबशहानें शिर चरणानें उडवुनि तो अपमानियला ।''
भारतवीरा वृत्त ऐकतां कोप अनावर येत महा
रागें भाऊ बोले, ''जाऊ हिंदुस्थाना, नीट पहा.
'काळा' शी घनयुद्ध करुं मग अबदल्लीची काय कथा ?
दत्ताजीचा सूड न घेतां जन्म आमुचा खरा वृथा.''
बोले नाना, ''युक्ती नाना करुनी यवना ठार करा;
शिंद्यांचा अपमान नसे हा; असे मराठ्या बोला खरा.''

उद्‌गीरचा वीर निघाला; घाला हिंदुस्थानाला;
जमाव झाला; तुंबळ भरला सेनासागर त्या काळा.
तीन लक्ष दळ भय कराया यवनाधीशा चालतसे;
वृद्ध बाल ते केवळ उरले तरुण निघाले वीररसें.
होळकराचे भाले साचे, जनकोजीचे वीर गडी,
गायकवाडी वीर अघाडी एकावरती एक कडी.
समशेराची समशेर न ती म्यानामध्यें धीर धरी;
महादजीची बिजली साची बिजलीवरती ताण करी.
निघे भोसले पवार चाले बुंदेल्यांची त्वरा खरी;
धीर गारदी न करी गरदी नीटनेटकी चाल करी.
मेहेंदळे अति जळी अंतरी विंचुरकरही त्याचपरी;
नारोशंकर, सखाराम हरि, सूड घ्यावया अशी धरी.
अन्य वीर हे किती निघाले गणना त्यांची कशी करा ?
जितका हिंदू तितका जाई धीर उरेना जरा नरां.
भाऊ सेनापती चालती विश्वासातें घेति सवें,
सूड ! सूड !! मनिं सूड दिसे त्या सूडासाठी जाति जवें.
वीररसाची दीप्ती साची वीरमुखांवर तदा दिसे;
या राष्ट्राचे स्वातंत्र्याचे दृढस्तंभ ते निघति असे.
वानर राक्षस पूर्वी लढले जसे सुवेलाद्रीवरती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपती ॥ कौ. १ ॥

(२)

जमले यापरि पानपतावरि- राष्ट्रसभा जणुं दुसरि दिसे;
वीर वीरमदयुक्त सभासद सेनानायक प्रतिनिधिसें.
अध्यक्ष नेमिले दक्ष भाउ अरि भक्ष कराया तक्षकसे;
प्रतिपक्षखंडना स्वममंडना; तंबू ठोकिती मंडपसे.
शस्त्रशब्द हीं सुरस भाषणें सभेंत करिती आवेशें;
रणभूमीचा कागद पसरुनि ठराव लिहिती रक्तरसें.
एका कार्या जमति सभा या, कृति दोघींची भिन्न किती !
बघतां नयनीं वाहतीलची पूर अश्रूंचे स्वैरमति
पूर्ववीरबल करांत राहे, आहे सांप्रत मुखामधी;
हाय ! तयांचे वंशज साचे असुनी झालों असे कुधी !
जमले यापरि पानपतावरि भारतसुंदरिपुत्र गुणी
युद्ध कराया, रिपु शिक्षाया, संरक्षाया यशा रणी ॥ कौ. २ ॥

(३)

अडदांड यवन रणमंडपिं जमले; युद्धकांड येथोनि सुरु.
करिती निश्चय उभयवीर रणधीर '' मारुं वा रणीं मरुं''
पुढें पडे दुष्काळ चमूंमधि अन्न व खाया वीरांना;
म्हणती, ''अन्नावांचुनि मरण्यापेक्षा जाऊं चला रणा.''
मग सेनेनें एक दिलानें निश्चय केला लढण्याचा;
स्वस्थ होळकर मात्र नीचतर पगडभाई तो यवनांचा.
परधान्यहरणमिष करुनि रणांगणि पढले आधीं बुंदेले;
श्रीशिवराया युद्ध पहाया हांक द्यावया कीं गेले ?
धन्य मराठे ! धन्य यवन ते रणांगणांमधिं लढणारे !
आम्ही त्यांचे वंशज केवळ हक्कांसाठी रडणारे
आवेश प्रवेशे दोन्ही सैन्यामधें कराया युद्धखळी;
परि स्वार्थ अनिवार मार दे, आर्यजनांमधि करि दुफळी.
आर्यजनांचें दैवहि नाचे अभिमानाचें रुप धरी;
करि वसति मनिं सदाशिवाच्या; होय अमुच्या उरा सुरी.
सुरासुरी जणुं डाव मांडिला बुद्धिबळाचा भूमिवरी;
परि दुर्दैवें वेळ साधिली प्यादीं आलीं अम्हांवरी !
कलह माजला, झालि यादवी, नवीन संकट ओढवले;
कारस्थानीं हिंदुस्थाना व्यापुनि पूर्णचि नागविले .
कुणि यवनांचा बाप जाहला, ताप तयाचा हरावया,
नवा सोडुनी जया दवडुनी कुणीं लाविल डाग वया.
कुणि दिल्लीची वाहि काळजी, कोणी तख्तासाठिं झुरे;
कुणा लागला ध्यास प्रीतिचा विचार सारासारिं नुरे.
''लालन लालन !'' करि कुणि, साधी मर्जीनेची कुणि मरजी;
असे घसरले, साफ विसरले युद्धरीती अति खडतर जी.
गारदीच मज माफ रुचे जरि यवन न सोडी विश्वासा;
निजबंधूंची करणी ऐकूनि सोडिं, वाचका, नि:श्वासा !
कलहा करिती काय विसरती क्षुद्र वस्तुच्या अभिमानें,
जसे हल्लिंचे लोक तोकसम कलहा करिती नेमानें,
नेमानेमाच्या या गोष्टी कष्टी होतें मन श्रवणीं
असो; बुडाली एकी, बेकी राज्य चालवी वीरगणीं
सरदारांच्या बुद्धिमंदिरा आग लागी कलहाची
शिपाइभाई परि नच चळले; रीति सोडिली न मर्दाची.
नाहीं लढले, लढणारहि नच कुणी पुनरपि या जगती;

तसे मराठे गिलचे मोठे कलिंत लढले पानपती ॥ कौ. ॥ ३ ॥

(४)

एके दिवशी रवि अस्ताशी जातां झाला विचार हा -
'' प्रात:काली स्मरुनी काली युद्ध करुं धनदाट महा.''
निरोप गेला बदशहाला, '' युद्ध कराया उद्यां चला;
समरांत मरा वा कीर्ति वरा जय मिळवुनि आम्हांवरि अचला.''
सकल यामिन आर्यवाहिनी करी तयारी लढण्याची;
वीरश्रीचा कळस जाहला परवा न कुणा मरणाची .
परस्परांतें धीर मराठे गोष्टि सांगती युद्धांच्या ,
वीरश्रीच्या शस्त्रकलेच्या जयाजयांच्या अश्वांच्या.
बोले कोणी, '' माझा न गणी वंशचि मृत्यूभयासिं कधी;
आजा, पपजा, बापहि माझा पडला मेला रणामधीं.
बापसवाई बेटा होई खोटा होइल नेम कसा?
पोटासाठी लढाइ नच परि मान मिळविण्या हवा तसा !''
कुणी धरी तलवार करीं तिस पाहुनि आनंदें डोले,
फिरवी गरगर करि खालीं वर वीर मराठा मग बोले -
''अफाट वाढीची ही बेटी मोठी झाली लग्नाला
प्राणधनाचें द्याज घेउनी उद्यांच देइन यवनाला.''
अशी चालली गडबड सगळी निद्रा कोण नच आली;
कोठें गेली अशी पळाली रात्र न कोणाला कळली.
प्रभातरुपें ईर्षा आली; भीति पळाली निशामिषें;
भय मरणाचे कैचें त्यांना ? काय करावें हरा विषे ?
शिंग वाजलें संगरसूचक कूच कराया मिळे मुभा;
धांवति नरवर समरभूमिवर; राहे धनगर दूर उभा
हटवायातें देशदरिद्रा मुखा हरिद्रा लावुनिया,
कीर्तिवधूतते जाति वराया समरमंडपीं धांवुनिया.
शहावलीचा हलीसारखा अताइ नामा पुत्र बली
यवनदलीं मुख्यत्व घेत कीं पापावलिमधिं जसा कली,
प्रणव जसा वेदांस सदाशिव तसा आर्यबलसेनानी;
विश्वासातें पाहुनि वदनीं अंगुलि घातलि यवनांनी.
आले यापरि रणभूमीवरि; जसे जात कवि यापुढतीं
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ. ॥ ४ ॥

(५)

वाढे जैसा दिवस, वाढलें युद्ध तसें अतिनिकरानें
हातघाइला लढाइ आली; अंबर भरलें नादानें.
उभय वीरवर गर्जति 'हरहर', 'अल्ला अकबर' उल्हासें;
भासे आला प्रळय; यमाला दिली मोकळिक जगदीशें.
अश्ववीरगज भक्तमंडळी गोंधळ भारतदेवीचा;
तलवारींच्या दिवट्या केल्या; सडा घातला रक्ताचा.
धूळ उडाली गुलाल झाली; ''उदे'' गर्जती भक्तबळी,
परस्परांचे बळी अर्पिती भूमि तर्पिती शिरकमळी,
रणवाद्य भंयकर भराड वाजे शुद्ध न कोणी देहाची;
रणमदमदिरामत्त जाहले, हले फणाही शेषाची.
मनुजेंद्रयरा जणुं अंत न उरला देवेंद्राची नच परवा
म्हणुनि धूलिकण नभीं धाडुनी मेघसंघ कीं रचिति नवा ?
रक्तपाट अतिदाट वाहती घाट बांधिले अस्थीचे;
मृतगजतुरंग मकर खेळती कृत्य अगाधचि वीरांचें.
घोर कर्म हें बघुनी वाटे रविहि धरी निजसदनपथा;
कांपे थरथर स्थीर न क्षणभर; इतरांची मग काय कथा !
यापरि चाले लढाइ; भ्याले दाढीवाले, मग हटले;
पळती, धांवति सैरावैरा; आर्यवीर त्यांवरि उठले.
आर्यजनां आवेश नावरे; भरे कांपरें यवनाला;
म्हणति '' मिळला जय हिंदूला लढाइ आली अंताला !''
तोंच अताई दूरदृष्टिचा धीर देत निजसैन्याला,
स्वयें धांवला, पुढें जाहला, स्फूर्ति पुन्हां ये यवनाला.
त्वरित पूर्ववत् समर चाललें, हले भरंवसा विजयाचा;
दाढी शेंडी एक जाहली खेळ शहाच्या दैवाचा.
करी अताई जबर लढाई नाहीं उपमा शौर्याला;
त्यावरि ये विश्वास, भासलें कीं खानाचा यम आला !
विश्वासानें अतिअवसानें खान पाडिला भूमिवरी
करिवरचरणीं मरण तया ये, शरश एक मग यमनगरी,
धीर सोडिती पीर शहाचे पळती आवरती न कुणा;
शहावलीची कमाल झाली यत्न तयाचा पडे उणा.
पहात होता शहा खेळ हा दुरुनी, तोही घाबरला,
म्हणे, ''करावें काय? न ठावें !'' दैव हात दे परि त्याला.
दक्ष वीर लक्षैकधीर तनुरक्षक सेनेसह धावे;
म्हणे चमूला, ''पळति यवन ये कंठ तयांचे छेदावे.''

पुन्हा उलटले यवन लढाया हुकुम ऐकतां छेदावे.''
शहा तयातें सहाय होतां मारा करितो जोराचा.
जसे लढावे वीर संगरीं कविज्ञन इच्छा मनिं करिती,
तसे मराठे गिलचे याचे कलींत लढलें पानपती ॥ कौ. ॥ ५ ॥

(६)

नभोमध्यगत सूर्य होत मग युद्धहि आलें मध्याला;
हाय ! हाय ! या आर्यभूमिचा भाग्यसूर्य तो शेवटला !
सदा अम्हांला विजय मिळावा, प्रताप गावा जगतानें !
सदाशिवाचा उजवा बाहू राहु रिपुस्त्रीमुखविधुचा,
बाऊ केवळ म्लेंच्छजनांचा, भाऊ माधवरायाचा,
बेटा ब्राह्मण बादशहाचा; पेटा साचा वाघाचा,
वीरफुलांतील गुलाबगोटा, वाली मोठा धर्माचा,
ताण जयाची द्रौणीवर उद्राण आणितां आर्याला,
विजयाचा विश्वास असा विश्वास - लागला शर त्याला !
मर्म हाणि तो वर्मी लागे कर्म आमुचें ओढवलें;
धर्म-सभेला आत्मा गेला, धर्मवधूकरिं शव पडलें.
अश्रू नयनीं आणि लक्ष्मी प्रिय भार्या त्या आर्याची;
उत्तरे चर्या, अघा न मर्या, परि ये स्मृति तिस कार्याची.
करी विचारा वीराचारा दारा वीराची स्वमनीं -
'' नाथघात सैन्यांत समजतां धीर उरेल न आर्यजनीं. ''
छातीचा करि कोट, लोटिला दुःखलोट अनिवार जरी,
नीट बैसवी प्रेता देवी धुनष्य त्याच्या दिलें करी.
धन्य सती ती ! धन्य तिचा पति ! धन्यचि जननीजनकाला !
धन्य कवीचें भाग्य असे या म्हणुनि मिळे हें गायाला !
परि जें घडलें लपले कुठलें ? वेग फार दुर्वार्तेला;
अल्पचि काळें भाउस कळलें - '' गिळिलें काळानें बाळा !''
'' हाय लाडक्या ! काय कृत्य हें ? घाय काय हा भान करी
गोंडस बाळा, तोंड पुण्याला दावुं कसें ? कथिं तोड तरी, ''
असा करी ती शोक ऐकुनी दुःख जाहलें सकळांला
अश्वावरती स्वार जाहला भाऊराया मरण्याला.
व्यंग समजतां भंग कराया आर्याच्या चतुरंग बळा
सिद्ध जाहला शहा; तयाला देवानें आधार दिला.
फिरति मराठे आला वाटे अंत शिवाजीराज्याला;
भाऊराया योजि उपाया - तोही वायां परि गेला.

मान सोडिला, साम जोडिला; दूत धाडिला होळकरा;
प्रसंग येता मत किंकरा धनी जोडिती असे करां.
दूर निघाला. सत्वर आला, होळकरांला नमन करी;
म्हणे, '' भाउचा निरोप एका - 'साह्य करा या समयिं तरी.
उणें बोललों, प्रमत्त झालों, बहु अपराधी मी काका;
माफ करा, मन साफ करा, या आफतींत मज नच टाका.
मत्प्राणाची नाही परवा बरवा समरी मृत्यु हवा;
परी लागतो डाग यशाला शिवरायाच्या तो दुरवा.
देशकार्य हें व्यक्तीचें नच; सक्ति नको; भक्तीच हवी;
आसक्ती सर्वांची असतां मिळवूं आतां कीर्ति नवी.
राग नका धरु; आग लागते यशा; भाग हा सर्वांचा;
शब्द मुलाचा धरितां कैचा? हाच मान का काकाचा ?
साह्य कराया यवन बधाया धीर द्यावया या काका !''
असें विनविलें, हात जोडिले, दया न आली परि काका.
रट्टा दे भूमातेला; धरि कट्टा वैरी मान तिची
बट्टा लावी वयास; केली थट्टा ऐशा विनतीची;
दु:खावरतीं डाग द्यायला करी होळकर हुकूम दळा -
''पळा, मिळाला जय यवनाला!'' काय म्हणावें अशा खळा ?
फिरले भाले-भाले कैचे ? दैवचि फिरलें आर्यांचें;
पाहे भाऊ, वाहे नयनीं नीर; करपलें मन त्याचें.
निरोप धाडी पुन्हा तयाला - ''पळा वांचवा प्राण तरी
पळतांना परि कुटुंबकबिला न्यावा आमुचा सवें घरीं ''
घेत होळकर वीरवधूंतें; मग दक्षिणची वाट धरी;
देशहितांची करुनी होळी नाम होळकर सार्थ करी !
करी दुजा विश्वासघात हा; निजबंधूंच्या दे साची
परवशतेची माथीं मोळी, हातीं झोळी भिक्षेची !
काय कथावी युद्ध-कथा ? मग वृथा भाउचा श्रम झाला;
धीर सोडुनी पळति मराठे, पूर्ण पराभव त्यां आला.
कोणी वेणीमाधव धांवे; वार तयाचा शिरीं जडे;
भारतरमणीकंठतन्मणी धरतीवरतीं झणी पडे.
भूदेवीची तुटे गळसरी ! फुटे दैव कीं आर्यांचे
आकाशाची कुऱ्हाड पडली; कडे लोटले दु:खाचे !
सैरावैरा आर्य धावती; हरहर ! कोणी नच त्राता !
यवन करिति ज्या मग प्रळय भयंकर: वदा कशाला तो आतां ?

वर्णन करितां ज्या रीतीनें कुंठित होइल सुकविमति,
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ. ॥ ॥ ६ ॥

(७)

सन सतराशें एकसष्ट अतिनष्ट वर्ष या देशाला
हर्ष मरे, उत्कर्ष उरेना; सकळां आली प्रेतकळा.
फुटे बांगडी दीड लाख ती; राख जहाली तरुणांची
आग पाखडी दैव अम्हांवर; मूर्ति अवतरे करुणाची .
घरोघरीं आकांत परोपरि; खरोखरीचा प्रळय दिसे;
भरोभरीं रक्ताच्या अश्रू अबला गाळिती शोकरसें.
'दोन हरवली मोति; मोहरा गेल्या सत्तावीस तशा;
रुपये खुर्दा न ये मोजितां' - वचना वदती वृद्ध अशा;
धोर वृत्त हें दूतमुखानें कानीं पडलें नानाच्या;
'भाऊ भाऊ' करितां जाई भेटिस भाऊरायाच्या.
उघडा पडला देश तयातें हें नव संकट कां यावे !
दुःख एकटें कविं न येत परि दुःखामागुनि दुःख नवें !
धक्का बसला आर्ययशाला; तेथुनि जाई राज्य लया,
रघुनाथाचें धैर्य हरपलें, जोड उरेना हिमालया.
''नाथ ! चाललां सोडुनि अबला ! पाहूं कुणाच्या मुखाकडे ? ''
'' वाळा ! कैसा जासि लोटुनि दुःखाचे मजवरतिं कडे ? ''
जिकडे तिकडे हंबरडे यापरी परिसती जन फिरतां;
कोणिकडेही तरुण दिसेना; सेनासागर होय रिता.
उडे दरारा, पडे पसारा राज्याचा; बळ घेत रजा;
उघडें पडलें मढें हत्तिचें कोल्हे त्यावरि करिती मजा !
भलते सलते पुढें सरकले, खरे बुडाले नीच -करीं.
मालक पडतां नीट बैसले पाटावरती वारकरी.
नडे आमुची करणी आम्हां; ! खडे चारले यवनांनी;
तडे पडोनी यशपात्राला रडे सदोदित भूरमणी.
गंजीफांचा डाव संपला दिली अखेरी यवनांते
स्वातंत्र्यासह सर्वस्वातें दूर लोटिलें निज हातें.
रुमशामला धूम ठोकितां पुणें हातिचें घालविलें;
दुग्धासाठी जातां मार्गी पात्र ठेवुनी घरिं आले !
करि माधव नव उपाय पुढतीं परि ते पडती सर्व फशीं;
परिटघटी उघडिल्या एकदा बसेल कैशी पुन्हा तशी?
जसा नदीचा ओघ फिरावा पात्रीं पडतां गिरिशिखरें

पानपताच्या पर्वतपातें इतिहासाचा ओघ फिरे.
इतिहासाचें पान येथचें काळें झालें दैवबळें,
या देशावर अपमानाची स्वारी दुःखासहित वळे.
सर्वस्वाचा नाश जयाने वर्णु तयातें अतां किती ?
व्यास वर्णितां थकले यातें मग मी कोठें अल्पमति ?
जसें झगडतां त्वरित फिरावी सकल जगाची सरळ गति
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ. ॥ ७ ॥

(८)

जें झाले ते होउनि गेलें फळ नच रडुनी लेशभरी;
मिळे ठेंच पुढल्यास मागले होऊं शहाणे अजुनि तरी.
पुरें पुरें हे राष्ट्रविघातक परपस्परांतिल वैर अहो !
पानपताची कथा ऐकुनी बोध एवढा तरि घ्या हो !

भारतबांधव ! पहा केवढा नाश दुहीने हा झाला !
परस्परांशी कलहा करितां मरण मराठी राज्याला.
हा हिंदू, हा यवन, पारशी हा, यहुदी हा भेद असा,
नको नको हो ! एकी राहो ! सांगू आपणां किती कसा ?
एक आइचीं बाळें साचीं आपण सारे हें स्मरुनी,
एकदिलानें एकमतानें यत्न करु तद्धितकरणीं.
कथी रडकथा निजदेशाची वाचुनि ऐसा हा फटका
लटका जाउनि कलह परस्पर लागो एकीचा चटका !
कौरवपांडव- संगरतांडव द्वापरकालीं होय अती;
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपती ॥ ८ ॥

# कृष्णाकांठी कुंडल

(कुंडल कृष्णाकांठी नाही; पण घटकाभर त्याला तेथें नेले आहे. त्या वेळच्या गांवकऱ्यांचा थारेपालट आजच्या कुंडलकरांना दगदग देणार नाही, अशी आशा आहे. गांवठाणाच्या या हालचालीने भूगोलाच्या भक्तांची थोडीशी दिशाभूल झाल्यास एक आण्याच्या भूगोलपत्रकानें त्यांचे समाधान होण्यासारखे आहे. )

**साक्या**

-१-

मनांत माझ्या गुणगुणतें हे रसिका कोणी कांही ।
‘‘कृष्णाकांठी कुंडल आता पहिलें उरलें नाही’’ ॥
नव्या भरानें जुन्या जिवाचें गाणें हृदयीं खवळे ।
फिरत्या भवऱ्यावरी मनाच्या फेस भराभर उसळे ॥
उचंबळुनि येतील बोल ते उधळुनि देतों वरती ।
पढिकांची चतुराई सारी येथुनि झाली परती ॥
साधाभोळा मराठमोळा जोमदार घाटाचा ।
रानफुलांचा साज चढविला त्यास त्याच थाटाचा ॥
शाहीराच्या रसवंतीला भावभेटिचें लेणें ।
एकसुराच्या एकसराला बालेघाटी दाणे ॥
असेल रसिका, असलें कांही ऐकायाला हेत ।
तरि ये; मनिंच्या मळ्यांत पिकलें हें शाळूचें शेत ॥
राखण करि त्या जीवासाठीं डोळ्यांचा हा माळा ।
तुझी बाहुली बसवि त्यांत; मग गोफण मारी काळा ॥
गोफणगुंडा फाडुनि टाकी पडदा काळाचाही ।

तुटती धागे तीन शेंकडा उणेपुरे ते पाही ॥
शिवनेरीचा हिरा चमकतो दख्खनच्या दरबारीं ।
रायगडाचें तटबंदीचें कोंदण साजे भारी ॥
सह्याद्रीभर चमके त्याला जित्या जिवाचा जोर ।
तेजानें बघ पाजळल्या त्या राई काळ्याभोर ॥
त्याच लकाकीमधें तळपत्या त्या एका राईत ।
कृष्णाकांठी कुंडल शिकवी मायलेंकरां प्रीत ॥
त्या राईतिल सगळ्या वेली एकच गाणें गाती ।
त्या गाण्यांतिल प्रेमकहाणी - वेड लाविते म्हणती ॥
प्रीतीचें तें गाणें होतें; सहज लागल्या नादीं ।
कोणी येतां जातां त्यासी तेंच सांगती आधी ॥
झुळझुळत्या वाऱ्यावर त्यांची पानें हलतांनाही ।
गुणगुणती तें गाणें; त्यांना छंदच दुसरा नाही ॥
वाऱ्याची धुगधुगी हलवि तरि वेली तें कुजबुजती ।
सोसाट्याचा सुर लागला तरी तेंच ओरडती ॥
तुझ्यासारख्या रसिकासाठी त्या ते गाणें रानी. ॥
कळ्याफुलांच्या वेलपत्तिनें लिहिती पानोपानीं ॥
चल, तें वाचुनि पहा एकदा बोलशील मग तूंही ।
''कृष्णाकांठी कुंडल आतां पहिलें उरलें नाही'' ॥

-२-

चलाच रसिका, माझ्याखातर त्या राईत फिराया ।
भलत्या वेळी, भरल्या ठायीं, भलती मौज पहाया ॥
सह्याद्रीच्या कडेकपारी कोठें मोठे घाट ।
दरीपठारीं धुंडित जाणें भारी अवघड वाट ॥
तशांत पसरुनि रात्र आपुली काळी काळी काय ।
दक्षिण-उत्तर झाकुनि टाकी हिरवी डोंगरमाया ॥
थकाल वाटे रसिका ! माझ्या रसवंतीच्या राया !
मनासारखें मोल न मिळतां कष्टहि जातिल वाया ॥
परंतु आतां नकाच मागें परतूं इतक्यासाठी ।
मायेखातर भटकलाच ना कान्हा यमुनाकांठी ? ॥
बारामावळ देश तुम्हीहि पायाखालीं घाला ।
- पहा पुण्याहून कृष्णाकांठी सहजासहजी आला ।.
मार्गीं दिसल्या सह्यगिरीच्या चिमण्या चिमण्या बाळा !
वाजवितांना फिरतां रानी पायीं घुंगुरवाळा ॥

भीमानामें इथें नांदते श्रीमती चंद्रभागा ।
पुंडलिकांची मायमाउली श्रीमहाराष्ट्रगंगा ॥
साधी सुरती बाळजिवाची, डामडौलही नाहीं ।
बघून घ्या ही रसिका ! इकडे नाचे नीराबाई ॥
काळा दरिया काळोखाचा वरतीं भरुन राही ।
काळ्या राईमधें खालती काळी कृष्णामाई ॥
काळोखाचें रान माजलें, चंदाराणी नाहीं ।
तिच्याच मागें पळे तिचा तो चंदेरी दरियाही ॥
जिकडे तिकडे काळीं रानें हमरंगानें खुलतीं
निळ्या चांदण्यालागी नुसती झालरमोतीं झुलती ॥
राईमधली हिरवळ आतां काळ्या रातीं कुठली ।
माथ्यावरची तशी कोंवळी रंगसभाही उठली ॥
निजली दुनिया, निजला वारा, नव्हतें हालत पान ।
लाख जिभांची बडबड थांबुनि निजलें सारें रान ॥
मिटुनि फुलांचे डोळे निजल्या वनदेवीच्या बाळा ।
उभी झोंपती झाडें; त्यांचा उचलजागता चाळा ॥
कुठें कळकबेटांतुनि निघतां सुरांत वारा वाहे ।
निजली राई मधुनी मधुनी वाटे घोरत आहे ॥
क्रूर पशूंची बिनशब्दांची लपतीछपती चाल ।
ती राईचीं हलतीं स्वप्नें भयाण बहु बेताल ॥
काळे बुंधे खालीं नुसते वरतीं पान दिसेना ।
ठाण मांडुनी जणूं ठाकली वेताळाची सेना ॥
त्यांतुनि चिमणे झरे चालतां झुळझुळ हळु करितात ।
भुताटकींतुनि जाता भिउनी रामनाम म्हणतात ॥
भयाण रानीं भयाण राई ; भयाण जिकडे तिकडे ।
भयाण राणी भिती नांदते बांधुनि काळे वाडे ॥
म्हणति अप्सरा आकाशांतुनि दुरुन बघतांनाही ।
''कृष्णाकांठी कुंडल आतां पहिलें उरलें नाही'' ॥
थरथर कांपे वरती जी ती निळ्या रानची राणी ।
त्या तर इवल्या चिमण्या, परंतु देवहि पळति विमानीं ॥
''देवहि पळति विमानि'' म्हणसी शाहीरा ! तें नीट
कोण सांग मग कृष्णाकांठीं हलती काळी काया ॥
खास नसे ही नुसती तुमच्या चपळ मनाची माया ॥

*            *            *

(त्या दोन जिवांची गांठ पडल्यावर ती त्याला विचारते -)

''कुठली दौलत या खांद्यावर मान ठेवुनि निजते ?
कुण्या कुळाचें नांव उजळितें तलवारीचें पातें ? ॥
कोण गडाचा उभा बुरुज हा बांका बरकंदाज ?
कुणीं चढविला लाजत मुरकत देहावर हा साज ?'' ॥

(तेव्हा तो सांगतो - )

''रायगडावर धनी आमुचा, त्याला विकली काया ।
या देहाला नांव साजणी, 'रायबागचा राया' ॥
शिवरायाच्या शब्दांसंगें नाचतसे तकदीर ।
दोरीपासुनि सुटलेला हा वाऱ्यावरचा तीर ॥
मैदानावर बेलगाम कीं फिरे मोकळा वारु ।
भरदरियावर भरकटतां धरि फेर फिरंगी तारुं ॥
तलवारीच्या धारेवरतीं हा जीव बारगीर ।
भालफळावर दिलें टांगुनी हांतांनी तकदीर ॥
रायगडावर खडे पसरले शिवरायांच्या पायी ।
हिरमाणकें ती; आम्हांला दुसरी दौलत नाहीं ।.
मैदानाचा सुभा मोकळा, दुनिया मातीमोल ।
जिवंत मुडदा दिला गाडुनी पाताळाहुनि खोल ॥
पळत्या पायावरचा इमला; हिरवा महाल माझा ।
रानगांवचे कांटे किल्ले; त्याच रानचा राजा ॥
एकमांड घोड्यावर जाणें उत्तर हिंदुस्थानीं ।
भीमथडीला भाकर; तोंवर गंगथडीला पाणी ॥
जंगलशाही मिरास सारी,हिरवी दौलत न्यारी ।
रायबागच्या बादशहाची फिरते बेगम प्यारी ।
होइल असतां बालीउम्मर सूरत ऐसी न्यारी ।
कुंडलवाली बादशहाची बाली बेगम प्यारी ।
जयवंतीशी लग्न लाविलें जेव्हां शिवरायांनी ।
तोरणगडिं तै तोरण बांधिति साऱ्या कुंडलकरणी ॥

( त्याने मागें एकदा कुंडल प्रांती मुशाफरी केली. त्या वेळी )

'' पायाखाली घालुनि थकलों कुंडलचें हें सदर ।
दूरदेशच्या मुशाफराची कुणी न केली कदर ''॥
''एक जिवाविण सुनेंच तेव्हां कुंडलचें हें सदर''॥

'' आला नव्हता '' - ''काय साजणी'' ? '' नव्हता आला पदर ॥
गेल्या गोष्टी आज कशाला ? सोडा आतां राग ।
दूरदेशच्या मुशाफरा ! घ्या दिलादिलाचा बाग'' ॥
कां वेलींची पानें फिरलीं; फुलें लाजलीं कां ही ? ॥
हांसलीस कां झाडावरतीं तूं ही मैनाबाई ? ॥

( तिनें 'बरोबर घेऊन चला' असा हट्ट धरला तेव्हा तो म्हणतो, व ती त्याला उत्तर देते -)

तुझ्या कपाळीं सुबक बसावी बघ मोत्यांची जाळी ।
करवंदीची कांटेजाळी, परी आमुच्या भाळीं ॥
रायगडावर उघड्या पडल्या नव्या हिऱ्यांच्या खाणी ।
नटेल त्यांनीं रायबागच्या रायाजीची राणी ॥
टकमक टोंकावरी राहणें चढण उभी ती फार ।
पडेल खालीं बघतां असली नाजुक नवती नार ॥
प्रीतीच्या पंखांनी येइल टाकुनि मागें गगना ॥
रायबागच्या राघूमागें ही मान्यांची मैना ॥
थंडीची हुडहुडी निवाली, सरता झाला माघ ।
रायगडावर जागा झाला जंगलांतला वाघ ॥
शहरगांवच्या हिरव्या फिरत्या पोरी चुकल्यावाणी ।
उजाड रानीं पडल्या तर त्या लागतील ना झुरणी ? ॥
चला विचारा त्या वाघाला, 'कधीं लागली पाठीं'।
तुझी रानची राणी कुंडलच्या बाजारासाठी? ॥
वाघाची किंकाळी मोगल घोड्याची कीं टाप ।
ऐकुनि छातीवरच्या चोरा सुटेल ना थरकांप ॥
तरीच कां ही कमरेवरची नागिण इतकी रोड ? ।
रायबागच्या रणमर्दाची जन्माची जी जोड ॥
शिवनेरीच्या शिवरायांनी हीच दिली कां शीक ?।
रायबागचे राघू पडले पोपटपंची ठीक !
नाहीं कोणी फसावयाचें बोल असे ऐकुनिया ! ।
दुसरी ग्वाही गाते आतां, अलम दख्खनी दुनिया ॥

( तरी तिचा निश्चय फिरविण्याकरिता तो सुचवितो -)

फसाल पुरत्या; असल्या गांठी जन्माच्या ठरलेल्या ।
बनी बनाई बदलायाची नाहीं कांही केल्या ॥
''तेंच सांगतें - जिवा जिवाच्या आतां नजरा जमल्या ।
बनी बनाई बदलायाची नाहीं कांही केल्या ''

(तिचा निरोप घेऊन स्वारींत गेला असतां -)

फुलांफुलांतुनि रंगत होती मधुर सुगंधी स्वप्नें ।

( झाडावरच्या मैनेला दूती करुन )

सखे, सवंगडी म्हणतिल ज्याला 'रानगांवचा राजा' ।
खूणगांठ ती, मैनाबाई - तोच शिपाई माझा ॥
तोच दिलाचा दोस्त, जिवाचा माझ्या मालक तोच ।
जें जें माझें त्याची त्याची झाली त्याला पोंच ॥
झाडावरचा राघू झाला जरा तुझा बेभान ।
तसाच राघू रायबागचा, कापी माझी मान ॥
वाऱ्यावरतीं उडती फिरती असली मैनाराणी।
तुझ्या गड्यानें परी सोडितां झालिस बापुडवाणी ॥
आणिक जें जें सुचेल तें तें सांग साजणी बाई ।
पढवणूक ही नको, तुलाही कळतें सारें कांही ॥
भरकन गेली उडूनि मैना; उरे मराठी मैना ।
हुरहुर करुन जीव भागला काय सांगणें दैना !॥

( पुढें तो घायाळ होऊन मेला तेव्हां -)

जीव सांडुनी पडला माझा जीवाचा अलबेला ।
तोंडी माती पडुनि रंगला जोबनरसरंगेला ॥
शिवबांच्या शिरपेंचासाठी - बोली ठरली होती ।
तोडुनि मंगलसूत्र जिवाचीं देणें माणिकमोतीं ॥
शिवनेरीच्या शिवा, कसा हो केला माझा घात ?
हातावरचा राघू नेला उडवुनि हातोहात ॥
घारीनें झडपिला हातिंचा बघतां बघतां हार ।
पुढतीं केला हात जरा तों विरुन गेली गार ॥
चुना लाविला पानाला तो अजुनि वाळला नाही ।
विडा घेतल्यावांचुनि केली कां हो इतकी घाई ?
असें जसेंच्या तसेंच वठलें जातें पाउल तुमचें ।
पाय काढिला इथून पुरता; पुन्हां न परतायाचें ! ॥
अखंड भरला नव रंगांनी हा इष्काचा प्याला ।
दुनिया झुकती है ये हरदम; नहीं झुकानेवाला ! ॥

( संदर्भ न लागणाऱ्या ओळी )

जशी रानच्या पत्रीसाठीं रुसे मंगळागौर ।
रुसा साजणी; फुलते गुलशन दिलेचमनकी और ।.
लपंडाव हा सरला, राया, राज्य तुम्हांवर आलें ।
हंसेल बाई या बोला ही साधीभोळी राई ।
''कृष्णाकांही कुंडल आता पाहिलें उरलें नाहीं'' ॥

( त्या शोकानें तिचा अंत झाल्यावर -)

ज्योत ज्योतिला मिळुनी गेली, माती मातीलाही ।
''कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं'' ॥

(अपूर्ण)

## देवल

वंदन नाट्य-मिलिंदा, गोविंदा तव पदारविंदांना, ।
वंदन बलवन्नंदन, तेविं तुझ्या काव्य-सुंदरी-चरणा ॥ १ ॥

आधीं कवित्व नाही; त्यांतहि कांही सुचूं न दे घाई,
परि उत्सुकता वदवी मजकरवीं बोल बोबडे पाही. ॥ २ ॥

वाही चार फुलें हीं प्रेमें हा बाल त्या तुम्हांलागी, ।
ज्या तुम्हां उभयार्थी बलवद्गुरु सार्थ तेविं वश्या गी. ॥ ३ ॥

आहे धाष्टर्य बहुत हें कवि-कुल-गुरु-राज मजहि हें ठावें, ।
परि गुरु-जन-दर्शन-सुख रिक्त करें म्यां वदा, कसें घ्यावें ? ॥ ४ ॥

ती धन्या तव कविता रवि तापवितां उटी जशी अंगीं, ।
खिन्न मना दंग करी गुंगवुनी स्वैर आपुल्या रंगीं. ॥ ५ ॥

हरि ताप 'शाप-संभ्रम' संभ्रम निपजवि कवित्व रसिक-मनीं ।
येथुनि उचलुनि बसवुनि मनो-विमानीं तयास ने गगनीं. ॥ ६ ॥

बोलूं काय अधिक मी ? जरि असती कवि जगीं अमित साच, ।
तरि ''देवल ते देवल '' वदती ते मान्य कां न मजलाच ? ॥ ७ ॥

निर्मूनि 'शारदा' परि कां तुमची शारदा उगी बसली ? ।
कसली भीति धरी ती शक्ति जिची दांडगी असे असली ? ॥ ८ ॥

जिज्ञासा अधिका ही .. क्षमा करावी परी महाभाग, ।
अथवा क्षमा कशाला? महज्जनांतें कधी न ये राग ! ॥ ९ ॥

द्या रसिकांते कांही अजुनी; घ्या मग सुखेन आराम,
विनवित सविनय कविवर, नमन करुनिया पुन्हां पदा 'राम' ॥ १० ॥

## घरांत बसलेल्या काजव्यास -

(चाल : भक्ति ग वेणी । माझी गुंफा ग साजणी ॥ )

उडुनि जा स्वैर, । काजव्या, चमक बाहेर. ॥ धु. ॥
वासरमणी अस्तासी गेला,
कृष्ण करी तम सर्व जगाला,
अजुनि चंद्रमा वरति न आला,
असे ही वेळ,। जा, जा, जा, तोंवरि खेळ ! ॥ १ ॥

दिवस तुझे हे फार मजेचे,
तेज तुला हें नित्य कशाचें ?
आठवलें तुज बसणें कैचें ?
अगदिंच गैर ! काजव्या, चमक बाहेर. ॥ २ ॥

दाट तरुंची ती बघ राई,
चमकत चमकत तिकडे जाई,
प्रेम जसें नव-रमणी-हृदयीं,
वीज मेघांत, । जा, तैसा चमके तींत. ॥ ३ ॥

वदसि काय '' चिरसौख्य न माझें,
तेज खरें नच तें अस्थिर जें,
मिरवाया मी म्हणुनी लाजें,''
वेडा, बा रे, । हें वेड तुझ्या मनिं सारें ॥ ४ ॥

वेद, पुराणें नच पढलासी,
न्याय, तर्कही नच शिकलासी,
म्हणुनिच ऐसा मूर्ख रहासी,

मानवी कावा ! वेड्या, तुज नाहीं ठावा ! ॥ ५ ।

असेल त्याचा गर्व धरावा,
अल्प-अधिक हा भेद नसावा,
स्थिरस्थिराचा विचार जावा,
सोडुनि जातां । धन, पुन्हा धरावी लघुता. ॥ ६ ॥

''ज्ञानवंत जगिं मनुजप्राणी,
क्षुद्र इतर'' हें कोण न जाणी?
म्हणुनी अमुच्या नियमा मानीं.
जगाची रीती । जा, ठेविं आपुल्या चित्तीं ॥ ७ ॥

## सांग कसे बसलों ?

(आचरटपणाचाच आणखी एक मासला.)

अंजनीगीत

भेट जहाली पहिल्या दिवशीं
परिचित नव्हतों कुणी कुणांशीं,

लाजुनि तेव्हां परस्परांशीं,
दूर - दूर- बसलों. ॥ १ ॥
दिवस यापरी जातां चार,
लज्जा उरली नाहीं फार,
त्रास न होतां मग अनिवार -
जवळ जरा - आलों ॥ २ ॥
यापरि गेले महिनें कांही,
परिचयास मग पार न राही,
लज्जा नुरतां तिळभर पाहीं -
सांग कसे बसलो ? ॥ ३ ॥

## कवीचा वधूवरांस आहेर

### शार्दूलविक्रीडित

श्रीमन्मंगल मंगलप्रद असे जेथे उभा सर्वदा, ।
मोदें तेविं सदा सदाश्रितपदा श्रीशारदा सर्वदा, ॥
पद्माही करि सद्म ज्यास अपुलें त्या मंडपीं मंगल । -
जोडी मंगल कार्य मंगलतरा चिन्मंगला मंगल ! ॥ १ ॥

गंगौघा यमुना, सुकीर्ति विजया, चंद्रास तारा रवा, ।
अर्थातें प्रतिभा, कवीस कविता, स्वर्गा धरा सुंदरा, ॥
आत्मारामपदासि मुक्ति मिळतां जो हर्ष वाटे जना, ।
देवो तेविं अपूर्ण योग तुमचा तो सर्वथा सन्मना ! ॥ २ ॥

श्रद्धा साधुजनीं, नया गुरुजनीं नम्रत्व विद्वज्जनीं, ॥
सेवा सेव्यजनीं, दया निजजनीं, स्नेहार्द्रता सज्जनीं, ॥
माथा दीनजनीं क्षमा परजनीं, सुप्रेम साऱ्या जनीं, ।
ऐशा निर्मल सद्‌गुणांप्रति सदा आधार द्या स्वा मनीं. ॥ ३ ॥

मातातात जगांत वागति, न तें होई तुम्हांते पुरें, ।
तन्मार्ग क्रमिला यथाविधी, तरी कर्तव्य थोडें उरें. ॥
त्यांनी वाढविलें तुम्हांस; ऋण हें तुम्हांवरी राहि; जें - ।
बाळें वाढवूनी तुम्हांसम गुणी, तें फेडिलें पाहिजे ॥ ४ ॥

आलें चालत जें क्रमागत कुळीं त्या सद्यशोवैभवा - ।
रक्षा दक्षपणें; सुलक्षणगणें लक्षैकधा वाढवा. ॥

ठेवा सुस्थिर वैभवा; परि करा त्या सद्यशा चंचल. ।
यावच्चन्द्रदिवाकरौ पसरुनी आसेतुहैमाचल ! ॥ ५ ॥

जैशा मस्तकिं या सुरक्तधवला मंत्राक्षता अक्षता ॥
तैशी सत्कृति संघवृष्टिकरणीं ठेवा सदा दक्षता. ॥
जैसा गर्जत वाद्यनाद सुयशा तैसें जगीं गाजवा ।
प्रेमें सुस्थिरशा चिरंतनयथा ऐशा ध्रुवा लाजवा !॥ ६ ॥

मालादान न हें; परस्पर परी सर्वस्व संतर्पण ! ।
केलें गुंफुनि सद्गुणांहिं सुमनें हें नित्य आत्मार्पण ! ॥
गंगायमुना ओघ भिन्न असतां एकत्र होती यथा ।
झालां त्यापरि एकरुप इथुनी; आतां न व्हा अन्यथा ॥ ७ ॥

जें जें सुंदर जें सुखप्रद तसें जें जें महन्मंगल ! ॥
जें जें वांच्छित जें अभंग जगिं तें देवो तुम्हां मंगल ! ॥
आशीर्वाद सहर्ष वर्षित असा ज्या मान्य आहे रसा ।
'गोविंदाग्रज,' शब्दहार करि हा सामान्य आहेरसा ! ॥ ८ ॥

## प्रासंगिक - किंवा अप्रासंगिकच -

( एका सार्वजनिक समारंभांत, एका थोर गृहस्थाबरोबर आलेल्या त्याच्या उपवर कन्येच्या गळ्यांतहि इतरांप्रमाणे सहजगत्या व्यवस्थापकांनी पुष्पहार घातला;
त्यावेळच्या त्या मुग्धेच्या वृत्तीस पाहून )

सन्मानार्थ सभेंत हार कुणिंसा कंठी तुझ्या घातला ।
तों झालें तुज कां कसेंच ? इतका संकोच कां वाटला ?
लोकांदेखत लाजसी नवल हें कांहीं न बाले ! परी ।
बाला पुष्पवती सलज्ज असते एकांतिहीं यापरि ॥ १ ॥

- पुणें.

## विचार

(विचार ज्याच्या त्याच्या पाळीस लागलाच आहे; त्याची ओळख कशाला करुन द्यावयाला पाहिजे ?)

विचार करितां तुजविषयीं
गुंग विचार ! मन
होई. ॥ धृ. ॥
दिवसभरी करुनी धंदा
गुलाम पोटाचा बंदा
पडे न तो थकव्यासाठी;
तोंच लागसी त्यापाठी !
ताळतंत्र न तुला कांहीं
आदि अंत तुजला नाहीं !
दया न अंतरि
करिसी स्वारी,
सदा तयावरि -
खपती जे पोटावारी
या जगताच्या बाजारीं.

(२)

तूं असती बहु नवलपरी,

विश्रांतीचा कामकरी;
निद्रा तव करितां नाश,
स्वप्नांतहि देसी त्रास !
झोप जागती तयांप्रती,
ज्यांसी तूं धरिसी हातीं.
नसत्या आधि
स्वैर शतावधि;
निर्मुनि आधी,
क्षणोक्षणीं मग वाढविसी
विश्वामित्र दुजा गमसी !

(३)

विपत्तिकाळीं आम्हांसी,
न कदाही टाकुनि जासी !
मित्र म्हणावें तुला जरी,
देह जाळिसी सदा तरी !
शत्रु म्हणावें जरि तुजशीं
यत्न हितास्तव तरि करिशी !
''कसें करुं मी ?''
'' काय करुं मी ?
ध्रुवपद नामी
हें तुझिया रडगाण्याचें,
नाव न संकट जाण्याचें,

(४)

करिसी एकान्तीं गर्दी,
एकान्तहि जनसंमर्दी.
जागा असतां कुणि त्यासी,
पुढचीं स्वप्नें दाखविसी !
निजतां कोणी त्याकरवीं,
करविसी तूं कामें बरवीं.
देइन म्हणशी,
सुंदर खाशी,
'' उद्या'' नराशीं
''आज'' हातिची परि हरिसी,

मृगजळिं मनुजा खेळविशी !

(५)

पुत्र भविष्यकालाचा,
जन्मसि त्याआधीं साचा.
चिंता जननी तुझी जरी,
घात इच्छिसी तिचा तरी,
वाढायाची गति अतुला
काळाहुनि बहु वेग तुला.
दोन जनांवर,
लोभ अनावर,
करिसि निरंतर,
विचित्र लीला जशी तुझी
तशी नाढळे जगीं दुजी !

## घास

(चाल : विडा घ्या हो नारायणा )

घास घे रे तान्ह्या बाळा । गोविंदा गोपाळा ।
भरवी यशोदामाई । सांवळा नंदबाळ घेई ॥ धु.॥
घेई कोंडा कणी । त्रैलोक्याचा धणी ।
विदुराघरींचा । पहिलावहिला घास ॥ १ ॥
पोहे मूठभरी । क्षीराब्धीचा हरी ।
मैत्र सुदामजीचा । आला दुसरा घास ॥ २ ॥
थाळी एक्या देठीं । घ्यावी जगजेठी ।
द्रौपदीमाईचा । आला तिसरा घास ॥ ३ ॥
उरल्या उष्टावळी । फळांच्या वनमाळी ।
शबरीभिल्लिणीचा । घ्या हो चवथा घास ॥ ४ ॥
टाकूं ओवाळून । मुखचंद्रावरुन ।
'' गोविंदाग्रजा'' चा । उरलासुरला घास ॥ ५ ॥

## मोरपिसावरचा डोळा

डोळा साचा ॥ हा मोरपिसाऱ्यावरचा ॥ धु. ॥
बुट्टे काळ्या शालूवरती । तारे निळ्या नभीं लकलकती ।
कृष्णजलावरी कमलें रमती । तसा डोळा हा ॥ मोरपिसावर पाहा ॥
दिसती रंग उघड नयनांने । आहे विद्युत- शक्तिहि यातें ।
ओढी वस्तुमात्र: जग म्हणतें ! खरें असावें ॥ कां नाहीं उगिच म्हणावे ? ॥

मोहकता तर आहे खास । ओढी ती त्याजवळि जगास ।
वाटे सौंदर्याचा वास । असावा त्यांत ॥ ग्रह पहिला बघतां होत ॥
दिसतें काय कुणा परि यानें। रुदना खुलवी कां हंसण्यानें ।
फुलतें कुठल्या की प्रेमानें? क्षणमात्रांत ॥ हे विचार येत मनांत ॥
सजीवतेचें निर्जिव फूल । नुसती सौंदर्याची भूल ॥
ईश्वरतेची पोकळ हूल । भिन्न रंगाची ॥ ही बैठक भिन्नपणाची ॥
क्षणमात्राची मोहकता ही । चंचलतेनें चमकत राही ।
प्रेमाचें मुळि पाणी नाहीं । कसला डोळा ? ॥ हे रंग जाहले गोळा ॥
शोभा प्रेमावांचुनि फोल । जिणेंहि याचें कवडीमोल ।
अर्थाविण मेलेले बोल । टाकुनि द्याना ॥ खेळणें मुलाबाळांना ॥
कितीक असले फसवे डोळे । रंगीबेरंगी जणुं गोळे ।
जगांत पाहुनि फसती भोळे । दे ही जोड ॥ देवा ते डोळे फोड ॥

## रांगोळी घातलेली पाहून - *

'' साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळें;
नित्याच्या अवलोकनें परि किती होती जगीं आंधळे !
रांगोळी बघुनी इत:पर तरी होणें तयीं शाहणें,''
रांगोळी बघुनीच केशवसुता हें आठवे बोलणें.
रांगोळींत तुझ्या विशेष गुण जो आर्या ! मला वाटतो,
स्पष्टत्वें इतुक्या अशक्य कथणें वाटे तुला काय तो ?
जो तुतें वदवे न अर्थ मनिंचा तोंडांत आला तरी,
तो मी बोलुनि दाखवीन अगदीं साध्याच शब्दीं परी,
चैत्री आंगण गोमयें सकलही संमार्जिलें सुंदर,
रांगोळीहि कुणीं तिथें निजकरीं ती घातिली त्यावर.
ज्या आमंत्रण त्या घरीं मुळिं नसे ऐशा स्त्रियांलागुनी
त्या चिन्हांतुनि हा विशेष निघतो आहे गमे मन्मनीं -
या या ! आज असे सुरेख हळदीकुंकू पहा या स्थलीं.
बत्तासे बहु खोबरें हरभरे खैरात ही चालली !
ठावें कोण न जात येत - दिधलें कोणास आमंत्रण;
नाही दाद घरांत ही मुळि कुणा; दे धीर हें लक्षण.
संधी टाकुनि छान फौज तुमची कोठें पुढें चालली?
बायांनो ! अगदीं खुबी विसरतां तैलंगवृत्तींतली !
नातें, स्नेह, निदान ओळख तुम्हां येथें न आणी तरी,

या; आमंत्रण राहूं द्या; परि शिरा साऱ्याजणीं या घरी !
लाभे तें फुकटांतलेंच हळदीकुंकू तुम्हांला जरी,
होई काय नफा अचानक तयामाजीं न कितीतरी?
ही आगंतुकवृत्ति आपण जरी धिक्कारिली यापरी,
प्राप्ती चार घरें उगीच फिरुनी होईल का हो तरी ?
चाले काय असें उगीच भिऊनी ? तुम्हींच सांगा खरें !
या डोळा चुकवून नीट; डरतां आतां कशाला बरें ?

कोणाच्या नजरेंत येइल तरी होणें असे कांहि का?
केला का खटला कुणावर कुणीं ऐसा अजूनी फुका !
बायांनो ! तर या, नकाच दवडूं संधी अशी हातची,
जा जें कांही मिळेल तेंच भरल्या रस्त्यांतुनी खातची !
कामें हीं असलीं हितावह कधीं होतील का लाजुनी ?
या-या-या तर धांवुनी; त्यजुं नका रीती पुराणी जुनी !
कोणाच्या घरचें असेल हळदीकुंकू कधीं नेमकें
ज्या बायांस नसेल हें चुकुनियां केव्हा जरी ठाउकें,
रांगोळी बघुनी इत:पर तरी होणें तयीं शाहणें,
कोठें चालत काय काय अगदीं हें नेहमीं पाहणें !

* केशवसुतांची 'रांगोळी घालतांना पाहून' ही उदात्त कविता ज्यांनी वाचली आहे, त्यांनाच या कवितेचा अर्थ कळेल.

## विराम-चिन्हे

जेव्हा जीवनलेखास जगतीं प्रारंभ मी मांडिला,
जो जो दृष्टिंत ये पदार्थ सहजी वाटे हवासा मला !
बाल्याची पहिली अशी बदलती दृष्टी सदा बागडे,
तेव्हा 'स्वल्पविराम' मात्र दिसती स्वच्छंद चोंहीकडे !
आहे काय जगांत ? काय तिकडे? हें कोण? कोठें असें?
जें तें पाहुनि यापरी भकतसे, दृक् संशये टाकित,
सारा जीवनलेख मी करितसे तै 'प्रश्नचिन्हां'कित,

अर्धांगी पुढती करी वश मना शृंगारदेवी नटे,
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे;
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये !
केला 'अर्धविराम' तेथ; गमलें येथून हालूं नये !
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं,
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखीं भ्रमविती; लागे मुळीं अंत न,
त्याकाळी मग जाहलें सहजची 'उद्‌गार' वाची मन ।
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी किर्तिप्रभा, सद्यश -
हीं एकेक समर्थ आज नसतीं चित्ता कराया वश ।
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथे असे जाहला,
देवा ! 'पूर्णविराम' त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला !

## बागेत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास -

थांब जरासा बाळ ! ॥ धृ.॥
सुंदर खाशा प्रभातकाळीं,
चहूंकडे हीं फुलें उमललीं,
बाग हांसते वाटे सगळी !
शीतल वारा, या जलधारा कारंजाच्या छान !
थांब जरासा बाळ !
रम्य तडागीं निर्मळ पाणी,
गातिं पांखरे गोजिरवाणीं,
आनंदाची बसलीं ठाणीं,
खरें असे रे ! तरी नको रे मारुं लाडक्या धांव !
थांब जरासा बाळ !
पाहुनि सौख्याचा ठेवा !
सृष्टि करीलचि माझा हेवा !
माझ्यापासुनि फसवुनि न्यावा,
यत्न परोपरि, करितिल सारीं ! भुलशिल तूं लडिवाळ !
थांब जरासा बाळ !
तऱ्हेतऱ्हेची फुलें विकसलीं,
रंगी बेरंगीहीं सगळीं,

तूंही शिरतां त्यांच्या मेळी;
माझें मग तें, फूल कोणतें कसें ओळखूं सांग ?
थांब जरासा बाळ,

बघ सुटला हा मोठा वारा,
वायुवृत्ति तव देहहि सारा !
उडवुनि नेइल तुला भरारा !
दिगंतराला, जातां बाळा ! पुन्हा कसा मिळणार ?
थांब जरासा बाळ !

स्वच्छ तडागीं प्रतिबिंबातें,
पाहुनि वेड्या धरावयातें,
चुकुनी जाशिल पाताळातें,
तयासारखा, क्षणीं पारखा होशिल बा आम्हांस !
थांब जरासा बाळ !

किती बुडबुडे पाण्यावरती,
इकडून तिकडे तरंगताती,
चंचल लहरी, तूं त्या साथी,
क्षणांत बा रे, लपाल सारे, काळाच्या उदरांत !
थांब जरासा बाळ !

फूलपांखरें ही स्वच्छंदी,
तूंही त्यांच्यासम आनंदी,
क्षणांत पडशिल त्यांच्या फंदीं !
त्यांच्या संगें, त्यांच्या रंगें, जाशिल उडुनी दूर !
थांब जरासा बाळ !

अशा तुला मग बागडतांना,
भरभर वाऱ्यावर फिरतांना,
फुलांत दडतां कीं उडतांना,
कवण उपायीं, आणूं ठायीं, पुन्हां? लाडक्या सांग !
थांब जरासा बाळ !

शब्दवांचुनि मंजुळ गाणें,

अर्थ तयाचा देवचि जाणे !
गाइन माझें गोजिरवाणें,
सप्तसुरांपरि या वाऱ्यावरि विरुनी जाशिल पार !
थांब जरासा बाळ !

बालरवीचे किरण कोवळे,
कारंजावर पडति मोकळे,
रंग खेळती हिरवे पिवळे,
धरावयासी, त्या रंगांसी जाशिल बाळा खास !
जडावेगळी अमूर्त मूर्ति,
कल्पकतेची कीं तूं स्फूर्ति,
पुण्याची मम आशापूर्ति,
रविकिरणांवरि, जलधारांतरिं, तन्मय होशिल पार !
थांब जरासा बाळ !

# कवि आणि कैदी

संस्कृतीच्या पाशांत सांपडलेला आत्मा एकादे वेळी तरी आपल्या परिस्थितीच्या
वर जाण्याचा विचार करितोच; मायावश आत्ममूढता त्या खालीं ओढिते.
अविकारी आत्म्याच्याच ''कवि'' व ''कैदी'' अशा दोन बाजू आहेत. )

(चाल - एडका मदन.)

मार भरारी । चल तोड बंधनें सारी ! ॥ धु. ॥
पायीं गंजत बेडी पडली,
नंकळे कोणी केव्हां घडली;
पुढती चाल परी तव अडली,
ब्याद भिकारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ १ ॥

अवजड बेडीसह जड पाय,
अनाथ जीवांवरती हाय !
टाकुनि चिरडिसी कोमल काय,
निर्दय भारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ २ ॥

नसतां मुळींच तूं अपराधी,
कोण तुझ्या ही पायीं बांधी ?

करुनी निधडा निश्चय आधीं,
फटका मारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ३ ॥

मारी गरुडभरारी गगनीं,
सुख तें शेणकिडा का जाणी !
जाई शेणामध्येंच कुजुनी !
सुखाचा वैरी । चल तोड बंधनें सारी ! ॥ ४ ॥

असल्या शेणकिड्यांच्या जाती,
जिकडे तिकडे बुजबुज करिती,
केवळ मरण्यासाठी जगती;
येत ओकारी । चल तोड बंधनें सारी ! ॥ ५ ॥

प्रकाश बघतां घुबडें दडती
एकांताची आवड वरिती,
रातीबेरातीं परि फिरती,
घाण ही भारी । चल तोड बंधनें सारी ! ॥ ६ ॥
भिडतो गरुड सदा गगनाशीं,
वातावरणीं वसतिहि खाशी !

लावुनियां टक तेजोराशी
बघती घारी। चल तोड बंधनें सारीं ! ॥ ७ ॥

जाऊं त्यामागुनि धीरानें,
कांढू शोधुनि लपलीं भुवनें,
गगनामागुनि निघतिल गगनें,
करी तयारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ८ ॥

रविकिरणाचे दोन मोकळे,
बांधू नवमेघांचे दोले,
वारा देइल त्यांतें झोले,
धन्य संसारी ! । चल तोड बंधनें सारी ! ॥ ९ ॥
बसुनी तेथें तीन्ही काळीं,
पाहुनि मूर्खपणाच्या चाली,
जगता हंसू गालिंच्या गालीं,
ब्रह्मानंदी । रंगुनी स्वैर, स्वच्छंदीं ! ॥ १० ॥

## केशवसुतांची कविता वाचून -

शिवरायाच्या मागें आम्ही लालमहालीं फिरणें,
तसेंच तुमच्या मागें आम्ही नवीन कविता करणें;
असेंच कांही कांही करुनी जीवित त्याला गणणें -
'गोविंदाग्रज' म्हणे असे हे आम्हां लाजिरवाणें.

## रात्रीस ओरडणाऱ्या घुबडास

**वसंततिलका**

जेव्हां धरी निजनिभा रवि आवरोनी ।
तिग्मांधकार करि कृष्ण जगा भरोनी ॥
जेव्हां अशेष जग निद्रित नीडभागीं
जेव्हां सजीव जगता चलताहि त्यागी ॥ १ ॥

जेव्हां न ये श्रुतिपथावरि शब्द कांही ।
भावि स्थिती जग धरी जनूपूर्व वा ही ॥
होई अशांत रव कर्कश तावकीन ।
जो त्रास दे, खग मना करि भीतिदीन ॥ २ ॥

आधींच भीषण निशा, तम त्यांत घोर ।
चोंहीकडे वन भयंकर; भीति थोर
येतां अशांत तव तापद शब्द कानीं ।
घोर स्थितीसि जणुं पूर्णदशेस आणि ॥ ३ ॥

तो शांतिभंग करि कष्टवि लोकचित्ता ।
होतां पुरी भयद ग्रंथिक रोगग्रस्ता ॥
जैसा करी जनमनांप्रति भीतियुक्त ।
''श्रीराम'' शब्द शववाहकसंघ - उक्त ॥ ४ ॥

प्रौढा रवासि ऐकुनि भीतचित्तें।
ऊर:स्थलीं दृढ धरी निज बालकातें ॥
मुग्धा समीप शयितस्वधवांगभागी ।
वेष्टीत चंदनतरुप्रति जेविं नागी ॥ ५ ॥

चिंती धवा कुशल ती विरहार्त बाला ।
तोडी तशी उपवरा स्वविचारमाला ॥
ऐसें खगा ! तव रवा जन अज्ञ भीती ।
भीती तसें तुज अमंगल मानिताती ॥ ६ ॥

आहेत अन्य खग जे तुजहूनि थोर ।
कांहीं तुझ्याहुनि रवा करिती कठोर ।
तूतेंच कां मग कथी जन सर्व भीती ?

शब्दा तुझ्या अशुभसूचक मानिताती ? ॥ ७ ॥

केलेंस पातक असें वद काय बा रे ।
किंवा गमे तव मना " जन मूर्ख सारे ! " ॥
छे ! लोक मूर्ख न; पडे तुजलागिं भ्रांती ।
धूका ! तुला जन सकारण निंदिताती ॥ ८ ॥

तूं घोर शब्द करिसी भलत्याच काळीं ।
लोकांसवें नससि, रीति तुझी निराळी ॥
रात्रीस तूंच फिरसी खगजात्यमित्रा ! ।
सूर्यप्रकाश दिपवीत तुझ्याच नेत्रां ॥ ९ ॥

यानेंच लोक उलुका ! तुजलागिं भीति ।
शब्दा तुझ्या अशुभसूचक मानिताती ॥
बा ठेव या सुनियमास सदैव चित्ती ।
"लोकानुसारि नसतां जन निंदिताती " ॥ १० ॥

## जीवितास -

( ईश्वरकल्प सौंदर्याचा परिचय या लोकीं नेत्रप्रत्यक्षापुरताच आहे असें नेहमीं प्रत्ययास येतें या प्रतीतीनें ज्यांना खेद होत नाहीं हे एका अर्थी धन्यच ! )

- आणि जीविता, लाभ हाच का तुझ्या संगती राहुनियां ? ।
असेंच जाणें असे सदा का कालौघावर वाहुनियां ? ॥
सौंदर्याच्या दर्शनमात्रे जागृत होत्या जीवांत ।
विकल चेतना नाचे नुसती स्वस्थानीं व्हाया श्रांत ॥
जनसंमदीं अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें ।
एकान्तीं तच्चिंतन करणे; दुःखावेगीं विस्मरणें ॥

दिव्यदर्शनें हृदयपटावर नवरंगांनी रेखावीं ।
आंति आंतल्या अश्रूंनी तीं सर्वेच धुवुनी काढावीं ॥
अवश्य जीवश्वसनें निर्दय निःश्वासांनी योजावीं ।
हृदयजलानें भरतां नयनें गेली घटिका मोजावी ॥
आद्यंतींचे क्षण सोडुनियां अशेष जीवनिं या देख ।
परिस्थितीचा रंग काढितां क्षणयुग्मचि उरतें एक ॥
पहिला क्षण तो कीं ज्यावरतीं स्वप्रकाश आशा धाडी ।
दुज्या क्षणावरिं तीव्र निराशा छाया प्रेतमया पाडी ॥
आयुष्याच्या क्षणाक्षणाचा हिशेब केवळ हा आहे ।
परंपरेला त्यांच्या दिधलें नाम मनाहेर 'जीवन' हें ॥
रंग बदलुनी खेळत राही अशा क्षणांची ही जोडी ।
स्थलकालांच्या भिन्नत्वानें नित्य नवीं दिसती कोडीं ॥
क्षणाक्षणाला जनमरण हें प्राणिमात्र भोगित राही ।
चौऱ्यांशीचा फेरा याविण आणिक दुसरा तो नाहीं ॥
फसव्या पाण्यावरी पोहुनी दम कोंडुनि मरतां ।
'' गोविंदाग्रस'' म्हणे जीविता ! लाभ तुझा नच यापरता ॥

## ''समसमां संयोग की जाहला !''

( अशी फुलें नेहमी सांपडत नाहींत म्हणूनच जगांतले ग्रामोफोन कविहृदयाच्या नालायकीचीं गाणीं गात असतात.)

संध्याकाळ सदा उदास करितो माझ्या अभागी मना ।
त्यानें हर्षति जीवमात्र परि तो मातेंच दे यातना ॥
नित्याचा क्रम एक हा ठरविला कीं काळ जायाप्रती ।
कोठेंही तरि शून्यवृत्ति फिरुनी, येणें घरा मागुतीं ॥ १ ॥

येतां एक दिनीं असेंच, दिसली वेली कुठेंशी मला ।
होती कांहि फुलें तिच्यावर, मना आनंद तैं वाटला ॥
घ्यावीं काढुनि दोन तीन म्हणूनी जों जीव माझा भुले ।
वारा वाहुनियां जरा - भरभरा सारीं उडलीं फुलें ॥ २ ॥

वेलींची नव्हतीं फुलें - तिजवरी होतीं कुणी टाकिली ।
(प्रेमाचे शुकपाठ बोलत नटी, तें आठवे त्या स्थलीं ) ॥
कांही त्यांतुनि घेतलीं उचलुनी, चालावया लागलों ।
'' याचें काय करुं ? '' विचार करितां हा मी परि भागलों ॥ ३ ॥

कोणी मित्र मला पुढें भटकतां वाटेमध्ये भेटला ।
प्रेमें ओढुनियां स्वकीय सदनीं तो शीघ्र नेई मला ॥
माझें स्वागत तो करी बहुपरी खेदास न्याया लया ।
ग्रामोफोनहि लाविला; रिझवि तें गाणें मना माझिया ॥ ४ ॥

ज्या गाण्यांतिल शब्दसंघ पडला होता मनासारखा ।
गाणाराहि - गळा किती मधुर तो ! - लोकींच या पारखा ॥
अर्थानें तर वेड लागत मना; उत्कर्ष झाला रसा ॥
नाहीं एकच तेवढें हृदय ते; हा खेळ दैवा, कसा! ॥ ५ ॥

ग्रामोफोनवरी तेव्हां संतोषें जीव हर्षतां ।
फुलें तीं टाकुनी होई '' गोविंदाग्रज'' चालता ॥ ६ ॥

## गरिबीचे गाणे

कुणि ऐका हो ऐका एकच वेळ । हा दुर्दैवाचा खेळ ॥
मी शास्त्रांचा मोठा पंडित नाही । नच शिकलों पढलों कांही ॥
मृत हृदयाचें रडकें केविलवाणें । गरिबीचें माझें गाणें ॥
दैवाचे पाहुनि झगडे ॥
मम हृदय जाहलें उघडें ॥
मग गाई वेडें बगडें ॥
घ्या मानुनि हें; चुकले मुकलें कांही । तरि उपाय माझा नाही ॥ १ ॥

दुर्दैवाची करणी अघटित कांही । दुष्काळ पसरला बाई ॥
निज बाळाला पाजीना ती आई । गोठ्यांत उडाल्या गाई ॥

चहुं मुलखीं हो एकच उपासमारा । चिमणीला नाहीं चारा ॥
झाडावर नाहीं पान ॥
वैराणच रानोंरान ॥
दुनियेचा बदले वान ॥
लवलेश कुठें अन्नाचा न मिळावा ॥ पोटांत पेटला वणवा ॥ २ ॥

किति आड तळीं विहिरी गेल्या खोल। नांवाला नाही ओल ॥
जणुं प्रेतांच्या डोळ्यांच्या त्या खांचा । भेसूर भाव दोघांचा ॥
नदिनाल्यांना तापुनि रेतीचूर । मृगजळेंच आले पूर ॥
पाण्याविण होतां भडका ॥
दगडाला देती धडका ॥
परि पाझर कुठला खडका ॥
यमरायाचे दूर फिरति चौफेर । सर्वांचा उठला शेर ॥ ३ ॥
(अपूर्ण)

## प्रेमकाळ

संगम तीन्ही काळांचा ॥
प्रेमकाळ घडवी साचा ॥ धृ. ॥

हृदयदेवते, दे हाता ॥
प्रेमकाळ निर्मू आतां ॥
दृढ आलिंगन दे हृदया ॥
चुंबन देई नंतर त्या ॥
एक करुं जीवा भावा ॥
प्रेमकाळ चल करुं नवा ॥
प्रेमकामने । प्रेमचुंबनें ॥ जोडुं या मनें ॥
वर्तमानकाळीं करु ती ॥ भूत -भविष्यांची भरती ॥ १ ॥

सोडुनि सारें धरदार ॥
चिंतेचाही बाजार ॥
चुंबनेंच घेऊं नुसतीं ॥
सखे ! सारखी; सोडूं न ती ॥
काम एवढें मनीं धरुं ॥
जीवन चुंबनमयचि करुं ॥
आता चुंबन । नंतर चुंबन । चुंबन जीवन ॥

इच्छा-तृप्ति क्रिया तशी ॥ चुंबनमय चल करुं अशी ॥ २ ॥

भूतकाळची क्रिया अशी ॥
आणुं वर्तमानापाशीं ॥
वर्तमानिंची हीच क्रिया
भविष्यांतही नेऊं या ॥
झाल्याचें गोडें स्मरण॥
होत्यांचे आशा किरण ॥
जिरवुनि टाकू निमिषांत ॥
चुंबन स्मरणीं। चुंबन करणीं ॥ आशास्फुरणीं ॥
चुंबन एकच राहूं दे ॥ कार्याच्या प्रेमानंदें ॥ ३ ॥

आद्यंती तीन्ही काळीं ॥
इच्छा तृप्ति स्मृति सगळी ॥
एकरुप तृप्ति स्मृति सगळी ॥
एकरुप होतां कुठला ॥
काळभेद सखये ! उरला ? ॥
भेद असे जो कार्यांचा ॥
भेद तोच या काळांचा ॥
इच्छा चुंबन । आता चुंबन ॥ स्मृतिची चुंबन ॥
विलय तीनही काळांचा ॥ प्रेमकाळ निर्भेदाचा ।
किंवा एकचही करुं सदा ॥
क्रिया एकची स्मरुं सदा ॥

मनांत आणूं कितीकदां ॥
क्रिया तीच, नच दुजी कदा ॥
भूतभविष्यत्कालां ॥
वर्तमान एकच सांचा ॥
हा ऐक्याचा । हा प्रेमाचा । हा जीवांचा ॥
चुंबनसंगमकाल गणा । प्रेमकाळ त्यालागिं म्हणा ॥ ५ ॥

ओंठावरती ओंठ सदा ॥
कदा न सोडूं इष्टपदा ॥
चुंबनास आरंभ नसे ॥
अंतहि कुठला त्यास असे ॥
चुंबन एक अनाद्यंत ॥
सखये ! मरणापर्यंत ॥
ओंठ न हाले । चुंबन असलें । सदाहि चाले ॥
नव्या जुन्याचा एक ठसा । प्रेमकाळ चल करुं असा ॥ ६ ॥

## लीला

(अनाथबालकाश्रमांतील एक पांच वर्षांची मुलगी.)

**दिंडी**

दिसे मजला हें पुढें गोड मूल ।
पडे कोमेजुनि रम्य तसें फुल ॥
एक निर्णय मनिं होत नसे साच
विषय दृष्टीचा द्विविध हा तसाच ॥ १ ॥

जसें वेलीचें दलितगलित फूल ।
बालविधवेचें तसें पतित मूल ।
दिसतिं दोन्हीही सारखीं मलूल ।
कृपादृष्टीची कुणि न घालि झूल ॥ २ ॥

पांच वर्षांची छबकडी सुरेख ।
जणूं चिमणीशी हिरकणीच देख ॥
कशी चित्रासारखी उभी राही ।
नांव ठेवाया सोय मुळीं नाही ॥ ३ ॥

कुण्या ऋषिचे यानास अडखळून ।

पडे निखळूनी जणु नीलपटांतून ॥
आलि खालीं ही चांदणीच एक ।
तरिच इतकी ही चमकते सुरेख ॥ ४ ॥

बाल अवयव रेखीव एवढाले ।
कल्पनेच्या जणुं भ्रमें चित्र हाले ॥
काव्य तरळत जणुं हृदयिं कविजनाचें ।
बालसौंदर्यहि असें देहिं नाचे ॥ ५ ॥

बालसौंदर्यहि असें देहिं नाचे ।
तरी वाटे हें स्वप्न निर्धनाचें ॥
यास कारण तें पाहतां दिसेची ।
जोड सौंदर्या उदासीनतेची ॥ ६ ॥

किती लीले ! तव वदन उदासीन !
सांग बाळे ! कां दिसशी अशी दीन ॥
बघावेंसे वाटतें जरी त्यास ।
तरी बघतां मन होतसे उदास ॥ ७ ॥
तोंच माझ्या लागलें कुणी काना ।
जन्मवार्ता कथि चित्तसमाधाना ॥
बालविधवेनें टाकिली अनाथ ।
मिळाली ती बालिका कंटकांत ॥ ८ ॥

जणुं कळुनी ही जन्मकथा नीच ।
असे तेव्हांपासून ही अशीच ॥
किती हंसवावी तरी हंसत नाहीं ।

दृष्टि भूभागीं यापरी सदाही ॥ ९ ॥

## विश्वाची विजयादशमी

नवरात्राची रात्र संपली सण आला दसरा ॥
पडल्या प्रहरी जनता सारी करी येरझारा ॥
सृष्टिदेवता उघडुनि रविचें मावळतें दार ॥
खुलें टाकितें हे सोनेरी संध्याभांडार ॥
तें दसऱ्याचें सोनें लुटणें कविचा अधिकार ॥
तयार झाला, पुढें निघाला; हौसच अनिवार ॥
शब्दांचा चढविला क्षणोक्षणिं फुलता पोशाख ॥
अहंपणाच्या मुर्दुमकीचे अलंकार लाख ॥
तुरा शिरावर डुलतो पवनीं तरल कल्पनांचा ॥

- (अपूर्ण)

## अपराध यांत कोणाच

हा असे खेळ दैवाचा । अपराध यांत कोणाचा ॥ धृ. ॥
कमलिनी मनोहर बाला । कमलमुखी शोभा वाही ॥
गुणरुप रेखिल्याऐसें । कोठेंही न्यून न कांही ॥
मकरंदें रसपूर्णा ती । कोणाला ठाउक नाहीं ॥
पंकांत जन्म परि तिजला ॥
देतांना विधि का निजला ॥
हें पाहुनि जीवची थिजला ॥
परिणाम पूर्ण जन्माचा । अपराध यांत कोणाचा ॥ १ ॥
उदयाचलिं श्रीमान् रवि ये । निज तेज त्रिजगीं पसरी ॥
अति पवित्र त्या स्पर्शानें । कमलिनी जाहली हंसरी ॥
कुरवाळी तिजला स्वकरी । भाग्याला उरली न सरी ॥
तेजाला तेज मिळालें ॥
दोन जीव एकच झाले ॥
'' मी कुठें, कुठें तूं'' सरले ॥
हा धर्मचि सम हृदयांचा । अपराध यांत कोणाचा ! ॥ २ ॥

- अपूर्ण

# पुत्रशोक

### दिंडी

पूर सरितेला फिरुनि फिरुनी येत
फुटत गिरिचें पाषाणहृदय जेथ ॥
हृदय फुटतां हें, जरी दीनवाणी ॥
करुणरंगें रंगते ‘‘ रामवाणी’’ ॥ १ ॥

पडुनि आकाशींच्याच कुऱ्हाडीचा ॥
घाव दैवाच्या सबळ तांतडीचा ॥
वंशतरुचा रोपटाा कोंवळाच ॥
तोहि एकुलता तुटे आज साच ॥ २ ॥

हिरा जीवींच्या जिवाचाच माझा ॥
गगननगरा जातसे बाळराजा ॥
शोकमंगल गावया गोड गाणीं ॥
सजे राजस रसवती ‘‘ रामवाणी’’ ॥ ३ ॥

उचंबळुनी रस करुण येत रंगा ॥
भरुनि दुथडी वाहते हृदयगंगा ॥
‘‘रामरसवंती’’ रमे काळिं ऐशा ॥
साक्ष देई श्रीमहाराष्ट्रभाषा ॥ ४ ॥

हाय ! - शोकाच्या भरें काय आज ॥
बोललों हें सोडुनी भीड लाज ॥
क्षमा करिं हा अपराध शब्द मातें ॥
मायभाषे ! मज मूढ बालकातें ॥ ५ ॥

कुठें देवी मंगला मायभाषा ॥
कुठें पामर मी; काय ही दुराशा ॥
थोरथोरांची मायमाउली ही ॥
बोल भलते बोललों तिला कांही ॥ ६ ॥

ज्ञानदेवाच्या हृदयिं बसुनि कोडें ॥
भाविकांचें जी उकलि गूढ कोडें ॥

मराठ्यांच्या मंडळामाजि भावें ॥
जिनें भगवद्गीतेस नाचवावें ॥ ७ ॥
जिच्या सामर्थ्ये सहज नामयातें ॥
साध्य झालें फिरविणे राउळातें ॥
एकनाथाचें देव आणि पाणीं ॥
जिच्या ओघांतूनि ती हीच वाणी ॥ ८ ॥

गोकुळींच्या चोरास धरुनि पायीं ।
बसवि जात्यावर जेधवां जनाई ॥
दळण दळितां गावया गोड गाणीं
आळवी तो श्रीरंग हीच वाणी ॥ ९ ॥

फक्त नांवाची ठेउनियां ठेव ॥
करी देवाशीं सदा देवघेव ॥
अभंगांनी ही करि अंभग वाणी ॥ १० ॥

जिनें आतांही मारितां भरारी ॥
गूढ गगनें भेदुनी पार सारीं ॥
तत्त्वरत्ना उघडिल्या दिव्य खाणी ॥
तीच कृष्णाची * महाराष्ट्रवाणी ॥ ११ ॥

अशी थोरांच्या रमे हृदयधामीं ॥
बोल सलगीचे बोलिलों तिला मी ॥
मायभाषा म्हणुनीच सर्व साही ॥
बाळबोलाचा तिला राग नाहीं. ॥ १२ ॥

अजुनि खेळत माझिया मनासंगें ॥
रंगवावी मीं तशी तीहि रंगे ॥
धीर येउनि यामुळे तुला माते ॥
बोलवी मी मजसवें रडायातें ॥ १३ ॥

हाय ! बघतां बघतांच काय झालें ॥
कुण्या जन्माचें पाप पुढें आलें ॥

* कविवर्य केशवसुत

(अपूर्ण )

# काळाला बजावणें

जबरदस्तिचा हुकूम माझा ऐकुनि काळा ! थांब जरा ॥
बजावणें हे माझें तुजला, शक्तीचा हा जोर खरा ॥
ऐकुनि जाशिल पुढें तसाची, तुझाच होइल तरि तोटा ॥
दटावणी ही फोल नसे; बा शब्द एक नाहीं खोटा ॥
ब्रह्मचारि बैरागी बळकट शून्याच्या हातीं सोटा ॥
नि:संगाची सोबत माझी ब्रह्मांडाचा करिं लोटा ॥
गाणें माझें काळा ! पाडिल चराचराला भुलावणी ॥
जो तो होइल ठायिंच वेडा ओळखील ना कुणा कुणी ॥
अवसानाच्या भरांत घेइन रविचंद्रांची झांज करीं ॥
दिनरजनीची जोडी ही तव क्षणांत मूर्खा ! वांझ करी ॥
गाणें ऐकुनि त्या सूर्याचा प्रकाश होइल गार अति ॥
विरतिल तारा; रस पाझरतां तशी चंद्रिका अखंड ती ॥
दिनरजनीची जोडि फोडिसी नीरस अससी किती तरी ॥
एका काळी, एका ठायीं दोघां मी रमवीन परी ॥
एकरुप तीं करितां यापरि झांज करी रविचंद्रांची ॥
दिनरजनींचा खेळ बंद; जणू उघडझांप तव डोळ्यांची ॥
उभें ठेवितां समोर माझ्या ब्रह्मांडा करुन वेडें ॥
अंधा ! ऐसा एकटाच तू जाशिल कोठें सांग पुढें ? ॥
म्हणुनि सांगतो हुकूम माझा ऐक, नको करुं वृथा त्वरा ॥
बजावणें हें माझें तुजला; शक्तीचा हा जोर खरा ॥

# गेले गोपाळ कृष्ण - हा ! हाय !!

चल, ऊठ, कल्पने, जा बघ पाहूं आज जाहलें काय
कां श्रीभारतदेवी एकाएकीच मोकली धाय ?
जी एकमात्र भूषण पुरुषाप्रति तीहि वाङ्मयी देवी
ठेवी कां उतरोनि स्वभूषणें? मूकवृत्ति कां सेवी ?
साऱ्या शहर पुण्याची पुण्याई काळवंडली कां ही ?
आनंदाची माया हांसत खेळत कुठेंच कां नाही?
भारतसेवामंडलसदनाभवतीं उदास वदनांनीं
अश्रूंची पुष्करिणी केली कां? काय जाहली हानि?
श्री फर्ग्युसन मंदिरिं शोकाचा पूर लोटला कां हा ?
हे भिंतीचे दगडहि रडुनि म्हणति सारखेच कां? हाहा ?
म्हणतात झोंप आली शिक्षा ऐकिलि तरी त्वरित ज्यांस
ते धीर बाळ टिळकहि आज रडतात कां सनि:श्वास ?
हृदया ! धडधड न करी ! ऐक इथें कोण बोललें काय ?
नश्वर देहा त्यजुनी गेले गोपाळ कृष्ण- हा ! हाय !!

(अपूर्ण)

# वीणावती सुंदरीस -

घुमे नाद तो सुंदरींच्या करीं
मनीं अंतरीं ही विराल्या परी ॥
तशा हृदयिंच्या सर्व तारा त्वरें ।
म्हणू लागल्यां गान एकस्वरें ॥१ ॥

चढें दिव्य हृद्गान तें सारखें
करी बाह्य विश्वास तें पारखें ॥
क्षणार्धात चिद्वृत्ति ही रंगली ।
स्वगीतांतची बालिका गुंगली ॥ २ ॥

आज दिव्य त्या चित्तगीतापुढें ।
असे कायसें विश्व हें बापुडें ।
घुमे आंतल्या आंत गाणें असें ।
कळे ते जयाचें तयाला कसें ? ॥ ३ ॥

म्हणोनी करीं शांत झाली गती ।
विचारांतरीं लीन वीणावती ॥
तिनें उधळितां नादरत्नाकरा ।
मनोवृत्ति साऱ्याहि आल्या भरा ॥ ४ ॥

मनांतील तारा निजार्थध्वनि ।
खडा ठेविती गूढता टाकुनी ॥
मुक्या प्रीतीचे भावही बोलती ।
मनोवृत्ति त्यां ऐकुनी डोलती ॥ ५ ॥

मिटी नेत्र बाला पहाया मना ।
तशी गुंगली सर्वही चेतना ॥
मुकें गान अंतरी पाझरे ।
विरे देहिंचा देहभाव त्वरें ॥ ६ ॥

जरासा तसा हात राही पहा ।
करी यौवनश्री असा खेळ हा ॥
खुले भाव सारा झुले जीवही ।
क्षणार्धात झाली समाधिस्थ ही ॥ ७ ॥

# जिवास बोध

शिवोऽहं शिवोऽहं शिव: केवलोऽहम् ।
(टिपणें)
जसें पाहिलें त्वां परा जीवजातां ।
तसें पाहणें आपणासीहि आतां ॥
तुला कर्मसाक्षित्व आलें निदानीं ।
त्रिवाचा करी बोध हा रामवाणी ॥ २ ॥

(अपूर्ण)